सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, ३ जानेवारी २०२५ | वर्ष ३ रे अंक ३०४ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ■ dainiktarunbharat.com ■ epaper.dainiktarunbharat.com


# महापालिका निवडणुकीला गालबोट; मनसे पदाधिकाऱ्याचा खून?

- तिकीट वाटपावरुन झाला राडा
- 'भाजपा'तील दोन गटात धुमश्चक्री
- 'मनसे'च्या जिल्हाध्यक्षांचा गंभीर आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने सत्ताधारी व विरोधी पक्षात अहमहमिका लागली आहे. पक्षातंर्गत वादावादीही विकोपाला जात आहे. हे कमी म्हणून की काय, यंदाच्या निवडणुकीला खूनाचे गालबोट लागले असून तिकीट वाटपावरुन प्रचंड राडा झाला. शुक्रवार, दि.२ जानेवारी २०२६ रोजी 'भाजपा'तील दोन गटात धुमश्चक्री उडाली. प्रभाग क्रमांक २ मधील जोशी गल्ली येथील एका तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा खून झाल्याचा आरोप मनसे जिल्हाध्यक्षासह नातेवाईकांनी केला आहे. बाळासाहेब सरवदे असे मृताचे नाव आहे. बाळासाहेब सरवदे हे महाराष्ट्र नवनिर्माण



युवक सेनेचे शहराध्यक्ष असून 'भाजपा'च्या राड्यात त्यांचा नाहक बळी गेला, असा गंभीर आरोप 'मनसे'चे जिल्हाध्यक्ष प्रशांत इंगळे यांनी केला.

याबाबतचे वृत्त असे की, प्रभाग क्रमांक २ मध्ये भाजपाकडून आमदार पुत्र डॉ. किरण देशमुख, नारायण बनसोडे, कल्पना कारभारी व शालन शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली. मनसे विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांच्या काकू रेखा सरवदे यादेखील 'भाजपा'कडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होत्या. परंतु त्यांच्याऐवजी शालन शिंदे यांना भाजपाची उमेदवारी मिळाल्याने रेखा सरवदे या 'बंडखोरी'च्या पवित्र्यात होत्या. समाजात तणाव नको या उद्देशाने आणि काकूला तिकीट नाकारण्यामागचे कारण विचारण्यासाठी बाळासाहेब सरवदे हे शंकर शिंदे यांच्या संपर्क कार्यालयात गेले होते. त्यावेळी शिंदे व सरवदे समर्थकांमध्ये बाचाबाची आणि शिंदे यांच्या संपर्क कार्यालयाची तोडफोड झाली. आणि बघता बघता या घटनेला हिंसक वळण लागले. बाळासाहेब सरवदे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. यात इतर काहीजण जखमी झाले आहेत. बाळासाहेब सरवदे आणि जखमींना श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय येथे उपचारासाठी आणण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान बाळासाहेब सरवदे यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. ही बातमी शहरभर वाऱ्यासारखी पसरताच बघ्यांनी घटनास्थळ व रुग्णालय येथे एकच गर्दी केली. याप्रकरणात भाजपा आमदार आणि माजी नगरसेवक यांच्यावरही मनसेकडून आरोप करण्यात आले आहेत.

**(उर्वरित वृत्त पान २ वर)**

# ५३० बंडोबा थंडावले; नेत्यांची धावपळ

- सोलापूर महापालिका निवडणूक
- नाट्यमय घडामोडी; भावना उफाळल्या
- कमळासाठी माघार, पण डोळ्यांत अश्रू
- ७०० जण रिंगणात, ५३० जणांची माघार
- आज होणार चिन्हांचे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी शुक्रवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी नॉर्थकोर्ट परिसरात नाट्यमय घडामोडी घडत राजकीय वातावरण तापले होते. विविध पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते निवडणूक कार्यालय परिसरात तळ ठोकून होते. बंडखोरी रोखण्यासाठी, नाराज उमेदवारांची समजूत काढण्यासाठी आणि शेवटच्या क्षणी तोडगे काढण्यासाठी सर्वच पक्षांकडून जोरदार प्रयत्न झाले. बंडखोरी शमविण्यासाठी नेत्यांची धावपळ दिसून आली.

भाजपमध्ये कमळासाठी माघार, पण डोळ्यांत अश्रू असे चित्र पाहायला मिळाले. महापालिका निवडणुकीसाठी २३ ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत अर्ज विक्री व स्वीकृती प्रक्रिया राबविण्यात आली होती. या कालावधीत ४ हजार २० नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली. एकूण १४६० उमेदवारी अर्ज दाखल झाले. प्राप्त अर्जांची बुधवारी छाननी करण्यात आली. यात २३० अर्ज बाद झाले. तर १ हजार २३० अर्ज वैध ठरले.

महापालिकेच्या २६ प्रभागातील एकूण १०२ जागांवर निवडणूक लागली आहे. या निवडणुकीत ५३० जणांनी माघार घेतली असून आता ७०० जण निवडणुकीच्या रिंगणात आहेत. दरम्यान, 'कमळ' हाच आपला खरा उमेदवार आहे, या भावनेतून भाजपातील काही इच्छुकांनी उमेदवारी माघार घेतली. यावेळी 'नॉर्थकोट'मध्ये कार्यकर्त्यांच्या भावना उफाळून आल्या होत्या. अनेकांना अश्रु आवरता आले नाही. अर्ज माघारीची वेळ संपण्याच्या सुमारास काही ठिकाणी वादावादीचे प्रसंग घडले.

**(उर्वरित वृत्त पान २ वर)**

### शिवसेनेच्या कुमुद अंकाराम यांना भाजपा आ.देवेंद्र कोठेंनी अर्ज माघार घ्यायला लावले

भाजपचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या आत्या तथा माजी नगरसेविका कुमुद अंकारम ह्या शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्या होत्या. मात्र, आमदार देवेंद्र कोठे हे आपल्या आत्यांना घेवून नॉर्थकोर्ट प्रशाला येथे आले आणि त्यांना उमेदवारी अर्ज माघार घ्यायला लावले. आ.देवेंद्र कोठे म्हणाले, कुमुद अंकाराम ह्या माझ्या आत्या आहेत. त्यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात मी कमी पडलो. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आदेश दिले. त्यानुसार मी आत्यांना विनंती केली असता त्यांनी अर्ज मागे घेतला.


सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

'सोलापूर तरुण भारतची दिनदर्शिका सांगे भविष्याची दिशा'

- नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका
- वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका
- प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील
- तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य
- संकष्टी चतुर्थी, गावोगावचे चंद्रोदय
- आरोग्य विषय व बारा ज्योतिर्लिंग माहितीसह भरगच्च मजकूर

आजच आपल्या दिनदर्शिकेची अंक वितरकाकडे नोंदणी करा.



नोंदणीसाठी संपर्क : 8888847267





# सन २०२५ ला निरोप अन् २६ चे स्वागत वादावादीतच!

## ● महापालिका निवडणुकीमुळे तापले वातावरण; तोडफोड, हाणामारी, हत्येच्या प्रकाराने गालबोट; विकासाच्या गप्पा मारणारे बेशिस्त

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. २ जानेवारी-**


**एकेकाळी दंगलीचे शहर म्हणून ओळखल्या जाणारे सोलापूर गेल्या काही वर्षात शांतीप्रिय तर आहेच पण मुख्यमंत्री फडणवीसांमुळे विकासाच्या मार्गावर धावत आहे. परंतु महापालिका निवडणुकीचे वातावरण तापल्यामुळे सरलेल्या सन २०२५ ला निरोप आणि २०२६ चे स्वागत देखील वादावादीतच गेले. महापालिका निवडणुकीला सोलापुरात गालबोट लागल्याचे चित्र आहे. ३० डिसेंबरला उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी आणि ३१ डिसेंबरला अर्ज छाननीप्रसंगी राजकारण्यांमधील वादावादी टोकाला पोहचल्याचे सोलापूरकरांनी पाहिले. १ आणि २ जानेवारी या अर्ज माघारीच्या दिवशी तर इच्छुक उमेदवारांमध्ये हाणामारी, कार्यालयाची तोडफोड आणि मनसे पदाधिकाऱ्यांच्या मृत्यूनंतर करण्यात आलेल्या हत्येच्या आरोपाने सोलापूरचे राजकीय वातावरण खूपच तापले आहे. सर्वच राजकीय पक्षांना बेशिस्तीचे ग्रहण लागले आहे. राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांवर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. तर मतदारांनी डोळस होवून कर्तव्य बजावणे ही आता काळाची गरज बनली आहे.**




राज्यातील विविध पक्षाच्या नेत्यांनी सत्तेसाठी केलेले राजकारण आणि पक्ष फोडून सत्तेत मिळवलेला वाटा पाहून कार्यकर्ते देखील त्याच वाटेवर जाताना दिसत आहेत. महापालिकेच्या निवडणुकांचा कार्यक्रम असा जाहीर झाला आहे की, सन २०२५ ची अखेर आणि २०२६ शुभारंभच या निवडणुकीच्या धामधुमीत झाला आहे. लोक आनंदाने सरत्या वर्षाला निरोप देतात आणि उत्साहाने नूतन वर्षाचे स्वागत करतात पण महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमुळे सरत्या वर्षाला निरोप आणि नूतन वर्षाचे स्वागत राजकीय वादावादी, हाणामारी, तोडफोड आणि कहर म्हणजे राजकीय कार्यकर्त्यांच्या मृत्यूनंतर झालेल्या हत्येच्या आरोपामुळे नूतन वर्षाच्या स्वागतासह महापालिका निवडणुकीला गालबोट लागल्याने सोलापूरकर नाराजी व्यक्त करीत आहेत. सोलापूरच्या विकासासाठी हजारोंच्या संख्येने निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्यांचे वर्तन, वादावादी, बेशिस्त पाहता ही मंडळी खरंच करणार का सोलापूरचा विकास? अशी शंका मतदारांना येणे साहजिक आहे. आपले नेते सत्ता आणि स्वार्थासाठी पक्ष बदलतात.

मग आपण केले तर काय होते, असे म्हणत कार्यकर्ते देखील सैरभैर झाले आहेत. राजकीय पक्षांना नैतिकता, तत्वे उरलीत की नाही ही शंका कार्यकर्ते आपल्या वर्तणुकीतून खरी ठरवित असल्याचे नागरिक बोलत आहेत. सोलापूरकरांना गेल्या अनेक वर्षांपासून आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा होतो. विशेष म्हणजे, उजनी धरणात शंभर टक्के पाणीसाठा असतानाही महापालिका प्रशासन सुरळीत पाणीपुरवठा करू शकत नाही. प्रशासन जसे याबाबत निष्क्रिय आहे तसे त्यांच्यावर अंकुश ठेवणारे नगरसेवक देखील सक्षम नसल्याचेच सिध्द होत आहे. शहरातील दोन उड्डाणपूलांच्या भूसंपादनासाठी दहा वर्षांपेक्षाही जास्तीचा कालावधी लोटला. पण या कामाला काही सुरुवात होत नाही. शहरातील वाहतुकीची समस्या दैनंदिन वाढते आहे. शहरातील बहुतांश रस्त्यांची दुर्दशा आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे फोफावली असून त्याकडे प्रशासनाचे तर दुर्लक्षच पण लोकप्रतिनिधीही मौन बाळगून आहेत. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनीच बोगस बांधकाम परवाना देण्याची समांतर प्रशासकीय यंत्रणा राबविली, अशा अनेक समस्या आणि भ्रष्टाचाराने बरबटलेल्या महापालिकेत येण्यासाठी धडपडणाऱ्यांकडे विकासाची दूरदृष्टी किती आहे हेदेखील मतदारांनी पाहणे गरजेचे आहे. कारण यापूर्वी अनेक वर्षे महापालिकेत नगरसेवक असणारे यंदाही निवडणुकीच्या मैदानात आहेत. मग त्यांनी यापूर्वी सोलापूरचा विकास सक्षमपणे का केला नाही, अशीही शंका उपस्थित होणे साहजिक आहे.

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत यंदा वादाचे राजकारण रंगणार अशी चर्चा जाणकार व्यक्त करीत होते. निवडणूक आयोगाच्या प्रशासनाचा गलथान कारभार देखील वादाच्या प्रकाराला




कुठे तरी कारणीभूत असल्याचे लोक बोलू लागले आहेत. किमान निवडणुकीच्या कालावधीत तर प्रशासनाने निष्पक्षपाती कारभार करुन महापालिकेला चांगले कारभारी मिळतील यासाठी घटनेचे पालन करणे अपेक्षित आहे. परंतु असे होत नसल्यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण होत असल्याचे जाणवते आहे. सर्वच प्रशासनाने आणि प्रशासन प्रमुखांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता नियमांचे काटेकोरपणे पालन करुन कायदा सर्वांसाठी समान असतो, हे दाखवून दिल्यास सामान्यांसह सर्वांचाच प्रशासनावरील विश्वास वाढणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१७ साली झालेल्या होत्या. २०२२ साली महापालिकेची पंचवार्षिक मुदत संपल्यानंतर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ठ झाला अन् या निवडणुका जवळपास तीन वर्षे लांबल्या. तीन वर्षाच्या कालावधीत सर्वच महापालिका, जिल्हा परिषदा, नगरपालिका आदींवर शासनाने प्रशासक नियुक्त केले. यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुआ असणारा नगरसेवक, मेंबर तीन वर्षे नसल्यामुळे लोकांना नागरी समस्यांना तोंड द्यावे लागले. कारण शासनाचे प्रशासन सामान्य नागरिकांशी कसे वागते हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाची गरज नाही. खासदार, आमदारकीच्या निवडणुका पार पडल्यानंतर अपेक्षेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांचा बिगुल वाजला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रामुख्याने कार्यकर्त्यांच्या निवडणुका म्हणून ओळखल्या जातात. तीन वर्षांपासून कार्यकर्ते या निवडणुकांची आतुरतेने वाट पहात होते. तर मागील काही वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणात झालेले खळबळजनक बदल आणि युती-आघाड्या पाहून कार्यकर्त्यांनाही कधी एकदा लोकप्रतिनिधी म्हणून राजकारणात सक्रीय होतो, असे झाले होते. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हे राजकीय समीकरण सर्वदूर आणि सर्वच निवडणुकांमध्ये साथरोगाप्रमाणे पसरल्यामुळे जनसेवेसाठी आसुसलेल्यांची निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची गर्दी यंदा डोळे दिपवणारी आहे. शहराच्या विकासासाठी इच्छुकांची तळमळ, पक्षनिष्ठा पणाला लावणारी असल्याचे दिसून येत आहे. विकास या गोंडस नावाखाली कोण, कोणत्याही पक्षात कधीही प्रवेश करून उमेदवारी मिळविण्यासाठी करत असलेली धडपड पाहता निवडणुका संपताच सोलापूरचा झपाट्याने विकास होईल, यात मतदारांनाही शंका नसावी.

### निवडणुकानंतर जाहीरनामे जातात बासनात तर नेते म्हणतात हे तर चुनावी जुमले...

महापालिका निवडणुकीसाठी इलेक्टिव्ह मेरिट पाहून उमेदवारांना मैदानात उतरविण्यासाठी धडपड करणाऱ्या राजकीय पक्षांकडून अद्याप सोलापूरच्या विकासासाठी पक्षाचा जाहीरनामा प्रसिध्द करण्याबाबत काहीच सूतोवाच होताना दिसत नाही. जाहीरनाम्यात मोठ्या गप्पा मारल्या जातात, स्वप्ने दाखवली जातात. पण निवडणूकीनंतर मात्र जाहीरनाम बासनात जातात. इतकेच काय तर नेते उघडपणे म्हणतात, पक्षाचे निवडणूक जाहीरनामे म्हणजे चुनावी जुमले असतात. महापालिका निवडणुकीला उभारण्यासाठी सोलापूरचा विकास यावर निबंध किती जणांनी लिहिलाय हे देखील उघड करणे गरजेचे आहे. सोलापूरची हद्द किती, सोलापुरात पाण्याच्या टाक्या किती, शहराला कुठून आणि कसा पाणीपुरवठा होतो, शहरात किती उद्याने आणि त्याची दशा काय, बीपीएमसी ॲक्टची माहिती किती जणांना आहे. महापालिकेची सभा कशी चालते हे देखील अनेकांना माहिती नसेल. पण नगरसेवक मात्र व्हायचे हे नक्की.

---


### विचारपुष्प



संस्कारांना संक्रमित करण्यात भजन-कीर्तनाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. श्रीकृष्ण चैतन्य महाप्रभूंच्याद्वारे पूर्वोत्तर भारतात पेरलेल्या आस्थेचा चमत्कार सर्व जाणतातच. मोगलकालीन महाराष्ट्रात तुकारामांसारख्या संतांनी भजन-कीर्तनाच्या माध्यमातून केलेले प्रज्वलित नवजागरण नवोन्मेष उत्पन्न करणारे होते.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

### विनम्र अभिवादन



राजमाता जिजाऊ माँसाहेब भोसले यांची तिथीप्रमाणे आज जयंती



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची आज जयंती

### बाजारात परतली तेजी

मुंबई : आठवड्याच्या शेवटच्या दिवशी भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली. जागतिक बाजारातून मिळालेल्या सकारात्मक संकेतांमुळे आणि लार्ज कॅप शेअर्समध्ये पुन्हा खरेदी वाढल्याने निर्देशांक आणि निफ्टी दोन्हींमध्ये तेजीचे वातावरण होते. दिवसअखेर निर्देशांक ५७३ अंकांनी वाढून ८५,७६२ वर बंद झाला तर निफ्टी १८२ अंकांच्या वाढीसह २६,३२८ वर पोहोचला.

# महाराष्ट्रात फक्त मराठीचीच सक्ती

## ● मुख्यमंत्र्यांची सारस्वतांच्या मेळ्यात स्पष्टोक्ती ● साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन






सातारा येथील ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. यावेळी उपस्थित संमेलनाध्यक्ष 'पानिपत'कार विश्वास पाटील आणि मान्यवर

**◆ सातारा, २ जानेवारी**

महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीचीच सक्ती आहे. इतर कोणत्याही भाषेची सक्ती नाही. पण इंग्रजी, फ्रेंच व स्पॅनिशसारख्या परदेशी भाषांना पायघड्या घालायच्या आणि इतर भारतीय भाषांना विरोध करायचा हे योग्य नाही. सर्व भाषांचा सन्मान झाला पाहिजे. पण मातृभाषेचा सन्मान त्याहून अधिक झाला पाहिजे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

साताऱ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, आता नुकताच या ठिकाणी मावळत्या संमेलन अध्यक्षांनी नव्या अध्यक्षांना पदभार सोपवला. किती चांगला हा कार्यक्रम झाला. त्यांनी यांच्या हाती राज्य सोपवले. त्यांनी ते स्वीकारले. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. असे राजकारणातही झाले तर किती चांगले होईल. किमान साहित्य क्षेत्रात तरी अजून होत आहे ही चांगली गोष्ट आहे. हे असेच होत राहावे, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यात्म, तत्त्वज्ञान व सामाजिक जीवनात संगम हेच आपल्या संस्कृतीचे ब्रीदवाक्य राहिले आहे. त्यामुळे जगातील जेवढी आक्रमणे झालीत, ती सगळी आक्रमणे पचवत त्या संस्कृतीतील जे चांगले आहे, ते या ठिकाणी अनुसरून आपली संस्कृती अबाधित ठेवण्याचे काम केले. ज्या प्रकारे कोयना कृष्णेस मिळते, वारणा कृष्णेस मिळते, यमुना गंगेत मिळते अशा वेगवेगळ्या नद्या मिळून शेवटी एका नदीचे पात्र तयार होते. त्याच प्रकारे विचारांची आपली संस्कृती ती त्या एका नदीसारखी आहे. त्यात विविध प्रकारचे (पान ५ वर) ▶

### पाटील, कुलकर्ण्यांना युती करावीच लागते

#### संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील

**◆ सातारा, २ जानेवारी**

मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी बिघडलेले गाव सुधारण्यासाठी पाटील आणि कुलकर्ण्यांना युती करावीच लागते असे विधान करून एका वेगळ्याच सामाजिक चर्चेचा बार उडवून दिला आहे.

मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा, अशी मागणी कुलकर्णी व जोशींनी केली. त्यामुळे बिघडलेले गाव सुधारायचे असेल तर पाटील व कुलकर्ण्यांना युती करावीच लागते, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानाची साहित्य व राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे. विश्वास पाटलांनी यावेळी अण्णाभाऊ साठे यांचा भारतरत्न या देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मान करण्याचीही मागणी केली.

साताराच्या ९९ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी आपण एका पाटलाला बोलावले आहे. पाटील हे आडनाव घेतले की तीन फड डोळ्यापुढे उभे राहतात. कुस्तीचा फड, तमाशाचा फड व उसाचा फड. पण तुमच्यासमोर बोलणारा हा पाटील फक्त शब्दांच्या फडामध्ये रमणारा आहे. येथे ९९ व्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा अशी मागणी जोशी व कुलकर्णींनी केली. तुम्हाला माहिती आहे की बिघडलेले गाव सुधारायचे असेल तर पाटील व कुलकर्ण्यांना युती करावीच लागते. ही आपली जुनी वहिवाट आहे, असे ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

**किडनी विक्री प्रकरण**

### आरोपी गुरुवारीच न्यायालयात हजर

**◆ चंद्रपूर, २ जानेवारी**

किडनी विक्री प्रकरणातील दिल्लीतील आरोपी डॉक्टर रवींद्रपाल सिंह याला २ जानेवारीला चंद्रपूर जिल्हा न्यायालयात हजर होण्याचा आदेश होता. मात्र, तो १ जानेवारीलाच हजर झाला. त्याने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला आणि निघूनही गेला. त्याच्या अर्जावर ३ जानेवारीला सुनावणी होणार आहे. अटकपूर्व जामीन मिळू नये म्हणून पोलिस प्रयत्न करणार आहेत. मात्र, गुरुवारी आरोपी चंद्रपुरात येऊन गेला, त्याची भनकही पोलिसांना लागली नाही.

**पोलिसांना भनकही लागली नाही**

दिल्ली न्यायालयाने आरोपीला २ जानेवारीपर्यंत चंद्रपूर न्यायालयात हजर राहण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार, १ जानेवारी रोजी तो चंद्रपूरच्या न्यायालयात हजर झाला. आता चंद्रपूर न्यायालयात ३ जानेवारी रोजी सुनावणी होणार असल्याची माहिती आहे. दिल्ली आणि तामिळनाडूतील डॉक्टरांच्या सहभागानंतर पोलिस पथकाने २९ डिसेंबर रोजी डॉक्टर सिंहला दिल्लीत ताब्यात घेतले होते. ◀(तभा वृत्तसेवा)

### 'लोकांचा ईव्हीएमवर विश्वास'

नवी दिल्ली : काँग्रेस मागील काही दिवसांपासून ईव्हीएम मशीनबाबत वेगवेगळे दावे करत आहे. खासदार राहुल गांधींनीही यावरून निवडणूक आयोगावर आरोप केले आहे. ईव्हीएम मशीनबाबत कर्नाटक सरकारने एक अधिकृत सर्व्हे केला आहे. या सर्व्हेमध्ये ईव्हीएमवरील प्रश्नाला नवीन वळण दिले आहे. सर्व्हे क्षणानुसार, कर्नाटकातील जनतेचा एक मोठा वर्ग ईव्हीएम सुरक्षित आणि अचूक मानतो. या निकालांनंतर, राहुल गांधी यांच्या मत चोरीच्या आरोपांवरून भाजपाने काँग्रेसवर टीका केली.

# महायुतीचे ६५ उमेदवार विजयी

## भाजपाच्या सर्वाधिक ४४ नगरसेवकांचा समावेश

**मुंबई, २ जानेवारी -**

राज्यातील २९ महानगर पालिकेच्या निवडणुकीआधीच महायुतीचे तब्बल ६५ उमेदवार बिनविरोधी निवडून आले असून, यात सर्वाधिक ४४ भाजपाचे आहेत. तर, विरोधी पक्षाचा १ उमेदवार मालेगावमधून इस्लाम पार्टीच्या मुनिरा शेख फकीर मोहम्मद निवडून आल्या आहेत. राज्यातील २९ महानगर पालिकेतील २ हजार ८६९ पदांसाठी ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ७ हजारांपेक्षा अधिकांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे.

अर्ज माघारीनंतर राज्यातील तब्बल ६६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यात सर्वाधिक ४५ भाजपाचे असून, शिवसेनेचे १८ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे २ अहिल्यानगर मधून निवडून आले आहेत.भाजपाचे सर्वाधिक १५ उमेदवार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या कल्याण-डोंबिवली क्षेत्रातून बिनविरोध निवडून आले आहेत. त्यापाठोपाठ अहिल्यानगर, पनवेल, पुणे, जळगाव, धुळे आदी महापालिकांमध्ये महायुतीचे उमेदवार बिनविरोधी निवडून आले आहेत. नगर पालिका निवडणुकीत महाविकास आघाडीला अस्मान दाखविल्यानंतर, आता महानगर पालिका निवडणुकीच्या रणांगणात उतरण्याआधीच महायुतीने मोठी आघाडी घेतल्याने, महायुतीचा आत्मविश्वास बळावला आहे. तर, दुसरीकडे विरोधकांचे धाबे दणाणले असून, विरोधी खेम्यात स्मशानशांतता पसरलेली दिसत आहे.

## पान १ वरुन

### ....जोशी गल्लीत एकाचा खून

दरम्यान, आजच्या घटनेने 'भाजपा'मधील अंतर्गत चव्हाट्यावर आला आहे. प्रभाग क्रमांक २ मधील 'भाजपा'च्या चारही जागा बिनविरोध करण्यासाठी मोठा दबाव आणला जात होता, असा आरोपही 'मनसे'चे जिल्हाध्यक्ष प्रशांत इंगळे यांनी माध्यमांशी बोलताना केला.

### ...बंडखोरी शमविण्यासाठी नेत्यांची धावपळ

परिस्थिती चिघळू नये म्हणून पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. काही प्रभागांमध्ये उमेदवारांची संख्या कमी असल्याने त्या प्रभागाची निवडणूक बिनविरोध करण्याच्या उद्देशाने भाजपने प्रयत्न केले मात्र ते अपयशी ठरले.

**-आज होणार निवडणूक चिन्ह वाटप :** सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया २३ ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान पार पडली. बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी अर्जांची छाननी व वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली. अर्ज मागे घेण्यासाठी शुक्रवार, दि.२ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत होती. शनिवार, दि.३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. गुरुवार, दि.१५ जानेवारी रोजी मतदान तर शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे.

**-पांडुरंग दिड्डी, प्रभाकर जामगुंडे यांचीही माघार :** भाजपातील अभ्यासू, अनुभवी, ज्येष्ठ नेते म्हणून परिचित असलेले माजी विरोधी पक्षनेते पांडुरंग दिड्डी, प्रभाकर जामगुंडे या दोघांनीही पक्षाचे आदेश शिरसांवद्य मानून आपापले उमेदवारी अर्ज मागे घेतले. अनेक वर्ष पक्षाशी एकनिष्ठ राहिलो. पक्षाने इतर नवीन उमेदवारास संधी दिली. त्यांना निवडून आणण्याकामी कसोशीने प्रयत्न करणार असल्याने दिड्डी व जामगुंडे यांनी सांगितले.

**-जगदीश पाटील यांना अश्रू अनावर :** भाजपाचे माजी नगरसेवक जगदीश पाटील यांनीही आपला उमेदवारी अर्ज अखेर मागे घेतला.



यावेळी पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, गेल्या ४० वर्षापासून एकनिष्ठपणे मी भाजपाशी जोडून आहे. मात्र उमेदवारी न मिळाल्याने पक्षासाठी मी अर्ज माघारी घेतला. अन्याय झाला का? असे विचारताच ते भावनिक झाले. त्यांना अश्रू अनावर झाले होते.

**-अन् बिनविरोधची शक्यता झाली धुसर :** सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी काही प्रभागांमधील जागांवर भाजपाबरोबर अपक्ष तीन चार उमेदवार यांचा भरणा तर काही ठिकाणी महाआघाडीच्या नियोजन चुकलेल्या प्रकारामुळे त्याठिकाणी इतर कोणतेही पक्ष नसल्याने अशा ठिकाणी भाजपा उमेदवार बिनविरोध निवडून आणण्याचा प्रयत्न झाला. मात्र तो अयशस्वी ठरला. आता सर्व जागांवर निवडणूक होणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापूर महापालिका निवडणूक २०२६ : पक्षनिहाय उमेदवारांची नावे

**प्रभाग १ अ. (अनुसुचित जाती)**

| | |
|---|---|
| भाजप | गौतम कसबे |
| राष्ट्रवादी | सुजीत अवघडे |
| ठाकरे गट | रमेश व्हटकर |
| वंचित | रवींद्र गायकवाड |
| बीएसपी | बबलू गायकवाड |

**१ ब ( ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | राजश्री कणके |
| राष्ट्रवादी | नंदा कांगरे |
| ठाकरे गट | आरती वीटकर |
| वंचित | किरण रुपनर |
| बीएसपी | शहनाज मोमीन |

**१ क (सर्वसाधारण महिला) :**

| | |
|---|---|
| भाजप | पूजा काशीद |
| शिवसेना | सपना कोळी |
| काँग्रेस | शुभांगी जाबा |
| राष्ट्रवादी | शुभांगी कळंब |
| वंचित | शिलवंता गायकवाड |
| बीएसपी | भगीरथी शिंदे |

**१ ड (सर्वसाधारण )**

| | |
|---|---|
| भाजप | अविनाश पाटील |
| शिवसेना | संजय सरवदे |
| राष्ट्रवादी | सिध्दाराम आनंदकर |
| राष्ट्रवादी | राकेश सोनी |
| वंचित | सुहास सावंत |

**प्रभाग २ अ. (अनुसुचित जाती )**

| | |
|---|---|
| भाजप | नारायण बनसोडे |
| ठाकरे गट | प्रशांत कावळे |
| राष्ट्रवादी | नीलेश होटकर |

**२ ब (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | कल्पना कारभारी |
| मनसे | संध्या भोसले |

**२ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | शालन शिंदे |
| शिवसेना | आफ्रिन पठाण |

**२ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | डॉ.किरण देशमुख |
| शिवसेना | गणेश कुलकर्णी |
| राष्ट्रवादी | मुस्ताक पटेल |
| ठाकरे | दिनेश चव्हाण |

**प्रभाग ३ अ (ओबीसी )**

| | |
|---|---|
| भाजप | राजू पाटील |
| शिवसेना | सुरेश बिद्री |
| काँग्रेस | रोहित कारमपुरी |

**३ ब (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | स्वाती बडगु |
| शिवसेना | उर्वशी पाटील |
| काँग्रेस | महानंदा शिरसीकर |

**३ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | रंजिता चाकोते |
| काँग्रेस | रमाबाई पांडगळे |

**३ ड(सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | संजय कोळी |
| शिवसेना | सुरेश पाटील |
| काँग्रेस | सिध्दाराम चाकोते |
| आप | जुबेर पटेल |

**प्रभाग ४ अ (अनुसुचित जाती)**

| | |
|---|---|
| भाजप | वंदना गायकवाड |
| काँग्रेस | संघमित्रा चौधरी |
| राष्ट्रवादी | कविता चंदनशिवे |
| वंचित | पल्लवी सुरवसे |
| बीएसपी | सुरेखा बाळशंकर |

**४ ब (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | विनायक विटकर |
| राष्ट्रवादी | सुशील बंदपट्टे |
| वंचित | मल्लिकार्जुन हिरेमठ |

**४ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | ऐश्वर्या साखरे |
| राष्ट्रवादी | सारिका फुटाणे |
| ठाकरे गट | प्रिया बसवंती |
| बीएसपी | रेश्मा मुल्ला |
| वंचित | पूजा धोत्रे |

**४ ड (सर्वसाधारण) :**

| | |
|---|---|
| भाजप | अनंत जाधव |
| राष्ट्रवादी | विश्वनाथ बिडवे |
| वंचित | धम्मपाल इंगळे |
| रासप | देवेंद्र लोंढे |

**प्रभाग ५ अ (अनुसुचित जाती)**

| | |
|---|---|
| भाजप | समाधान आवळे |
| राष्ट्रवादी (अप) | आनंद चंदनशिवे |
| काँग्रेस | प्रणा बंगाळे |
| वंचित | नागेश पाटोळे |
| रिपाइं | शिवम सोनकांबळे |
| बीएसपी | चंद्रशेखर उघडे |

**प्रभाग ५ ब ( ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | अलका भंवर |
| राष्ट्रवादी | भाग्यश्री काळे |
| राष्ट्रवादी (शप) | संपदा खांडेकर |
| बीएसपी | दर्शना दुगाणे |
| रिपाइं | अर्चना राजपूत |

**प्रभाग ५ क ( सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | मंदाकिनी तोडकरी |
| राष्ट्रवादी | महादेवी रणदिवे |
| ठाकरे गट | अनुजा तोडकरी |
| बीएसपी | प्रज्ञा लोंढे |
| रिपाइं | माधवी काळे |
| वंचित | पौर्णिमा हरिजन |

**प्रभाग ५ ड ( सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | बिज्जू प्रधाने |
| राष्ट्रवादी | गणेश पुजारी |
| बसपा | महेश मुंदडा |
| ठाकरे गट | परमेश्वर सावंत |
| रिपाइं | सुजित कोकरे |

**प्रभाग ६ अ (अनुसुचित जाती महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | सोनाली गायकवाड |
| शिवसेना | अनिता गवळी |
| वंचित | रेणुका शिराळकर |

**प्रभाग ६ ब (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | सुनील खटके |
| शिवसेना | हर्षल गायकवाड |
| बसपा | भाग्यश्री पांढरे |
| आप | अमोल पूदे |

**प्रभाग ६ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | मृण्मयी गवळी |
| शिवसेना | पूजा चव्हाण |
| वंचित | कविता उघडे |

**प्रभाग ६ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | गणेश वानकर |
| शिवसेना | मनोज शेजवाल |
| आप | आकाश गायकवाड |

**प्रभाग ७ अ (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | आनंद कोलारकर |
| शिवसेना | अनिकेत पिसे |
| राष्ट्रवादी (शप) | सुमित भोसले |

**प्रभाग ७ ब (सर्वसाधारण महिला )**

| | |
|---|---|
| भाजप | श्रध्दा पवार |
| राष्ट्रवादी | मनीषा कणसे |
| राष्ट्रवादी (शप) | मनीषा माने |
| रासप | मनीषा भोसले |

**प्रभाग ७ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | उत्तरा बचुटे (बरडे) |
| राष्ट्रवादी (शप) | शीतल गादेकर |
| शिवसेना | मनोरमा सपाटे |

**प्रभाग ७ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | पद्माकर काळे |
| शिवसेना | अमोल शिंदे |

**प्रभाग ८ अ (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | अमर पुदाले |
| राष्ट्रवादी | उमेर सय्यद |
| राष्ट्रवादी | नकिब कुरेशी |
| एमआयएम | इम्रान हवालदार |

**८ ब (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | गीता गवई |
| ठाकरे गट | मेघा बेळमकर |
| राष्ट्रवादी | उल्फत सौदागर |

**८ क ( सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | बबिता धुम्मा |
| काँग्रेस | गोदावरी मोकाशी |
| मनसे | सुषमा हिबारे |

**८ ड ( सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | गौरीशंकर दर्गो पाटील |
| ठाकरे गट | शशिकांत बिराजदार |
| राष्ट्रवादी | एमएमडी मुतवल्ली |
| एमआयएम | बशीर शेख |

**प्रभाग ९ अ (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | शेखर इगे |
| काँग्रेस | दत्तू बंदपट्टे |
| राष्ट्रवादी | अबोली मंजेली |

**९ ब (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | कादंबरी मंजेली |
| राष्ट्रवादी | लक्ष्मी बडगु |
| माकप | गीता वासम |

**९ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | पूजा वाडेकर |
| राष्ट्रवादी | भानुप्रिया बोगा |
| माकप | अरुणा आडम |

**९ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | मेघनाथ येमूल |
| राष्ट्रवादी | तुषार जक्का |
| ठाकरे गट | सुरेश गायकवाड |

**प्रभाग १० अ (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | उज्वला दासरी |
| अपक्ष | कुमुद अंकाराम |
| अपक्ष | अरुणा कोंडले |
| अपक्ष | श्वेता दासरी |
| अपक्ष | रुचिरा मासम |

**प्रभाग १० ब (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | दीपिका यलदंडी |
| काँग्रेस | प्रिती देवकते |
| राष्ट्रवादी | दीपाली जाधव |
| शिवसेना | कृष्णवेणी कोंडा |

**प्रभाग १० क (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | सतीश सिरसिल्ला |
| राष्ट्रवादी | रुपेशकुमार भोसले |
| शिवसेना | हेमलता गायकवाड |

**प्रभाग १० ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | प्रथमेश कोठे |
| शिवसेना | शंकर बटगिरी |

**प्रभाग ११ अ (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | युवराज सरवदे |
| राष्ट्रवादी | अहमद मोमीन |
| शिवसेना | लोकेश नंदाल |
| ठाकरे गट | शुभम स्वामी |

**प्रभाग ११ (ब) (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | शारदा रामपुरे |
| काँग्रेस | कल्पना रव्वा |
| शिवसेना | दीपीका माळी |
| राष्ट्रवादी | लक्ष्मी बनसोडे |

**११ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | मीनाक्षी कडगंची |
| ठाकरे गट | सोनाली नवले |
| राष्ट्रवादी | रईसा शेख |

**११ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | अजय पोन्नम |
| काँग्रेस | धोंडप्पा तोरणगी |
| राष्ट्रवादी | राजेंद्र कलंत्री |
| प्रहार | अब्बासअली यादगीर |

**प्रभाग १२ अ (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | विनायक कोंड्याल |
| शिवसेना | श्रीनिवास पोतन |
| ठाकरे गट | प्रसाद माने |

**१२ ब (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | सारिका खजुरगी |
| ठाकरे गट | अमिता जगदाळे |

**१२ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | अर्चना वडनाल |
| शिवसेना | स्नेहा श्रीराम |

**१२ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | सिध्देश्वर कमटम |
| काँग्रेस | मौलाली पटेल |
| शिवसेना | डॉ.राजेश अनगिरे |

**प्र.१३ अ (अनुसुचित जाती महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | सुनीता कामाठी |
| शिवसेना | गीता म्हेत्रे |
| माकप | सुषमा सरवदे |

**प्रभाग १३ ब ( ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | अंबिका चौगुले |
| शिवसेना | शिवम्मा बंदपट्टे |
| माकप | अनिता आडम |

**प्रभाग १३ क (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | सत्यनारायण गुर्रम |
| शिवसेना | जयंत होले-पाटील |
| माकप | श्रीनिवास म्हेत्रे |

**प्रभाग १३ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | विजय चिप्पा |
| शिवसेना | श्रीधर आरगोंडा |
| राष्ट्रवादी | इम्रान पठाण |
| ठाकरे गट | वल्लभ चौगुले |

**प्रभाग १४ अ (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | विजयलक्ष्मी कंदलगी |
| काँग्रेस | कुदुसिया मणियार |
| राष्ट्रवादी | नसीमा एजाज |
| एमआयएम | अकीला भागनगरी |

**प्रभाग १४ ब (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | चेतन पडवळकर |
| काँग्रेस | नसीम खलिफा बागवान |
| राष्ट्रवादी | सैफोद्दीन मणियार |
| एमआयएम | असिफ शेख |
| समाजवादी | राजासाहेब बागवान |
| आप | अश्पाक बागवान |

**प्रभाग १४ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | श्रध्दा साका |
| काँग्रेस | शहजादी बेगम बडेपीर |
| राष्ट्रवादी | सादिका शेख |
| एमआयएम | वाहिदाबानो शेख |
| महाराष्ट्र विकास आघाडी | विजया बंगाळे |

**प्रभाग १४ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | तुषार पवार |
| काँग्रेस | शोएब महागामी |
| राष्ट्रवादी | मोहम्मद कलीम बागवान |
| एमआयएम | तौफिक हत्तुरे |
| समजवादी | रियाज खरादी |
| आप | जुबेर हिरापुरे |
| अपक्ष | रफिक मोहोळकर |

**प्र. १५ अ (अनुसुचित जाती महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | श्रीदेवी फुलारे |
| काँग्रेस | सपना मॅगेरी |
| बहुजन मुक्ती पार्टी | योगिता वाघमारे |

**प्रभाग १५ ब (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | विजया खरात |
| काँग्रेस | कल्पना नरोटे |
| आप | मोनिका सरकार |

**प्रभाग १५ क (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | विनोद भोसले |
| काँग्रेस | आरिफ शेख |
| राष्ट्रवादी | महेश गाडेकर |
| समाजवादी | अमजद मुजावर |
| आप | नीलेश संगेपाग |

**प्रभाग १५ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | अंबादास करगुळे |
| काँग्रेस | चेतन नरोटे |
| शिवसेना | सागर शितोळे |

**प्रभाग १६ अ (अनुसुचित जाती)**

| | |
|---|---|
| भाजप | रतिकांत कमलापुरे |
| काँग्रेस | नरसिंह आसादे |
| शिवसेना | कुमार जंगडेकर |
| वंचित | दीपक गवळी |
| जनविकास क्रांती सेना | विक्रम कसबे |

**प्रभाग १६ ब ( ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | श्वेता खरात |
| काँग्रेस | बिलकिसबानू खान |
| राष्ट्रवादी | प्रिती वाडे |
| एमआयएम | मुबरा पठाण |

**प्रभाग १६ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | कल्पना कदम |
| काँग्रेस | सीमा यलगुलवार |
| शिवसेना | मीनाक्षी शिंदे |
| एमआयएम | फिरदोस पटेल |

**प्रभाग १६ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | दिलीप कोल्हे |
| काँग्रेस | नरसिंग कोळी |
| शिवसेना | प्रियदर्शन साठे |
| एमआयएम | गाझी जहागीरदार |
| समाजवादी | ॲड.यु.एन.बेरिया |

**प्रभाग१७ अ (अनुसुचित जाती महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | निर्मला जंगम |
| काँग्रेस | शुभांगी लिंगराज |
| राष्ट्रवादी | नूतन गायकवाड |
| शिवसेना | लक्ष्मी माढेकर |
| एमआयएम | माधुरी म्हेत्रे |

**प्रभाग १७ ब (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | भारतसिंग बडुरवाले |
| काँग्रेस | परशुराम सतारेवाले |
| राष्ट्रवादी | इब्राहिम कुरेशी |
| शिवसेना | सुमित मनसावाले |
| एमआयएम | हारिस कुरेशी |

**प्रभाग १७ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | जुगनबाई अंबेवाले |
| राष्ट्रवादी | गीता गुडूर |
| एमआयएम | यास्मिन पठाण |

**प्रभाग १७ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | रवी कय्यावाले |
| शिवसेना | अंबादास गोरंटला |
| राष्ट्रवादी | मोहसीना नदाफ |
| काँग्रेस | वाहिद विजापूरे |
| एमआयएम | जुबेर जब्बार |
| आप | मल्लिकार्जुन पिलगिरी |

**प्रभाग १८ अ ( ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | श्रीकांचना यन्नम |
| शिवसेना | निर्मला पासकंटी |

**प्रभाग १८ ब (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | राजश्री दोडमनी |
| शिवसेना | महादेवी हिटनळ्ळी |
| माकप | नलिनी कलबुर्गी |

**प्रभाग १८ क (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | प्रशांत पल्ली |
| शिवसेना | संतोष संगा |
| राष्ट्रवादी (शप) | अंबादास नडगिरे |
| एमआयएम | सादिक नदाफ |

**प्रभाग १८ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | शिवानंद पाटील |
| काँग्रेस | आयाज आळंद |
| शिवसेना | सुनील निंबाळकर |
| मनसे | विशाल गुजले |

**प्रभाग १९ अ (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | कविता जंगम |
| काँग्रेस | विजयालक्ष्मी काळपगार |
| शिवसेना | प्रियांका विटकर |

**प्रभाग १९ ब (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | व्यंकटेश कोंडी |
| शिवसेना | श्रीनिवास करली |
| ठाकरे गट | कुंदन गायकवाड |

**प्रभाग १९ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | कलावती गदगे |
| शिवसेना | सुनंदा जमादार |
| ठाकरे गट | राणी गंधुरे |

**प्रभाग १९ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | बसवराज केंगनाळकर |
| काँग्रेस | शिवशंकर अंजनाळकर |
| शिवसेना | पवन देसाई |

**प्रभाग २० अ (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | वहिदाबी शेख |
| काँग्रेस | अनुराधा काटकर |
| राष्ट्रवादी | कुरेशा मुल्ला |
| एमआयएम | सफिया चौधरी |

**प्रभाग २० ब (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | पूजा वाघमारे |
| राष्ट्रवादी | परवीन इनामदार |
| राष्ट्रवादी (शप) | नुसरत शेख |
| एमआयएम | अनिसा मोगल |

**प्रभाग २० क (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | झीशान सय्यद |
| राष्ट्रवादी | अबूबकर सय्यद |
| राष्ट्रवादी | सिध्दार्थ रणधीरे |
| एमआयएम | अजहर हुंडेकरी |
| आप | मंजूर खानापुरे |

**प्रभाग २० ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | अमीर शेख |
| काँग्रेस | अझरोद्दीन शेख |
| शिवसेना | मोहसीन शेख |
| राष्ट्रवादी | तौफिक शेख |
| एमआयएम | अझरोद्दीन जहागीरदार |
| आप | अजहर शेख |

**प्र.२१ अ (अनुसुचित जाती महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | संगीता जाधव |
| शिवसेना | पूजा खंदारे |
| काँग्रेस | प्रतीक्षा निकाळजे |

**प्रभाग २१ ब (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | शिवाजी वाघमोडे |
| काँग्रेस | रियाज हुंडेकरी |
| शिवसेना | अक्षय पकाले |

**प्रभाग २१ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | मंजिरी किल्लेदार |
| काँग्रेस | किरण टेकाळे |
| शिवसेना | मीना दास |

**प्रभाग २१ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | सात्विक बडवे |
| ठाकरे गट | भीमाशंकर म्हेत्रे |

**प्रभाग २२ अ (अनुसुचित जाती)**

| | |
|---|---|
| भाजप | दत्तात्रय नडगिरी |
| काँग्रेस | संजय हेमगड्डी |
| राष्ट्रवादी | अजित बनसोडे |
| शिवसेना | सुधीर संगेपाग |
| एमआयएम | सचिन कोलते |
| वंचित | कीर्तिपाल गोडंगुबे |

**२२ ब (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | अंबिका गायकवाड |
| काँग्रेस | अर्चना जाधव |
| शिवसेना | अंजू गायकवाड |
| राष्ट्रवादी | अंबिका जाधव |
| एमआयएम | शोभा जाधव |

**२२ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | चैताली जाधव |
| काँग्रेस | राजनंदा डोंगरे |
| शिवसेना | अनिता बुक्कानुरे |
| राष्ट्रवादी | तहेसीन शेख |
| एमआयएम | असीया शेख |
| वंचित | सुषमा फडतरे |

**२२ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | किसन जाधव |
| काँग्रेस | कुणाल गायकवाड |
| शिवसेना | नितीन गायकवाड |
| राष्ट्रवादी | जुबेर शेख |
| एमआयएम | सिराज शेख |
| वंचित | रमेश सुतकर |
| रिपाइं | संगणबसप्पा बिराजदार |

**प्रभाग २३ अ (अनुसुचित जाती) :**

| | |
|---|---|
| भाजप | सत्यजित वाघमोडे |
| राष्ट्रवादी | अनिल बनसोडे |
| शिवसेना | मदन कोलके |
| राष्ट्रवादी (शप) | सुनीता रोटे |
| वंचित | धर्मराज दुरके |

**प्रभाग २३ ब (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | आरती वाकसे |
| काँग्रेस | दीपाली शाह |
| शिवसेना | कृष्णाबाई बिरादार |
| अपक्ष | मेनका राठोड |

**प्रभाग २३ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | ज्ञानेश्वरी देवकर |
| शिवसेना | लता गायकवाड |
| ठाकरे गट | अलका राठोड |
| राष्ट्रवादी | चित्रा कांबळे |
| बसपा | माणिकम्मा कोळी |

**प्रभाग २३ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | राजशेखर पाटील |
| शिवसेना | प्रकाश राठोड |
| ठाकरे गट | लक्ष्मण जाधव |
| बसपा | राहुल जरग |
| वंचित | सुभाष गायकवाड |

**प्रभाग २४ अ (अनुसुचित जाती)**

| | |
|---|---|
| भाजप | मधुसूदन जंगम |
| काँग्रेस | शिवलिंग कांबळे |
| शिवसेना | सतीश म्हस्के |

**२४ ब (अनुसुचित जमाती महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | वनिता पाटील |
| शिवसेना | उषा काळे |
| ठाकरे गट | संध्या काळे |

**२४ क (ओबीसी महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | अश्विनी चव्हाण |
| अपक्ष (शिवसेना पुरस्कृत) | शैलजा राठोड |

**प्रभाग २४ ड (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | नरेंद्र काळे |
| काँग्रेस | राजू चव्हाण |
| शिवसेना | विकास कदम |
| आप | आनंदकुमार जाधव |
| रासप | संपन्न दिवाकर |

**प्रभाग२५ अ (अनुसुचित जाती महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | सुमन चाबुकस्वार |
| काँग्रेस | सरस्वती आठवले |
| राष्ट्रवादी | सुरेखा काळे |

**प्रभाग २५ ब (ओबीसी)**

| | |
|---|---|
| भाजप | नागेश ताकमोगे |
| काँग्रेस | विजयकुमार हत्तुरे |
| शिवसेना | धनंजय कारंडे |
| राष्ट्रवादी | वैभव हत्तूरे |
| प्रहार | मकबुल मुल्ला |

**प्रभाग २५ क (सर्वसाधारण महिला)**

| | |
|---|---|
| भाजप | वैशाली भोपळे |
| काँग्रेस | रिझवान सगरी |
| राष्ट्रवादी | सुकेशनी गंगोडा |
| शिवसेना | शोभा चौगुले |

**प्रभाग २६ अ (अनुसुचित जाती)**

| | |
|---|---|
| भाजप | संगीता जाधव |
| राष्ट्रवादी | किरण सर्वगोड |
| राष्ट्रवादी (शप) | नागिणी इरकशेट्टी |
| वंचित | संगीता सुरवसे |
| बीएसपी | पल्लवी कांबळे |

**प्रभाग २६ ब (अनुसुचित जमाती)**

| | |
|---|---|
| भाजप | दीपक जमादार |
| काँग्रेस | रविकुमार यलगुलवार |
| अपक्ष | राजेश काळे |

**प्रभाग २६ क (सर्वसाधारण)**

| | |
|---|---|
| भाजप | जयकुमार माने |
| काँग्रेस | नितीन घुगे |
| राष्ट्रवादी | सागर हत्तुरे |
| बसपा | सुहास सुरवसे |

सोलापूर तरुण भारत



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# बुलेट ट्रेनचे स्वप्न साकारतेय...

लहानपणी मामाच्या गावाला जाण्यासाठी रेल्वे गाडीत बसल्यानंतर 'झुकझुक झुकझुक अगीन गाडी, धुरांच्या रेषा हवेत काढी, पळती झाडे पाहू या, मामाच्या गावाला जाऊ या', हे गाणे म्हटल्याचे साऱ्यांनाच आठवत असेल. या गाण्यावर मराठी मुलखातील अनेक पिढ्यांचे बालपण सरले. अन्य प्रदेशांतही रेल्वेगाडीशी सांस्कृतिक बंध सांगणारी गाणी-कथा आहेत. काळ बराच पुढे सरकला. धुरांच्या रेषाही हवेत निघण्याचा काळ कधीच मागे सरला आहे. भारतात अद्ययावत रेल्वेगाड्यांचे युग अवतरते आहे. बुलेट ट्रेनने मामाच्या गावाला जाण्याचे दिवस आले आहेत. त्यासाठी सध्या तरी एकच अट आहे आणि ती म्हणजे तुमचा मामा मुंबई वा अहमदाबादला राहणारा असावा. बुलेट ट्रेनचे जे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना दाखवले होते, ते आता प्रत्यक्षात येत आहे. देशातील पहिल्या मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे उद्घाटन १५ ऑगस्ट २०२७ होणार असल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नववर्षाच्या पहिल्या दिवशी केली, ही सर्वांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची आणि अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. भारतीय रेल्वेच्या इतिहासातील हा सुवर्णक्षण होय. 'मोदी है तो मुमकीन है' असे म्हटले जाते. प्रत्यक्षात मोदी यांनी काय काय मुमकीन करून ठेवले, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. बुलेट ट्रेन आपल्या देशात धावू शकेल, याची कल्पनाही कोणी केली नव्हती इतका हा अफाट विकास आहे.

चीन, फ्रान्स, जपान, जर्मनीनंतर भारताचा बुलेट ट्रेन असलेल्या जगातील निवडक देशांच्या यादीत समावेश होत आहे, ही समस्त भारतीयांसाठी अतिशय अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. बंदुकीतून ज्या गतीने गोळी बाहेर पडते, त्या गतीने या गाड्या धावत असल्यामुळे त्यांना बुलेट ट्रेन म्हटले जात असावे. बुलेट ट्रेनने महाराष्ट्र आणि गुजरात यांना आणखी जवळ आणले आहे. या दोन राज्यांतील आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा नव्याने पाया घातला आहे. भारतातील पहिल्या बुलेट ट्रेनसाठी आपल्याला जपानने तांत्रिक आणि आर्थिक मदत केली. जपानचे पंतप्रधान शिंजो ॲबे २०१५ मध्ये भारत दौऱ्यावर आले होते. तेव्हा देशात बुलेट ट्रेनचा पाया घातला गेला. २०२५ संपता-संपता त्यावर कळस चढला आहे. बुलेट ट्रेन बनवण्यासाठी अवाढव्य खर्च येतो, जो आपल्याला करणे अशक्य नसले तरी थोडे अडचणीचे झाले असते. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी १ लाख ८ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. जपान आपल्या मदतीला धावून आला. जपानने यातील ८८ हजार कोटी रुपये ०.१ टक्का एवढ्या नाममात्र व्याजदरात देण्याची तयारी दर्शवली. या कर्जाची परतफेड आपल्याला ९०५०० कोटी रुपये एवढी करावी लागणार आहे. म्हणजे अधिकचे फक्त २५०० कोटी द्यावे लागणार आहेत आणि ते देखील ५० वर्षांत. देशात बुलेट ट्रेन धावायला लागून १५ वर्षे उलटतील तेव्हा ही परतफेड सुरू होईल. जगात जपानचे बुलेट ट्रेनचे तंत्रज्ञान सर्वांत सुरक्षित मानले जाते. यावरून आपण मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी जपानच्या तंत्रज्ञानाला पसंती का दिली, याची कल्पना येऊ शकते.

जगातील ईटीआर २०० नावाची पहिली बुलेट ट्रेन इटलीत १९३७ मध्ये धावली होती. या सुपरफास्ट गाडीची गती त्यावेळी ताशी ८० किमी होती. त्यानंतर १९६४ मध्ये जपानमध्ये पहिली बुलेट ट्रेन शिंकान्सेन या तंत्रज्ञानावर सुरू करण्यात आली. ताशी १३० किमी ही या गाडीची तेव्हाची गती होती. भारतात सुरू होणाऱ्या बुलेट ट्रेनही गती ताशी ३२० किमी असेल. यावरून बुलेट ट्रेनच्या तंत्रज्ञानात काळानुरूप किती वेगाने बदल झाला आणि त्याला बुलेट ट्रेन का म्हणतात, याचा आपल्याला अंदाज येऊ शकतो. समाधानाची बाब म्हणजे भारतातील बुलेट ट्रेन शिंकान्सेन या तंत्रज्ञानावरच आधारित आहे. नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये पहिल्यांदा पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून देशातील पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात जेवढा बदल आणि विकास मोदी यांच्या कार्यकाळात झाला, तेवढा याआधी एकाही सरकारच्या कार्यकाळात झाला नाही. मोदींच्या काळातच देशात वंदे भारत गाड्याही सुरू झाल्या. या गाड्या अतिशय कमी वेळात लोकप्रिय झाल्या. कारण वंदे भारतमधील डब्यांची नव्या तंत्रज्ञानाने केलेली बांधणी. वंदे भारतमध्ये बसल्यावर प्रवाशांना विमानात बसल्याचे समाधान मिळते. देशाच्या अनेक भागांत वंदे भारत धावत आहे. देशातील पहिल्या वंदे भारत शयनयान गाडीला पंतप्रधान मोदी जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

मोदी सरकारने रेल्वे क्षेत्राचा कायापालट करून टाकला. अनेक रेल्वेस्थानकांचे अत्याधुनिकीकरण सुरू आहे. अनेक रेल्वेस्थानके विमानतळासारखी झाली आहेत. रेल्वेतून प्रवास करण्याला मोदी यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. २०१४ च्या आधी व त्यानंतरची रेल्वे प्रवासाची स्थिती पाहिली तर तीत आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्या लक्षात येईल. याला मोदींचे दूरदर्शी नेतृत्व जसे जबाबदार आहे, तसेच विद्यमान रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची धडाडीही कारणीभूत आहे. रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारत राजीनामा देणारे लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे संवेदनशील रेल्वेमंत्री या देशाने पाहिले आहेत. नव्या काळात रेल्वे अपघाताच होऊ नयेत म्हणून पूर्ण क्षमतेने आणि खबरदारीने काम करणारे तसेच त्यासाठी कवचसारख्या नव्या तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणारे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव लाभलेत, हे देशाचे भाग्यच म्हटले पाहिजे.

गेल्या दशकभरात रेल्वे गाड्यांतील स्वच्छता, गाड्या धावण्याचा वक्तशीरपणा, गाड्यांची वाढलेली गती, रेल्वेतील खानपानाच्या दर्जात झालेली सुधारणा आणि रेल्वे अपघातांची कमी झालेली संख्या यांचा आढावा घेतला तर मोदी सरकारने रेल्वेच्या क्षेत्रात काय काम केले, याचा अंदाज आपल्याला येऊ शकतो. देशात अनेक प्रकारच्या नव्या जलदगती गाड्या मागील अकरा वर्षांत सुरू झाल्या. या गाड्यांनी रेल्वे प्रवासाचा चेहरामोहरा बदलला. याआधी गाड्या अतिशय विलंबाने धावायच्या. याबाबतचा एक किस्सा अतिशय गाजला आहे. एक गाडी ठरल्यावेळेला रेल्वेस्थानकावर आली. राईट टाईम गाडी आल्याचा सर्वांनाच आनंद झाला, पण तो काही क्षणच टिकला. कारण ही गाडी राईट टाईम नव्हे तर २४ तासांच्या विलंबाने रेल्वेस्थानकावर आल्याचे नंतर स्पष्ट झाले. यातील गमतीचा भाग सोडला तरी असे दशकभरापूर्वी पर्यंत नेहमीच होत होते. जनतेनेही तशी स्वत:ची मानसिकता करून घेतली होती. या पृष्ठभूमीवर आपल्या देशात बुलेट ट्रेन सुरू होणे ही अतिशय मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. पहिल्या बुलेट ट्रेनच्या उद्घाटनानंतर मोदी सरकारने स्वस्थ बसू नये. महामार्गांच्या जाळ्याच्या धर्तीवर बुलेट ट्रेनचे जाळे उभारले जावे आणि त्यासाठी लगेच सुरुवात केली जावी. मोदी पंतप्रधान असल्यामुळे हे अशक्य नाही. अशक्य ते शक्य करून दाखवणे हीच मोदींची कार्यपद्धती आहे. मोदी फक्त स्वप्ने दाखवत नाहीत तर ती प्रत्यक्षात आणण्याचीही हमी देतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. देशातील पहिल्या बुलेट ट्रेनच्या लोकार्पणाची रीतसर घोषणा झाली आहे. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, भारत सरकारमधील सर्व मंत्री आणि या प्रकल्पासाठी ज्यांचे-ज्यांचे हात लागले, त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे. देर आए, दुरुस्त आए, असे म्हणतात. आपल्याला बुलेट ट्रेन सुरू करण्यास उशीर झाला, हे खरेच आहे. काँग्रेसच्या सरकारांनी या विषयात लक्ष घालण्यापेक्षा रेल्वे खात्याकडे मलिद्याचे खाते म्हणूनच पाहिले. नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यावर रेल्वे क्षेत्राचाही विकास केला पाहिजे, असा विचार प्रथम आला आणि त्याची अंमलबजावणीही झाली. असंख्य आव्हाने असलेल्या भारतासारख्या महाकाय देशात बुलेट ट्रेन सुरू होतेय, हा फारच आनंदाचा विषय आहे. हा आनंद लवकरात लवकर समस्त देशवासीयांच्या वाट्याला येवो.

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# २०२६ वर्ष शहरी नक्षलीमुक्त व्हावं!

आपण २०२६ या नव्या वर्षात पदार्पण केले आहे. नव्या वर्षाचे नवे संकल्प असतात. मात्र बऱ्याचदा आरंभशूर म्हणून आपण संकल्प घेतो. ते पूर्ण करण्यासाठी आपण संघर्ष करतो, झटतो. मात्र दोन आठवड्यांतच आपला संकल्प मोडला जातो. हे वैयक्तिक संकल्पाबाबत घडते. त्यामुळे काही प्रमाणात आपले नुकसान होते. पण जेव्हा व्यापक संकल्प घेण्याची वेळ येते तेव्हा आरंभशूर होऊन चालत नाही. हजारो वर्षे ज्यू ''नेक्स्ट इयर इन जेरुसलेम'' म्हणत संकल्प घेत होते. त्यासाठी काही थेट वा गुप्त कृती होत असेल. पण हा संकल्प नित्यनेमाने पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत होता आणि एक दिवस खरोखर इस्रायल नावाचं राष्ट्र उभं राहिलं. त्याचप्रमाणे हिंदू देखील १९४७ पासून १४ ऑगस्टला अखंड भारतासाठी संकल्प घेतात. हा संकल्प कधी पूर्ण होईल याची शाश्वती आता देता येत नाही. ज्यूंची अवस्था तर आपल्यापेक्षा हजार पटींनी वाईट होती. तरी देखील त्यांचा संकल्प पूर्ण झाला. राम मंदिराचे उदाहरण घ्या. प्रत्येक हिंदूने संकल्प घेऊन पिढ्यान्‌पिढ्या तो जपून आज राम मंदिर उभे राहिले आहे. हे झाले व्यापक संकल्प. ज्यासाठी अनेक पिढ्या खर्च कराव्या लागतात. मात्र भारतात अनेक संकटे आहेत. ज्यांचा बंदोबस्त करणे शक्य आहे. त्यापैकी एक संकट म्हणजे शहरी नक्षलवाद.

विवेक अग्निहोत्री यांनी 'अर्बन नक्सल्स' नावाचे पुस्तक लिहिले आणि पाहता पाहता हा शब्द प्रचलित झाला. हा शब्द शहरातील बुद्धिजीवी, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांसाठी वापरण्यात आला आहे, यामध्ये हे लोक माओवादी विचारधारेचा प्रचार करतात, आंदोलने हायजॅक करतात आणि देशाच्या एकतेला आव्हान देतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्च २०२५ मध्ये सांगितले होते की, नक्षलवाद जंगलातून तर संपत चालला आहे, पण शहरांमध्ये मुळे रोवत आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी २०२५ च्या अखेरीस घोषणा केली की ३१ मार्च २०२६ पर्यंत भारत नक्षलमुक्त होईल. जंगलातील नक्षलवादावर सरकार उत्तम प्रकारे काम करत आहे. पण शहरी नक्षलवादावर स्वतंत्र लक्ष देण्याची गरज आहे. कारण हा व्हायरस युवकांचे ब्रेनवॉश करत आहे. आता कुलदीप सेंगरचं उदाहरण पाहू. कुलदीप सेंगर उत्तर प्रदेशातील उन्नाव जिल्ह्यातील एक प्रभावशाली राजकारणी. २००२ मध्ये बहुजन समाज पार्टी (बीएसपी) कडून, नंतर २००७ आणि २०१२ मध्ये समाजवादी पार्टी (एसपी) कडून आणि २०१७ मध्ये



भारतीय जनता पार्टी (बीजेपी) कडून विजयी झाला. उन्नाव भागात त्याचा मोठा प्रभाव होता, पण २०१७ मध्ये एका अल्पवयीन मुलीने त्याच्यावर बलात्काराचा आरोप केला. मुलीचा दावा होता की सेंगरने नोकरीचे आमिष दाखवून तिचे अपहरण करून बलात्कार केला. प्रकरण आणखी गंभीर झाले जेव्हा पीडितेच्या वडिलांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला आणि कुटुंबावर हल्ले झाले. सीबीआय तपासात सेंगर दोषी ठरला. डिसेंबर २०१९ मध्ये दिल्लीच्या विशेष न्यायालयाने त्यांना आयपीसी आणि पोस्को कायद्यांतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मार्च २०२० मध्ये वडिलांच्या हत्येच्या प्रकरणात अतिरिक्त १० वर्षांची शिक्षा झाली. भाजपाने त्याला पक्षातून बडतर्फ केले.

२०२५ च्या शेवटी हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले. २३ डिसेंबर २०२५ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने सेंगरच्या अपीलवर विचार करताना सशर्त जामीन मंजूर केला. पण २९ डिसेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या आदेशाला स्थगिती दिली आणि सेंगरला तुरुंगातच राहावे लागले. आधीच्या निर्णयाविरोधात २८ डिसेंबर २०२५ रोजी दिल्लीच्या जंतर-मंतरवर मोठे आंदोलन झाले. या आंदोलनाचा मुख्य उद्देश होता सेंगरचा जामीन रद्द करणे, पीडितेची सुरक्षा वाढवणे आणि न्याय निश्चित करणे. वनडब्ल्यूएसहिंदी.कॉमने या आंदोलनकर्त्यांना प्रश्न विचारले. हा व्हिडीओ त्यांच्या चॅनलवर अजूनही आहे. मुख्य प्रवाहातील माध्यमांनी आंदोलनाची दुसरी बाजू दाखवली नाही. पण काही सोशल मीडिया पोस्ट आणि वेबसाईट्स (जसे वनडब्ल्यूएसहिंदी.कॉम) यांनी दावा केला की येथे ब्राह्मणविरोधी आणि सनातन धर्मविरोधी घोषणा दिल्या गेल्या, जसे 'ब्राह्मणवाद से आजादी', 'हिंदुत्व से आजादी.' पत्रकाराने आंदोलनकर्त्यांना प्रश्न विचारला की, सेंगरविरोधातील आंदोलनात ब्राह्मण आणि हिंदुत्वाच्या विरोधात नारे का लावता? तर तिथे जमलेल्या मुलांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. गोदी मीडिया म्हणून त्याला हिणवले. बांगलादेशात ब्राह्मण आणि हिंदुत्व नाही मग तिथे कसे अत्याचार होत आहेत. याबाबतही मुलांना मतप्रदर्शन करता आले नाही. उलट ते जोरजोरात नारे देऊ लागले. हा सगळा प्रकार तुम्ही यांच्या वेबसाईटवर पाहू शकता.

दुसरे उदाहरण दिल्लीच्या इंडिया गेटवर प्रदूषणविरोधी आंदोलनात काही तरुणांनी माओवादी कमांडर माडवी हिडमाच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या. 'माडवी हिडमा अमर रहे', 'जल-जंगल-जमीन की लड़ाई जिंदाबाद.' फलकही दाखवले गेले. पोलिसांनी २३ लोकांना अटक केली आणि डिसेंबर २०२५ मध्ये काहींना जामीन मिळाला. हिडमा छत्तीसगडच्या बस्तरमध्ये सीपीआय (माओइस्ट) चा कमांडर होता. त्याच्यावर २६ हल्ल्यांचा आरोप होता. मग या आंदोलनाचा आणि खून माओवादी नक्षली माडवी हिडमाचा काय संबंध? शाहीनबागचं आंदोलनही असंच हायजॅक झालं होतं ना? सीएए आणि एनआरसीवरनं उसळलेली दंगल आठवतच असेल तुम्हाला? भारतात सतत अशांतता पसरेल याची काळजी हे शहरी नक्षली घेत असतात. दुसरी गोष्ट आपली जेन झी पिढी यात ओढली जात आहे. यावर उपाय म्हणून सरकारने यात विशेष लक्ष घातलं पाहिजे. उगाच गरज नसताना ब्राह्मण या जातीवर चिखलफेक केल्यास त्यावर कठोर कारवाई व्हायला हवी. ब्राह्मण समाजातील एखादा दोष दाखवून द्वेष न करता तो दोष दूर करण्यासाठी काम करणे वेगळे आणि कुठे काहीही घडले तरी प्रत्येक वेळी ब्राह्मणवाद म्हणत त्या समाजाला बदनाम करणे वेगळे. हिंदू धर्मावरही गरज नसताना टीका केल्यावर कायद्यात तरतुदी करायला हव्यात. हिंदू धर्म हा सुधारणावादी धर्म आहे. मात्र केवळ बदनामी करण्यासाठी हिंदू धर्माला दूषणे लावले जात असतील तर हिंदूंचा एकमेव अधिकृत देश असलेल्या भारतामध्ये बहुसंख्य हिंदूंना न्याय मिळालाच पाहिजे. जगाला शांततेचा मार्ग दाखवणारा हिंदू समाज, जगभरात पसरून स्वकर्तृत्वावर मोठमोठ्या पदांवर विराजमान होणारा हिंदू समाज, इतरांना काफीर न मानता जिहाद न करता सर्वांप्रति प्रेमभाव दाखवणारा हिंदू समाज हा विश्वाच्या गळ्यातला मोतीहार आहे. केवळ हिंदू समाजासाठी हिंदूंचे संरक्षण करायचे नाही तर जगाच्या हितासाठी हिंदू संरक्षण करायचे आहे. २०२६ ला शहरी नक्षलमुक्त करण्यासाठी सरकार आणि समाजाला सजग राहावे लागेल. तरुणांना जागृत करावं लागेल. नक्षलविरोधी प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवावे लागणार आहेत. २०२६ या नववर्षांच्या सुरुवातीला चला शहरी नक्षलवादमुक्त भारत करण्याचा संकल्प घेऊया. कारण यामुळे भारत केवळ नक्षलमुक्त होणार नाही तर अधिक मजबूत होईल.

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# २.३ टक्के क्षेत्रफळात १४७ कोटींचे वास्तव्य!

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. परंतु, भारताच्या वाट्याला आता फक्त २.३ टक्केच इतकाच भूभाग उरलेला आहे. अवघे ३२ लाख ८७ हजार २६३ वर्गकिलोमीटर इतके क्षेत्रफळ भारताकडे आहे. सर्वाधिक क्षेत्रफळ रशियाच्या वाट्याला आले असून या देशाकडे ११.५ टक्के इतका भूभाग आहे. परंतु, त्यांची लोकसंख्या अवघी १४ कोटींच्या आसपास आहे. भारत क्षेत्रफळाच्या दृष्टीने सातव्या क्रमांकावर असला तरी आपली लोकसंख्या आज १४७ कोटींवर पोहोचली आहे. भारत तसा मूळ हिंदूंचा देश परंतु इतरांच्या तुलनेत जन्मदर दिवसेंदिवस कमी होत चालल्याने हिंदूंची लोकसंख्या ७८.९ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. जगातील अनेक देशांमध्ये आजही हिंदू धर्म पाळणाऱ्या नागरिकांचे वास्तव्य आहे. अखंड भारतात १० राष्ट्रांचा समावेश होता, असे सांगितले जाते. परंतु, हिंदूंचे साम्राज्य इंडोनेशियापर्यंत विस्तारले होते, ही बाब ध्यानात ठेवली पाहिजे. आज इंडोनेशियात हिंदू अवघा १.६८ टक्के इतकाच शेष असला तरी कधीकाळी हा संपूर्ण देशच हिंदूंचा होता. तेथील नागरिक आता मुस्लिम असले तरी आजही ते हिंदूंच्याच देवी-देवतांची पूजा करतात! टक्केवारीचा विचार केला तर जगात सर्वाधिक हिंदू नेपाळमध्ये राहतात. या देशात हिंदू धर्मीयांची टक्केवारी ८०.६ इतकी आहे. त्यानंतर मॉरिशस ४८.४ टक्के, फिजी २७.९, गयाना २४.९, भूतान २२.५, त्रिनिदाद आणि टोबॅगो २२.३, कतार १५.९ आणि श्रीलंकेत १३.७ टक्के हिंदू धर्मीयांचे वास्तव्य आहे. तसेच अन्य अनेक देशांमध्ये हिंदू धर्मीयांचे वास्तव्य आहे. बांगलादेश आणि पाकिस्तानातही काही प्रमाणात हिंदू राहतात. परंतु, त्यांच्यावर वारंवार अत्याचार होत असल्याने तिथे राहणाऱ्या हिंदूंना नाईलाजाने धर्मांतरण करावे लागत आहे. अशाही परिस्थितीत हिंदू धर्म लोकसंख्येच्या बाबतीत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात लोकसंख्येचा विस्फोट झाला असून हिंदू धर्मात शिक्षणाचे प्रमाण ज्या गतीने वाढले त्याच गतीने जन्मदर कमी झाला आहे. परंतु, मुस्लिम समाजात जन्मदर प्रचंड आहे. आगामी २५ वर्षांत मुस्लिम धर्मीयांची संख्या ३५ टक्क्यांवर जाण्याची शक्यता असून भविष्यात हिंदू आपल्याच भूमीत अल्पसंख्यक होण्याचा धोका आहे. अनेकदा भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी पुढे येते. परंतु, भारत मूळ हिंदूंचेच राष्ट्र असल्याने अशा घोषणेची गरज नसल्याचे विचारवंतांनी स्पष्ट केलेले आहे.

लोकसंख्यावाढीमुळे बेरोजगारांची संख्यासुद्धा झपाट्याने वाढत आहे. परंतु, सरकारने तरुणाईच्या कौशल्याचा वापर करून घेण्यासाठी विविध योजना अंमलात आणल्याने देशाच्या आर्थिक प्रगतीत मोठी भर पडत आहे. सध्या भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सच्या आसपास आहे आणि आर्थिक प्रगतीचा वेग जगात सर्वाधिक असल्याने २०५० पर्यंत भारत ३० ट्रिलियन डॉलर्सचा आकडा ओलांडून जगात दुसऱ्या क्रमांकाची महासत्ता म्हणून उदयास येईल, असा अंदाज पीडब्ल्यूसी या ब्रिटिश कंपनीने नुकताच वर्तविला आहे. भविष्यात भारत अमेरिकेला मागे टाकून चीनवर वरचढ ठरेल, हे खरे असले तरी भारतात लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी कोणताही ठोस कायदा नाही. भविष्यात ज्या गतीने भारतीय अर्थव्यवस्था वाढेल, त्याच गतीने लोकसंख्यासुद्धा वाढणार आहे. विशेष म्हणजे, आपल्याकडे लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी जनजागृती आणि उपाययोजनांवर भर दिला जातो. याचा परिणाम म्हणून हिंदूंचा जन्मदर घटला आहे. परंतु, त्या तुलनेत मुस्लिमांमध्ये जागृती येऊ शकलेली नाही. शिवाय काही राजकीय पक्ष मुस्लिमांमध्ये वारंवार असुरक्षिततेची भावना निर्माण करतात. वास्तविक संपूर्ण जगात सर्वांत सुरक्षित भारतातील मुस्लिमच आहेत. कारण, बहुतांश मुस्लिम राष्ट्रांमध्ये अनेक मुस्लिम रोज पंथवाद अथवा अन्य कारणांमुळे मारले जातात. भारतात मात्र मुस्लिमांना उच्च पदे आणि बरोबरीचे अधिकार प्राप्त आहेत. तरीही केवळ खुर्चीच्या राजकारणासाठी मुस्लिमांमध्ये वारंवार असुरक्षिततेची भावना निर्माण करून या समाजाची मते लाटण्याचा गोरखधंदा वर्षानुवर्षे चालत आलेला आहे. संसाधने आणि क्षेत्रफळाची मर्यादा लक्षात घेता लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी मुस्लिमांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून आता विरोधकांनीच पुढाकार घेतला पाहिजे. अन्यथा तुमचे मुस्लिमप्रेम केवळ राजसत्तेपुरते मर्यादित आहे, हेच सिद्ध होईल.

९८८१७१६०२७

### सूचना

दररोज संपादकीय पानावर प्रसिद्ध होणारे 'आजचे संघगीत' हे सदर तात्पुरते स्थगित करीत आहोत. लवकरच ते नव्या स्वरूपात सुरू होईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**-संपादक**

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# पूजा मोरे प्रकरण : हिंदुत्ववाद्यांचा धडा

पूजा मोरे-जाधव यांच्या उमेदवारीभोवती उभा राहिलेला वाद हा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, तो महाराष्ट्रातील वैचारिक राजकारणाच्या खोल पातळीवरचा संघर्ष अधोरेखित करणारा आहे. या प्रकरणामुळे एक कठोर वास्तव पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. हिंदुत्वाच्या राजकारणात वैचारिक सातत्याला अत्यंत महत्त्व आहे आणि संधिसाधू बदलांना माफी दिली जात नाही. विशेषतः राष्ट्रीय विचारांवर चालणाऱ्या कट्टर हिंदुत्ववाद्यांकडून अशा विसंगतीकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता जवळपास धूसरच म्हणावी लागेल. हिंदुत्ववादी तसे आक्रमक नव्हते आणि नाहीत. मात्र, आता आता अलिकडे त्यांच्याही सहनशीलतेचा बांध फुटू लागला असल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

पूजा मोरे यांना ज्या प्रकारचा विरोध सहन करावा लागला, तो केवळ सोशल मीडियापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो राजकीय निर्णयांवर थेट परिणाम करणारा ठरला. काही दिवसांतच वाढलेले ट्रोलिंग, जुने व्हिडीओ, विधानांचे संदर्भ आणि छायाचित्रे पुन्हा पुन्हा समोर आणत त्यांची वैचारिक विश्वासार्हता प्रश्नांकित करण्यात आली. अखेरीस, या दबावापुढे त्यांना पुणे महानगरपालिका निवडणुकीतून माघार घ्यावी लागली. नव्हे तर तसे करण्यास हिंदुत्ववाद्यांनी भाग पाडले. या अर्थाने हिंदुत्ववादी संघटनांनी एक स्पष्ट संदेश दिला□भूतकाळ पुसून टाकता येत नाही आणि राजकीय स्मृती फार तीक्ष्ण असतात.

पूजा मोरे स्वत:चा राजकीय प्रवास तळागाळातील संघर्ष, शेतकरी आंदोलन, मराठा आरक्षण चळवळ आणि सामाजिक प्रश्नांशी जोडून सांगतात. त्यांचा संघर्ष नाकारता येण्यासारखा नाही. मात्र, आजच्या काळात केवळ संघर्षाची कथा पुरेशी ठरत नाही. आजचे राजकारण अति-डिजिटल झाले आहे. सोशल मीडियामुळे प्रत्येक वक्तव्य, प्रत्येक फोटो आणि प्रत्येक कृती कायमची नोंद बनते. एखाद्या उमेदवाराचा भूतकाळ आजच्या भूमिकेशी विसंगत वाटल्यास, त्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटते□आणि पूजा मोरे प्रकरणात नेमके तेच घडले. मराठा आरक्षण आंदोलनातील सहभाग, आंदोलनादरम्यान केलेल्या कथित वक्तव्यांबाबतचे आरोप, तसेच पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी संबंधित व्हायरल व्हिडीओ यामुळे हिंदुत्ववाद्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. जरी पूजा मोरे यांनी हे व्हिडीओ तोडमोड करून व्हायरल केल्याचा दावा केला असला, तरी राजकारणात 'स्पष्टीकरण' अनेकदा 'नुकसान' भरून काढू शकत नाही, हे वास्तव आहे.

याहून अधिक वादग्रस्त ठरले ते त्यांचे शहरात आल्यानंतर मला हिंदुत्व समजले हे विधान. हिंदुत्ववादी संघटनांच्या दृष्टीने हिंदुत्व हे परिस्थितीनुसार स्वीकारले जाणारे राजकीय लेबल नाही, तर संस्कार, विचार आणि जीवनपद्धतीशी जोडलेले मूल्य आहे. त्यामुळे विवाह, स्थलांतर किंवा राजकीय संधीमुळे हिंदुत्व स्वीकारल्याचा दावा अनेकांना अस्वस्थ करणारा ठरला. त्यांच्या कथनातील ही वैचारिक दरीच त्यांच्या नकाराचे मुख्य कारण बनली. शिवाय विरोधावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, त्याचवेळी मराठा आंदोलनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना उद्देशून ''आरक्षण मागतोय् बायको नाही...'' अशी घोषणा याच पूजा मोरे-जाधव या महिलेने दिली. हे तर फारच निषेधार्ह आहे. हिंदुत्व शहरात आल्यानंतर कळलं किंवा नसेल कळलं. पण महिलांचा आदर करणं ही संस्कृती महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कळत नाही, असे सुचवायचे होते की काय मोरे बाईंना? या संपूर्ण प्रकरणाकडे भाजपाने केवळ वैयक्तिक प्रकरण म्हणून पाहणे देखील धोकादायक ठरले. मोरे प्रकरण हा भाजपासाठीसुद्धा गंभीर इशारा आहे. अलिकडे पक्षात प्रवेश केलेल्या उमेदवारांना केवळ निवडणुकीतील गणित पाहून उमेदवारी देणे, त्यांच्या वैचारिक पृष्ठभूमीचा सखोल अभ्यास न करता पुढे आणणे, ही रणनीती पक्षालादेखील अडचणीत आणू शकते. भाजपाची ओळख ही नेहमीच कॅडर-आधारित संघटनात्मक रचना, दीर्घकालीन निष्ठा आणि वैचारिकता यावर उभी राहिली आहे. जेव्हा ही रचना डावलून 'बाहेरून आलेल्या' उमेदवारांना संधी दिली जाते, तेव्हा पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये असंतोष निर्माण होतो. पूजा मोरे प्रकरणात हेच घडले. पक्षाने उमेदवारी दिली असली, तरी ती स्वीकारण्यास तयार असलेला वैचारिक आधार तितक्याच ताकदीने उभा राहिला नाही.□

या घटनेतून आजच्या राजकारणातील एक मूलभूत सत्य पुन्हा अधोरेखित होते□सोशल मीडिया कधीच विसरत नाही. कधी कधी निवडणूक पराभवापेक्षाही अधिक वेदनादायक. पूजा मोरे स्वत:ला संघर्ष करणारी कार्यकर्ती मानत पुढे लढा सुरू ठेवण्याची भूमिका घेत असल्या, तरी या प्रकरणातून दिला गेलेला राजकीय धडा स्पष्ट आहे. तो केवळ त्यांच्यासाठी नाही, तर त्यांना उमेदवारी देणाऱ्या पक्षासाठी आणि भविष्यातील इतर इच्छुक उमेदवारांसाठीही आहे. शेवटी, पूजा मोरे प्रकरण हे केवळ एका व्यक्तीच्या राजकीय अपयशाचे उदाहरण नाही, तर वैचारिक राजकारणात शॉर्टकट महागात पडतात, याची ठळक आठवण करून देणारे प्रकरण आहे. आता प्रश्न इतकाच आहे□भाजपाने या घटनेतून योग्य धडा घेतला आहे का? कारण वैचारिक प्रवास अपूर्ण असलेल्या व्यक्तींना दिलेली संधी पक्षालाही तितक्याच तीव्रतेने भोवू शकते. यात शंका नाही.

राजस्थान, कर्नाटक, महाराष्ट्र आणि पंजाब (शीख परंपरा) या चारही प्रदेशांनी मुस्लिम आक्रमणांच्या काळात केवळ राजकीय संघर्षच केला नाही, तर हिंदू धर्म, हिंदू संस्कृती आणि परंपरांचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या धैर्याने उभे राहिले. सातत्याने झालेल्या आक्रमणांमुळे देशाची सांस्कृतिक ओळख पुसली जाण्याचा धोका निर्माण झाला होता. अशा काळात या प्रदेशांनी आपली श्रद्धा, जीवनमूल्ये आणि सामाजिक रचना टिकवून ठेवली. विशेषतः मराठ्यांनी अखिल भारतातून मुस्लिम सत्तेची पाळेमुळे खणून काढण्यात जे यश मिळवले, त्यामागे त्यांचा प्रारंभापासूनचा ठाम संकल्प कारणीभूत होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय लहान वयातच 'हिंदवी स्वराज्य' या महान ध्येयाची कल्पना मनात बाळगली होती. पंधराव्या वर्षीच त्यांनी परकीय सत्तेपासून मुक्त, स्वाभिमानी आणि धर्मनिष्ठ राज्याचे स्वप्न पाहिले. हे स्वप्न केवळ राजसत्तेपुरते मर्यादित नव्हते, तर ते सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्वातंत्र्याशी जोडलेले होते. आणि पूजा मोरे ज्या समाजातून येतात, तेव्हा त्यांना, सांस्कृतिक व वैचारिक अर्थाने विचार केला, तर छत्रपतींचे वारस म्हणणे चुकीचे ठरणार नाही. अशा वारसांनीच जर महाराजांच्याच स्वप्नांना सुरुंग लावणारी कृती केली तर, महाराजांच्या विचारांना तिलांजली देण्यासारखं आहे. अशा पवित्र आणि बलिदानांनी नटलेल्या भूमीत हिंदुत्वाविरोधात बोलणे किंवा हिंदू संस्कृतीविरुद्ध वातावरण निर्माण करणे हे स्वाभाविकच असह्य आणि अस्वीकार्ह ठरते. कारण ही भूमी संघर्ष, त्याग आणि आत्मसन्मानाची साक्ष देणारी आहे. इतिहासाने शिकवलेला हा वारसा जपणे, त्यातून एकात्मता आणि स्वाभिमान टिकवणे हे आजच्या पिढीचे कर्तव्य आहे. पूजा मोरे प्रकरणातून हिंदुत्ववाद्यांनी दिलेला हा इशारा सातत्यानं हिंदू धर्माचा उपहास करणाऱ्या काँग्रेस आणि अलिकडेच धर्मनिरपेक्षतेचा उमाळा आलेल्या उबाठासाठीदेखील एक धडा आहे.

९२७०३३३८८६

---

## 'तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य' उत्कृष्ट अग्रलेख

१ जानेवारीचा 'तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य' हा अग्रलेख वाचला. गेल्या कित्येक दिवसांत असा घणाघाती अग्रलेख वाचला नव्हता. त्यातील शब्दन्‌शब्द म्हणजे वाघनखे आहेत. संबंधितांचा कोथळा बाहेर काढणारी. हे संबंधित म्हणजे सर्व पक्षांचे कार्यकर्ते, नेते होत. आपण कुणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. ना सत्ताधाऱ्यांचा ना विरोधकांचा. अग्रलेखातील वाक्यन्‌वाक्य सत्य आहे. इतके सत्य लिहायला रामशास्त्री बाण्याची निर्भयता लागते. भाऊराव माडखोलकर आणि आचार्य अत्र्यांना या अग्रलेखाने जणू पोचपावती दिली. ज्या कोणी हा अग्रलेख लिहिला असेल त्याचे त्रिवार अभिनंदन.

**डॉ. वि. स. जोग**/नागपूर

## कुऱ्हाडीला धार केली का?

गोविंद नावाचा एक लाकूडतोड्या होता. तो मागील पाच वर्षांपासून एकाच ठेकेदाराकडे काम करीत होता. परंतु त्याचा पगार वाढत नव्हता. परंतु त्याच वेळी अवघ्या वर्षभरापूर्वी कामावर नव्याने रुजू झालेल्या रवीचा पगार मात्र वाढला. गोविंदने याबाबत विचारणा केली असता त्याला सांगितले गेले की, तो ५ वर्षांपूर्वी जेवढी लाकडे तोडायचा तेवढीच तो आताही तोडून देत आहे. त्यामुळे पगार देखील तितकाच आहे. जर लाकडे तोडण्याच्या संख्येत वाढ झाली तर पगार देखील वाढेल.

गोविंद हे ऐकून अधिक मेहनत करायला लागला. जास्त वेळ काम करूनही लाकडांच्या संख्येत अपेक्षित ती वाढ होईना. तेव्हा ठेकेदाराने त्याला रवीकडे जायला सांगितले. कदाचित तो उपाय सांगू शकेल. गोविंदने रवीला जेव्हा कारण विचारले तेव्हा रवी म्हणाला, ''मी प्रत्येक लाकूड कापून झाल्यावर दोन मिनिटे आराम करतो व आपल्या कुऱ्हाडीला धार करतो. त्याने पुढील लाकूड देखील कमी कष्टात तोडले जाते. तू आपल्या कुऱ्हाडीला शेवटची धार केव्हा केली होती?'' गोविंदला कळून चुकले की त्याच्या प्रामाणिक कष्टात कुठे चूक होती. जी गोष्ट कुऱ्हाडीला धार लावण्याची तीच गोष्ट देवाने माणसाला दिलेल्या बुद्धीची, तिलाही लिहिण्या-वाचनाने, अभ्यासाने, चांगल्या परिवाराशी जोडण्याने आणि मुख्य म्हणजे भगवत् भक्तीने बुद्धीला धार लावण्याची गरज आहे. प. पू. पांडुरंग शास्त्री सांगतात, भक्ती ही सामाजिक शक्ती आहे. खरेच आहे, सर्वांनी विचार केला पाहिजे की आम्ही आपल्यातील अंगभूत वैशिष्ट्यांना कुऱ्हाडीसारखी शेवटची धार केव्हा केली होती. जुने कर्तृत्व, कार्य हे फार दीर्घकाळ आपला साथ देत नाही. आपल्याला वारंवार त्याला धार करावी लागते.

**मधुकर व्यवहारे**/पुणे

## वाचक पत्रे

## बिबट्यांचा वावर, एक गंभीर समस्या

अलिकडच्या काळात बिबट्यांचे मानवी वस्त्यांमध्ये दर्शन अगदी नित्याची बाब होऊन बसली आहे. पुणे येथील केशवनगर परिसर, नागपूरमधील पारडी, तसेच मुंबईमधील भाईंदर परिसरातील बिबट्याचा वावर खरोखरीच चकित करणारा तर आहेच, शिवाय या विषयावर मंथन करायला लावणाराही आहे. नैसर्गिकत: बिबट्या हा लाजाळू प्राणी आहे. परंतु मानवी भागात शिरल्यावर गोंधळल्यामुळे तो स्वसंरक्षणार्थ हल्ला करण्यास प्रवृत्त होतो. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बिबट्याच्या हल्ल्यात निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. वन्यजीव-मानव संघर्ष वाढतो आहे. पण हे सगळे का होत आहे, याची कारणमीमांसा करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रात सहा व्याघ्र प्रकल्प आणि १४ वन्यजीव अभयारण्ये आहेत, ज्याचे क्षेत्रफळ जवळपास चौरस किलोमीटर, ज्यात ३९५१.०२ चौ. किमी कोअर एरिया आणि ५१६५.७८ चौ. किमी बफर एरिया म्हणून नोटिफाईड आहे. (आकडेवारी २०१९ ची आहे) या बाबतीत कार्यालय महालेखाकार, लेखा परीक्षा (द्वितीय), महाराष्ट्र, नागपूरने एक अहवाल, वर्ष २०१९ मध्ये 'टायगर रेस्क्यू इन महाराष्ट्र' या मथळ्याखाली प्रसिद्ध केला, ज्यात अगदी सखोल अभ्यास करून विश्लेषणात्मक माहिती आहे. या अहवालात प्रामुख्याने विशद केले आहे की, कोअर अधिवासात मानवी वस्ती आणि टुरिस्ट फॅसिलिटीज वन्यजीवांच्या अधिवासाला मर्यादित करतात, तसेच त्यांच्या इनव्हायोलेट स्पेसमध्ये अतिक्रमण केले जात आहे. त्यांच्या अधिवासात मानवाचे अतिक्रमण ही एक चिंतेची बाब आहे. जंगल तोडीवर शासनाने आज काही प्रमाणात का होईना नियंत्रण आणले असले तरी या जंगलतोड वन्यजीवांना नागरी वस्त्यांकडे वळवीत आहे. मर्यादित जंगल आणि त्या प्रमाणात बिबट्यांची असलेली संख्या, शिकारीची कमतरता वन्यजीवांना मानवी वस्त्यांकडे पलायन करायला भाग पाडत आहे.

शासनाने ही समस्या गंभीरतेने घेऊन योग्य त्या उपाययोजना करायला हव्यात. जसे- वन्यजीवांच्या हालचालींवर नियंत्रण आणि योग्य देखरेख आणि त्याकरिता लागणाऱ्या मनुष्यबळाची पर्याप्त उपलब्धता तसेच मूल्यमापन, बंदी, जंगलातील मानवी वसाहती आणि पर्यटनासाठी असलेल्या अवास्तव सुविधा टप्प्याटप्प्याने बंद करणे, मानवी वसाहतींचे योग्य जागेवर स्थलांतर करून त्यांचे पुनर्वसन करणे इत्यादी. अन्यथा निष्पाप नागरिक वन्यजीवांच्या भक्ष्यस्थानी पडतील आणि मग मात्र हा प्रश्न सोडविणे अशक्य होऊन बसेल आणि सामान्यांचे जीवन मात्र पणाला लागेल, एवढे निश्चित.

**कीर्ती गाडगे**/९९२११९९९२२

## महत्वाचे...



### बंडा प्रशालेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशालेचे वार्षिक स्नेहसंमेलन संस्थेचे अध्यक्ष प्रा. नारायणराव संगा यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा स्मृती मंदिरात पार पडला. शालेय समिती चेअरमन प्रभाकर गोरंटी व प्रमुख पाहुणे म्हणून वैजिनाथ हत्तुरे, प्रेसिडेंट बसवराज बंडा, सेक्रेटरी संजय बुगडे, मुख्याध्यापक एम.डी. बिराजदार व सह-सेक्रेटरी श्रीनिवास गडगी साहेब खजिनदार श्रीनिवास जोगी, संचालक राजू काकी, संचालक गिरीष कामुर्ती, नागेश कनकी, इरेश काकी, प्रकाश बुट्टा, व्यकंटेश बुगडे, विवेक मादगुंडी, अंबादास कनकी, सुहास मादगुंडी, शांता संगा, गीता साई, अंबिका मादगुंडी, वर्षाराणी कामुर्ती, मुख्याध्यापिका तट्टे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक विजयकुमार बड्डुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रशालेतील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी भक्ती गीत धनगरी ओव्या, शेतकरी गीत रामायण, शंभूवंदना, पर्यावरण गीत यावर सुंदर नृत्य व सोशल ड्रामा इत्यादी कार्यक्रम सादर करुण उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन प्रशालेतील सांस्कृतिक प्रमुख एम. एस. पवार यांनी केले व आभार ए.यू.वाले यांनी मानले. वंदे मातरम् या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### विजयकुमार बिराजदार यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

ब. ना. बिराजदार वसतीगृहात संस्थेचे माजी अध्यक्ष कै. विजयकुमार बिराजदार यांच्या नवव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कै. विजयकुमार बिराजदार हे तत्वनिष्ठ, कुटुंबवत्सल, कृषीतज्ञ, कुस्तीपटू व दानशूर होते. त्यांचे पिताश्री कै. बसवंतराव नागप्पा बिराजदार यांनी सातरस्ता परिसरात विद्यार्थीनी वस्तीगृहासाठी अर्धा एकर जमीन दिली होती. तेथे लिंगायत मुलींसाठी वसतीगृह सुरू आहे. आजच्या काळात अशी माणसे दुर्मिळ आहेत, असे विचार डॉ. भिमाशंकर बिराजदार यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी मल्लिनाथ विभूते हे होते. उपाध्यक्ष आप्पासाहेब बिराजदार यांनी कै. विजयकुमार बिराजदार यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले. सरचिटणीस बाबासाहेब कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संस्थाध्यक्ष मल्लिनाथ विभूते यांनी कै. विजयकुमार बिराजदार यांच्या कार्याची माहिती दिली. प्रा. शरणबसप्पा मंगळूरे यांनी आभार मानले. वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सोमशेखर लवंगे परिवाराच्या वतीने जेवण देण्यात आले.



### वालचंद कॉलेजमध्ये तंबाखूमुक्त युवा मोहीम ३.० अंतर्गत सशक्त प्रबोधन

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

तरुणाईला व्यसनांच्या विळख्यातून बाहेर काढण्याच्या उद्देशाने वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूर येथील ज्युनिअर कॉलेजमध्ये तंबाखू मुक्त युवा मोहीम विशेष अभियान ३.० अंतर्गत इयत्ता १२ वी कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या अत्याधुनिक बायोटेक स्मार्ट रूममध्ये हा कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमात एम.एस.डब्ल्यू. विभागाचे माजी विद्यार्थी व 'सारथी' युथ फाउंडेशनचे सचिव रामचंद्र कुंडलिक वाघमारे यांनी अनुभवाधारित व अंतर्मुख करणारे मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. कोटी एस. व्ही. होते. तर उपप्राचार्य अनुप म्हेत्रे व पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. व्यसनाचे दुष्परिणाम मांडताना वाघमारे यांनी पीपीटी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून व्यसनाकडे वळण्याची कारणे, त्याचे परिणाम व प्रतिबंधक उपाय यांची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली. यावेळी उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी तंबाखू मुक्त युवा मोहीम अंतर्गत सामूहिक शपथ घेती. सूत्रसंचालन चेतन तुपकर यांनी केले तर आभार शैलेंद्र विठ्ठलदास यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन संदीप कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास धनंजय शहा, संदेश बोराळकर, निलेश भिडे, अमोल सरवळे, डॉ. माधुरी शास्त्री, संदीप चेंडकापूरे, श्रेराज पंडित, योगेश खैरे व शंकर जनगोंड उपस्थित होते.

### चौथे युगस्त्री फातिमाबी शेख साहित्य संमेलन श्रीरामपूर येथे ११ जानेवारीला होणार

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा श्रीरामपूर यांच्या वतीने ११ जानेवारी रविवार श्रीरामपूर येथे राज्यस्तरीय चौथे फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी देहू येथील सुप्रसिध्द साहित्यिक लेखिका मेहमूदा शेख यांची तर स्वागताध्यक्ष डॉ सलीम शेख तर कार्याध्यक्ष पदी कवयित्री दिलशाद शेख व कवी रज्जाक शेख यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती संस्थेचे सहसचिव अनिसासिकंदर व उपाध्यक्ष खाजाभाई बागवान यांनी एका पत्रदेद्वारे दिली आहे. भारतातील पहिल्या मुस्लिम मराठी शिक्षिका युगस्त्री फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या एकदिवसीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन जेष्ठ साहित्यिक व ८९ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस करणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. शफी बोल्डेकर, मा. हाशम पटेल, मा. इस्माईल शेख, प्राचार्य मा. डॉ. इ. जा. तांबोळी, ज्येष्ठ पत्रकार मा. अय्युब अहमद नल्लामंदू आदी उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी पुस्तक प्रकाशन, स्मरणिका प्रकाशन,पुरस्कार वितरण, विविध विषयावर विचार मंथन आणि ५० कवीचा भव्य काव्य संमेलन कवयित्री व मुख्याध्यापक नूरजहाँ शेख यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

# शहरातील ३० उपकेंद्रावर उद्या एमपीएससी पूर्व परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

शहरातील ३० उपकेंद्रावर रविवार, दि. ४ जानेवारी रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र गट - ब पूर्व परीक्षा असल्या कारणाने परिक्षा केंद्राच्या परिसरात दि. ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.३० पासून ते दुपारी १ वाजेपर्यंत परीक्षार्थींना कसलाही अडथळा होऊ नये. या दृष्टीने परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहय उपद्रव कमी करणे परीक्षार्थींना कसलाही अडथळा होऊ नये या दृष्टीने परीक्षेसाठी संबंधित नसलेल्या व्यक्तीस परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करण्यास पायबंद घालण्यात आला आहे.

परीक्षा केंद्राच्या परिसरात झेरॉक्स, पॅफेक्स, इमेल, रेडिओ, इंटरनेट सुविधा भ्रमणध्वनी (मोबाईल), संगणक गणनायंत्र (कॅल्क्युलेटर) व अशा इतर प्रकारच्या स्वरुपातील बाबी विद्यार्थ्यांना पुरवठा करण्यात येवू नये आणि सर्व संबधित शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांचे परीक्षेशी संबंधित कर्तव्ये चोखपणे आणि कोणताही अडथळा अथवा उपद्रव न होता बजावता यावे म्हणून परीक्षा केंद्राच्या सभोवताली १०० मीटर परीसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले असल्याचे



प्रसिध्दी पत्रकान्वये पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे/विशा), सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी कळविले आहे.

परीक्षा केंद्राच्या परिसरात खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात असून, यामध्ये परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाही, परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तींकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यात येणार नाही, परीक्षा केंद्राचे १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, पानपट्टी, टायपिंग सेंटर, फॅक्स, एस.टी.डी. बूथ, ध्वनीक्षेपक, संगणक केंद्र, इंटरनेट कॅफे इत्यादी दळणवळणाची माध्यमे बंद राहतील. परीक्षा केंद्राचे परिसरात मोबाईल फोन, पेजर सारखा दुरसंचार साधने व इतर इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स, स्मार्ट वॉच, फॅक्स, ईमेल व इतर प्रसारमाध्यमे घेवून परीक्षार्थींना प्रवेश करण्यास मनाई असेल. परीक्षा केंद्रावर कोणत्याही वाहनांस प्रवेशांस मनाई राहील. परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना परीक्षा केंद्रात प्रवेश नसेल केवळ संबंधित परीक्षा केंद्रावर नेमणूक केलेले मुख्याध्यापक/कर्मचारी, शासकिय कामावरील अधिकारी व कर्मचारी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / शिक्षक/कर्मचारी आणि उमेदवार यांनाच परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश राहील. इतरांना (उमेदवारांच्या नातेवाईकासह) प्रवेश असणार नाही. यासह इतरही काही सुचना देण्यात आल्या आहेत. ही परीक्षा सोलापूर शहरातील एकूण ३० उपकेंद्रांवर घेण्यात येणार आहे. हा आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी/अंमलदार, परीक्षा केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे बाबत त्यांचे परीक्षेसबंधी कर्तव्य पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत. आयोगाने परवानगी दिलेल्या व्यक्तींनाच भ्रमणध्वनीचा वापर करता येईल. इतर सर्वांना भ्रमणध्वनी नेण्यास बंदी असेल. या आदेशाची अवमानना केल्यास गुन्हा नोंदवून फौजदारी कार्यवाही करण्यात येईल असे आदेश पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे/विशा) पोलीस आयुक्त, सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी काढले आहेत.



## मतदान व मतमोजणी प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी समन्वयाने काम करावे

**डॉ. ओम्बासे यांचे आदेश**

**महानगरपालिका निवडणूक संदर्भात आढावा बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी -**

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून मतदान व मतमोजणी प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आदेश महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आज महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मीटिंग हॉलमध्ये महत्त्वाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत मतदान व मतमोजणी प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या यंत्रणा, मनुष्यबळ, साहित्य, तांत्रिक सुविधा तसेच सुरक्षा व व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, प्र मुख्यलेखा परीक्षक सदानंद वाघमारे, सह. नगर रचना मनिष भीष्णूरकर, सह. आयुक्त गिरीष पंडित, सह आयुक्त शशिकांत भोसले, सह आयुक्त मनीषा मगर, नगर अभियंता सारिका आकुलवार, कार्यकारी अभियंता राजेश परदेशी अग्निशमन प्रमुख राकेश साळूंखे,संबंधित विभागीय अधिकारी तसेच विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## 'डब्ल्यूआयटी'मध्ये उद्या विद्यार्थी विकास योजनेचे वार्षिक स्नेहमिलन

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

सेवा सहयोग फाउंडेशनच्या विद्यार्थी विकास योजना अंतर्गत विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच देणगीदार व हितचिंतक यांच्या उपस्थितीत वार्षिक स्नेहमिलन कार्यक्रम रविवार, ४ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील रिमोट सेंटरमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या स्नेहमीलनात विद्यार्थी विकास योजनेचे प्रवर्तक रविंद्र कर्वे तसेच वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे निवृत्त प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे यांच्याशी विद्यार्थ्यांना थेट संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील तसेच देशातील अन्य ११ राज्यांमधील अत्यंत गरीब पण गुणवत्तावान अशा १,०३१ विद्यार्थी-विद्यार्थिनींना बारावीनंतरचे व्यावसायिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी सुमारे ६ कोटी २५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य या योजनेतून देण्यात आले आहे. सहृदय दाते, कर्तव्यदक्ष कार्यकर्ते, हितचिंतक, विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या सामूहिक सहकार्यामुळे हे कार्य शक्य झाले आहे. आगामी वर्षात या योजनेअंतर्गत १,००० हून अधिक विद्यार्थ्यांना सहाय्य करता येईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून, या स्नेहमीलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पालक कार्यकर्ते देशपांडे व जोगीपेठकर यांनी केले आहे.

## सोलापुरात ज्येष्ठांसाठी तीन दिवसीय कार्यशाळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय (भारत सरकार यांच्या उपक्रमांतर्गत सामाजिक परिवर्तन अध्ययन केंद्र तथा प्रादेशिक संसाधन आणि प्रशिक्षण केंद्र मुंबई व सोलापुरातील ज्येष्ठ नागरिक संघांची शिखर समिती यांचे संयुक्त विद्यमाने २६, २७, २८ डिसेंबर २०२५ असे तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी, आदित्य नगर सांस्कृतिक सभागृह विजापूर रोड, येथे ज्येष्ठ नागरिकांचे आहार व पोषण या विषयावर पार पडलेल्या कार्यशाळेसाठी आहारतज्ञ तस्लिम चौधरी, देविका डोंगरेकर आदी तज्ञांनी मार्गदर्शन केले.



दुसऱ्या दिवशी, दमाणी ब्लड बँक डफरिन चौक, येथे डिजिटल साक्षरता विषयावर सायबर क्राईमचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा, प्रा. डॉ. प्रसन्न माधवराव गव्हाणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे, शिल्प निदेशक संगणक ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग सहाय्यक विजय भांगे, संगणक अभियंता- सायबर तज्ञ अविनाश पाटील, कॉन्स्टेबल अश्विनी लोणी. इ. मान्यवरांनी मार्गदर्शन केले. तर अखेरच्या कर्णिक नगर-एकता नगर येथील सत्रात ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. सुरेश गायकवाड, मानसोपचार तज्ञ डॉ. निहार दिलीप बुर्ट, समाजसेविका डॉ. अपर्णा सुभाष कल्याणकर या मान्यवरांनी 'ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक आरोग्य आणि मालमतेचे संरक्षण' या विषयावर माहिती दिली.

कार्यशाळा समारोपाच्या या शेवटच्या दिवशी सक्रिय योगदान देणाऱ्या ज्येष्ठांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात पाच जणांना ज्येष्ठ नागरिक जीवन गौरव व पाच जणांना ज्येष्ठ नागरिक विशेष सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये सुलभा दातार, मरगू जाधव, निलकंठप्पा कोनापुरे, जयकुमार काटवे, मन्मथ कोनापुरे, शंकरराव करजगी, गुरुलिंग कन्नूरकर, सिध्दाराम गोविंदे, दत्ता निवृत्ती भोसले, कृष्णात देवकर यांचा समावेश आहे. प्रास्ताविक शिखर समितीचे अध्यक्ष प्रा. विलास मोरे, मुख्य समन्वयक गुरुलिंग कन्नुरकर व कोषाध्यक्ष प्रा. कृष्णात देवकर यांनी तसेच मान्यवरांचे स्वागत शिखर समितीचे सचिव मन्मथ कोनापुरे, बाळासाहेब पाटील व चन्नय्या स्वामी यांनी केले. कार्यक्रमाची पार्श्वभूमी आणि उद्दिष्ट्ये प्रकल्प समन्वयिका निलिमा येतकर यांनी विषद केली.

## आयुष्मान भारत अंतर्गत आयुष्मान वय वंदना योजना वयोवृध्दांना लाभदायी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्मान वय वंदना ही एक उप-योजना आहे; जी ७० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या सर्व वरिष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आली आहे. ही योजना २९ ऑक्टोबर २०२४ रोजी सुरू झाली असून, लाभार्थ्यांना वार्षिक ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा देते, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी दिली.

योजनेद्वारे पुढील आजारांवर ५ लाखापर्यंत मोफत उपचार करण्यात येतील. यामध्ये नाक,



कान, घसा, नेत्रविकार, अस्थिव्यंग आणि पॉलिट्रॉमा, भाजणे, कर्करोग उपचार युनिट्स, हिमोडायलिसिस - मूत्रपिंडशास्त्र युनिट्स आदींचा समावे, आहे. केंद्र सरकारची ही योजना देशभरातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार प्रदान करते. यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या गंभीर आजार, शस्त्रक्रिया आणि रुग्णालयात दाखल होण्याच्या खर्चाचा समावेश आहे. महाराष्ट्र सरकारची ही योजना राज्यातील पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देते. यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया आणि विशेष उपचारांचा समावेश आहे. यााठी ७० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे सर्व नागरिक, त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती असो वा नसो; पूर्वी B-PMJY अंतर्गत असलेल्यांना अतिरिक्त टॉप-अप कव्हर मिळते. गंभीर आजारांसाठी ५ लाखांपर्यंत मोफत उपचार, कुटुंबातील इतर ७० पेक्षा जास्त सदस्यांसाठी स्वतंत्र कार्ड. यामुळे जिल्ह्यातील वयोवृध्द नागरिकांनी वरील योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्यात श्री मल्लिकार्जुन हायस्कूलचे वर्चस्व



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

भारत स्काऊट आणि गाईड शहर जिल्हा संस्था यांच्या वतीने बार्शी तालुक्यात चारे येथे स्काऊट आणि गाईड मेळाव्यात श्री मल्लिकार्जुन हायस्कूलने सोलापूर जिल्ह्यात खरी कमाई या उपक्रमामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त करीत सात पदके प्राप्त केली.

कलर पार्टी स्पर्धेत प्रथम,शेकोटी स्पर्धेत तृतीय,घोषवादन स्पर्धेत द्वितीय क्रमांक स्काऊटच्या विद्यार्थ्यांनी प्राप्त केले.तसेच कलर पार्टी स्पर्धेत प्रथम, तंबू सजावट स्पर्धेत द्वितीय,घोषवादन स्पर्धेत द्वितीय,संचालन स्पर्धेत द्वितीय क्रमांक गाईडच्या मुलींनी प्राप्त केले. ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त ग्रँड फिनाले डायमंड ज्युबली जांबोरी लखनऊ,उत्तर प्रदेश येथे १९ व्या राष्ट्रीय जांबोरी जिल्हा कॉन्टिजंट लिडर स्काऊट म्हणून राज्यस्तरावर उल्लेखनीय कार्याबद्दल स्काऊट मास्टर परमेश्वर चांदोडे यांचा प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अप्पासाहेब हत्तुरे, अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संघटक स्काऊट श्रीधर मोरे,जिल्हा संघटक गाईड अनुसया शिरसाठ यांनी अभिनंदन केले.

# साखर कारखान्यांचे वजनकाटे तपासणीसाठी भरारी पथकाची स्थापना

**तपासणी पथकात १० सदस्यांचा समावेश**

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

जिल्ह्यातील साखर कारखान्याचे वजनकाटे तपासणीकरिता भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकामध्ये वैधमापन शास्त्र विभाग, महसूल विभाग, पोलीस विभाग व प्रादेशिक सहसंचालक (साखर) व साखर कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी प्रतिनिधींचा समावेश असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

भरारी पथकात भरारी पथक प्रमुख हे संबंधित सर्व तालुक्यातील तहसिलदार असतील, सदस्य सचिव हे सर्व तालुक्यातील उपनियंत्रक, वैध मापनशास्त्र विभागातील असतील, सदस्य हे ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत साखर कारखाना



असेल त्या पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार असतील, पंढरपूर, सांगोला तालुक्यातील सदस्य ए.एन.बचुटे, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सह. सहकारी संस्था (साखर). माळशिरस, माढा तालुक्यातील सदस्य ए.एस. म्याकलवार, उपलेखापरीक्षक अधिन विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), बार्शी, करमाळा तालुक्यातील सदस्य एन.बी. ठोकळ, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर). मोहोळ, मंगळवेढा तालुक्यातील सदस्य मोरे, लेखापरीक्षक श्रेणी-२ अधिन द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), उ. सोलापूर, द. सोलापूर तालुक्यातील सदस्य हेएस. आर.आडम, लेखापरीक्षक श्रेणी-१ अधिन तृतीय विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), अक्कलकोट तालुक्यातील सदस्य हे श्री.डी. के. मुदाळे, लेखापरीक्षक श्रेणी-२ अधिन तृतीय लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर) सोलापूर. सदस्य शेतकरी प्रतिनिधी, यांची नियुक्ती तहसिलदार यांनी करावी.

भरारी पथकातील सदस्यांची नांवे व संपर्क क्रमांक कार्यक्षेत्रातील साखर कारखाने व शेतकरी यांना उपलब्ध होतील अशा प्रकारे प्रसिद्ध करण्यात यावीत. जिल्हयातील भरारी पथकांनी स्वयंस्फुर्तीने कारखानास्थळावर अचानक भेटी देऊन वजनकाट्यांची तपासणी करावी. जेणेकरुन ऊसाचे वजना संदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर आळा बसेल.शेतकऱ्यांना वजनाची पावती योग्य प्रकारे देण्यात येते किंवा कसे याची खात्री करणे. एखादया साखर कारखान्याच्या बाबतीत उसाच्या वजनाबाबत गैरप्रकार होत असल्याची तक्रार यंत्रणेस किंवा पोलीसांकडे प्राप्त झाल्यावर लगेच त्या साखर कारखान्याचे वजनकाट्याची तपासणी करावी आणि गैरप्रकार आढळल्यास यंत्रणेमार्फत योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

वजनकाट्याच्या तपासणीमध्ये काही गैर कायदेशीर बाबी आढळल्यास सर्व संबंधितावर कायदेशीर कारवाई करावी. ऊस वजन काटा कॅलिब्रेशन मध्ये फेरफार करुन ऊस वजन काटामारी केली जाते अशा तक्रारी प्राप्त होत आहे. यासाठी ऊस वजनकाटा कॅलिब्रेशन करुन सील करणे आवश्यक आहे. संबंधित वैधमापन अधिकाऱ्याने वजनकाट्याची तपासणी करतेवेळी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींना सोबत घेऊन ऊस वजन काटे कॅलिब्रेशन झालेनंतर सील करावेत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

साखर कारखान्यांच्या वजनकाटे तपासणी संदर्भात भरारी पथकांमध्ये सुयोग्य अशा शेतकरी प्रतिनिधीचा समावेश तहसिलदार यांनी करावा.

**CHANGE IN NAME**

I AM CHANGING MY NAME FROM " VAIJANTI ASHOK JAIN KANKARIYA " TO " **VAIJAYANTI ASHOK JAIN** " RESIDING AT 2/224, MANTRI CHANDAK NAGAR, BHAVANI PETH, SOLAPUR, MAHARASHTRA-413002. FOR PASSPORT ISSUANCE.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### पाचव्या कसोटीसाठी इंग्लंड संघात बशीर, पॉट्सची निवड

**सिडनी** : इंग्लंडने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाचव्या अॅशेस कसोटी सामन्यासाठी आपल्या १२ सदस्यीय संघात ऑफ-स्पिनर शोएब बशीर आणि वेगवान गोलंदाज मॅथ्यू पॉट्सचा समावेश केला आहे. हा कसोटी सामना रविवारपासून सिडनी क्रिकेट मैदानावर खेळली जाणार आहे. मेलबर्न येथे दोन दिवसांतच चौथ्या कसोटी सामन्यात चार गडी राखून विजय मिळवणाऱ्या संघातून वेगवान गोलंदाज गस अॅटकिन्सन हा एकमेव खेळाडू अनुपस्थित आहे. दुखापतीमुळे त्याला या सामन्यातून वगळण्यात आले आहे. बशीर आणि पॉट्सच्या समावेशामुळे इंग्लंडला अधिक लवचिकता मिळाली आहे, कारण ते ही मालिका विजयाने संपवू इच्छित आहेत, विशेषतः सिडनीच्या खेळपट्टीवर इतर ऑस्ट्रेलियन मैदानांच्या तुलनेत पारंपरिकरित्या फिरकी गोलंदाजीला अधिक मदत मिळते. दुखापतग्रस्त अॅटकिन्सनच्या जागी अॅशेसमध्ये पदार्पण करण्यासाठी बशीर व पॉट्स दोघेही आता विचाराधीन आहेत.

### साई सुदर्शनच्या आयपीएल खेळण्यावर प्रश्नचिन्ह

**नवी दिल्ली** : युवा भारतीय फलंदाज साई सुदर्शनला मध्य प्रदेशविरुद्धच्या नुकत्याच झालेल्या विजय हजारे चषक सामन्यादरम्यान बरगडीला दुखापत झाल्यामुळे एका महिन्यापेक्षा जास्त काळ संघाबाहेर राहावे लागू शकते. त्यामुळे त्याच्या आयपीएल खेळण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारतीय वन-डे संघाचा भाग नसलेल्या सुदर्शनला अहमदाबादमध्ये मध्य प्रदेशविरुद्ध तामिळनाडूच्या विजय हजारे चषक क्रिकेट सामन्यात धाव घेताना झेप मारताना उजव्या बरगडीला दुखापत झाली.

### गौतम जोग याची विद्यापीठ फुटबॉल संघात निवड

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयच्या गौतम श्रीनिवास जोग याची लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ फुटबॉल संघात निवड झाली. विद्यापीठाच्या पन्हाळा येथे झालेल्या विद्यापीठाच्या आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धेतून त्याची निवड झाली. गौतम याने निवड चाचणीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विद्यापीठ पातळीवर स्थान मिळवले. विद्यापीठाचा संघ ६ ते २६ जानेवारी दरम्यान पारुल विद्यापीठ, वडोदरा येथे होणाऱ्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत सहभाग घेणार आहे. गौतमचे संस्थेचे अध्यक्ष रविंद्रजी गायकवाड, प्राचार्य डॉ अनिल देशमाने, विद्यापीठ प्रशासन व क्रीडा विभागाचे प्रो. अमित वडवेराव आदींनी अभिनंदन केले.


गौतम जोग

### प्रतीक हलमल्ली यास आंतरराष्ट्रीय रॅपिड गुणांकन

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

येथील बुद्धिबळ १० वर्षाचा खेळाडू प्रतिक राजकुमार हलमल्ली याने सोलापूर येथे झालेल्या रायसोनी रॅपिड रेटिंग स्पर्धेत भाग घेऊन,नऊ फेऱ्या मध्ये सात आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंशी लढत घेत यशवंत उबाळे ,रमेश पाटील, या खेळाडू सोबत विजय मिळवला तर संस्कृती सुतार हिच्याशी बरोबरी करत एकूण नऊ पैकी साडेपाच गुण मिळविले.या कामगिरी मुळे त्यास १४५२ असे आंतराष्ट्रीय रॅपिड गुणांकन प्राप्त झाले आहे. तो सध्या प्रशांत पिसे व शरद नाईक सरांच्याकडे बुद्धिबळाचे मार्गदर्शन घेत असूनआजी शैलजा मुरूमकर व आई गौरी हलमल्ली यांच्या विशेष प्रेरणेमुळे त्याने बुद्धिबळात प्रगती करीत असल्याचे आवर्जून सांगितले आहे.


प्रतीक हलमल्ली

### ज्युनिअर डॉजबॉल निवड चाचणी स्पर्धा आज सोलापुरात

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

पालघर येथे ९ ते ११ जानेवारी दरम्यान होणाऱ्या १५व्या ज्युनिअर डॉजबॉल राज्य मुला मुलींच्या स्पर्धेकरिता सोलापूर जिल्हा डॉजबॉल असोसिएशनच्या वतीने ३ जानेवारी रोजी अश्विनी हॉस्पिटल शेजारी राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे सायंकाळी ४.३० वाजता जिल्हा निवड चाचणी स्पर्धा होईल. यातून सोलापूर जिल्ह्याचा डॉजबॉल मुला मुलींच्या संघ निवडण्यात येतील. सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त संघानी या निवड चाचणी स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन सचिव सुदेश मालप यांनी केले आहे. नोंदणीसाठी शरण वांगी (मो. ९१४६०३२४७३) अथवा पवन भोसले (९६३७९६३७७७) यांच्याशी संपर्क साधावा.

# न्यूझीलंड मालिकेसाठी निवड समितीची बैठक आज

## ऋषभ पंतकडे सर्वांची नजर

◆ **नवी दिल्ली, २ जानेवारी**

अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय वरिष्ठ निवड समिती शनिवारी आभासी माध्यमाऑनलाइन पद्धतीने बैठक घेऊन न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारताचा संघ निश्चित करणार आहे, त्यामुळे ऋषभ पंत संघात आपले स्थान टिकवून ठेवू शकेल की नाही, यावरील चर्चेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या २-१ अशा वन-डे मालिका विजयात खेळलेले बहुतांश खेळाडू, यात अनुभवी रोहित शर्मा व विराट कोहली यांचा समावेश आहे, ते न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांसाठी संघात निश्चितपणे असतील. न्यूझीलंडच्या संघात युवा आणि अनुभवी खेळाडूंचा चांगला मिलाफ आहे.

ही मालिका ११ जानेवारी रोजी बडोदा येथे सुरू होईल, त्यानंतर १४ आणि १८ जानेवारी रोजी अनुक्रमे राजकोट व इंदूर येथे सामने होतील. पण जेव्हा पंतला एकदिवसीय संघात स्थान देण्याचा प्रश्न येतो, तेव्हा निवड समितीच्या बैठकीत गंभीर चर्चा होण्याची शक्यता आहे.



सध्या सुरू असलेल्या विजय हजारे चषकांत पंतचा फॉर्म अस्थिर राहिला आहे. चार सामन्यांमध्ये त्याने केवळ एक अर्धशतक झळकावले असून, ३०.२५ च्या सरासरीने एकूण १२१ धावा केल्या आहेत. ऑगस्ट २०२४ मध्ये श्रीलंकेविरुद्ध खेळल्यापासून पंत एकही एकदिवसीय सामना खेळलेला नाही - डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या जीवघेण्या कार अपघातातील दुखापतीतून सावरल्यामुळे त्याला बराच काळ खेळापासून दूर राहावे लागले होते.

त्याच्या अलीकडील देशांतर्गत कामगिरीमुळे त्याचे संघातील स्थान मजबूत झालेले नाही, आणि त्यातच, एकदिवसीय संघात प्रथम पसंतीचा यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून केएल राहुलच्या चमकदार फॉर्ममुळे पंतला बाकावरच बसावे लागले आहे. २०२५ मध्ये, पंत एकही एकदिवसीय सामना खेळला नाही आणि चॅम्पियन्स चषक जिंकणाऱ्या संघाचा तसेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिका विजयातही तो न खेळलेला सदस्य होता. पंतसाठी गोष्टी अधिक गुंतागुंतीच्या झाल्या आहेत, कारण सय्यद मुश्ताक अली चषकातील चमकदार कामगिरीच्या जोरावर ईशान किशनने पुन्हा एकदा संघात स्थान मिळवले आहे आणि आता तो टी-२० विश्वचषक संघात आहे, तसेच ध्रुव जुरेलनेही विजय हजारे चषकांत मोठ्या धावा केल्या आहेत. भारताच्या टी-२० संघातून आधीच बाहेर असलेल्या आणि एकदिवसीय संघातील संधीही धूसर दिसत असलेल्या पंतकडे आता भारताच्या मर्यादित षटकांच्या योजनांमध्ये आपले महत्त्व सिद्ध करण्यासाठी या वर्षाच्या उत्तरार्धात केवळ आयपीएल आणि काही कसोटी सामनेच शिल्लक आहेत. निवड समितीच्या चर्चेत येण्याची शक्यता असलेले आणखी एक नाव म्हणजे सध्या फॉर्मात असलेला डावखुरा फलंदाज देवदत्त पडिक्कल आहे. देवदत्तने सध्या सुरू असलेल्या विजय हजारे चषकामध्ये चार सामन्यांमध्ये तीन शतके झळकावली आहेत.

पण कर्णधार शुभमन गिल परत येत असल्याने, तसेच रोहित, यशस्वी जयस्वाल व ऋतुराज गायकवाड संघात असताना, निवडकर्ते देवदत्तला संघात कसे स्थान देतात हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. टी-२० विश्वचषकामुळे जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पांड्याला वन-डे सामन्यांमधून विश्रांती दिली जाणार असल्याने, हर्षित राणा आणि अर्शदीप सिंग यांना मालिकेत संधी मिळते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. (वृत्तसंस्था)

# जगद्गुरू रामभद्राचार्य यांची शाहरुख खानवर टीका

◆ **नागपूर, २ जानेवारी**


शेजारील देशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांदरम्यान, स्वतःच्या मालकीच्या कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) या आयपीएल फ्रँचायझीने एका बांगलादेशी क्रिकेटपटूला करारबद्ध केल्याबद्दल हिंदू धर्मगुरू जगद्गुरू रामभद्राचार्य यांनी बॉलिवूड सुपरस्टार शाहरुख खानवर जोरदार टीका केली आहे.



केकेआरने इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ साठी बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला करारबद्ध करण्याबद्दल विचारले असता, धर्मगुरू रामभद्राचार्य यांनी गुरुवारी नागपूरमध्ये सांगितले की, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, कारण शाहरुख खानचा दृष्टिकोन नेहमीच देशद्रोहीसारखा राहिला आहे.

त्यांनी बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंवरील हल्ल्यांचा निषेध केला व भारतीय सरकारने अशा घटना सहन न करता या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घ्यावी, असे ते म्हणाले. बांगलादेशातील लोकांना आणि त्यांच्या सरकारला हे समजावून सांगितले पाहिजे की, त्यांचा देश हिंदूंच्या मदतीनेच निर्माण झाला आहे, असे रामभद्राचार्य म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### बीसीसीआयने निर्णय घ्यावा : धीरेंद्र शास्त्री



बीसीसीआयने बांगलादेशमधील हिंदूंच्या रक्षणाविषयीचा मुद्दा गांभीर्याने घेतला पाहिजे, हे आपले कर्तव्य आहे. अभिनेता शाहरूख खानच्या मालकीच्या कोलकाता नाईट रायडर्सने बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिझूर रहमानला आयपीएलसाठी विकत घेतले, त्या मुस्तफिझूरला संघातून बाहेर काढावे, असे बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले.

### बांगलादेशी खेळाडूला केकेआर संघातून बाहेर काढा : शिवसेना



**मुंबई** : कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) संघाचे मालक शाहरुख खान यांना बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिझूर रहमानला संघातून काढून टाकण्याची विनंती शिवसेना नेते संजय निरुपम यांनी केली आहे. आयपीएलच्या लिलावात, कोलकातास्थित फ्रॅन्चायझीने २०२६ च्या हंगामासाठी या बांगलादेशी वेगवान गोलंदाजाला ९.२० कोटी रुपयांच्या मोठ्या रकमेत करारबद्ध केले आहे.बांगलादेशात धार्मिक अल्पसंख्याकांविरुद्ध होत असलेल्या हिंसाचाराच्या वारंवारच्या घटनांच्या पृष्ठभूमीवर ही मागणी करण्यात आली आहे. या घडामोडींनंतर, केकेआरच्या या नवीन खेळाडूला आयपीएलमध्ये स्थान दिले जाऊ नये, असे मत अनेक जणांनी व्यक्त केले आहे. जेव्हा संपूर्ण देश बांगलादेशवर संतप्त आणि क्रोधीत आहे, तेव्हा भारतात बांगलादेशी लोकांशी किंचितही संबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्या रागाचा लक्ष्य बनावे लागू शकते.

# स्योर्ड मरिन भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक

**नवी दिल्ली, २ जानेवारी**

नेदरलॅण्डचे स्योर्ड मरिन यांची शुक्रवारी भारतीय महिला हॉकी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी पुन्हा नियुक्ती करण्यात आली. टोकियो ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत संघाला ऐतिहासिक चौथ्या स्थानापर्यंत पोहोचवल्यानंतर ते पुन्हा या संघात परतले आहेत.



२०१७ ते २०२१ या काळात भारतीय महिला हॉकी संघाशी संबंधित असलेल्या ५१ वर्षीय मरिन यांना विश्लेषणात्मक प्रशिक्षक म्हणून मातियास विला यांचे सहकार्य मिळेल. अर्जेंटिनाचे माजी मिडफिल्डर असलेले विला यांनी १९९७ मध्ये आंतरराष्ट्रीय हॉकीमध्ये पदार्पण केले व २००० सिडनी ऑलिम्पिक व २००४ अथेन्स ऑलिम्पिकमध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व केले.

# व्हीनस विल्यम्सचे ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पुनरागमन

◆ **मेलबर्न, २ जानेवारी**

सात वेळा ग्रॅण्ड स्लॅम एकेरी विजेती ठरलेल्या व्हीनस विल्यम्सला मेलबर्नमध्ये १८ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियन ओपनसाठी वाईल्ड-कार्ड प्रवेश मिळाला आहे.

व्हीनस वयाच्या ४५ व्या वर्षी ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये पुनरागमन करीत आहे. ती आपल्या शेवटच्या सहभागानंतर ५ वर्षांनी तसेच पहिल्या सहभागानंतर २८ वर्षांनी ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये परतली आहे.

१९९८ मध्ये, व्हीनसने दुसऱ्या फेरीत आपली धाकटी बहीण सेरेनाला हरवले होते, परंतु उपांत्यपूर्व फेरीत तिला अमेरिकन खेळाडू लिंडसे डेव्हनपोर्टकडून पराभव पत्करावा लागला होता. मी ऑस्ट्रेलियन ओपनच्या दोन आठवडे आधी न्यूझीलंडमधील ऑकलंडमध्ये खेळेल, अशी घोषणा व्हीनसने नोव्हेंबरमध्ये घोषणा केली होती. या स्पर्धेत तिला वाईल्ड कार्ड देखील मिळाले. व्हीनस विल्यम्सने एका आठवड्यानंतर व मेलबर्न पार्कमधील खेळ सुरू होण्यापूर्वी ऑस्ट्रेलियातील होबार्ट येथील स्पर्धेत खेळण्यासाठीही नाव नोंदवले आहे, असे ऑस्ट्रेलियन ओपनने सांगितले. ती शेवटची २०२१ मध्ये मेलबर्नमध्ये खेळली होती आणि महिला एकेरीत दोनदा उपविजेती ठरली आहे, २००३ आणि २०१७ मध्ये अंतिम फेरीत तिला सेरेनाकडून पराभव पत्करावा लागला होता. मी ऑस्ट्रेलियात परत आल्याबद्दल उत्साहित आहे आणि ऑस्ट्रेलियन उन्हाळ्यात स्पर्धा करण्यास उत्सुक आहे, असे विल्यम्स म्हणाली.माझ्या तिथे खूप अविस्मरणीय आठवणी आहेत आणि माझ्या कारकिर्दीसाठी इतके महत्त्वाचे असलेल्या ठिकाणी परत येण्याची संधी मिळाल्याबद्दल मी कृतज्ञ आहे, असे व्हीनस म्हणाली.



मेलबर्न पार्कमधील विल्यम्सची कामगिरी ५४ विजय आणि २१ पराभव अशी आहे. या वर्षी ती २२ व्यांदा मुख्य ड्रॉमध्ये सहभागी होईल.

व्हीनस विल्यम्स ऑस्ट्रेलियन ओपनच्या मुख्य ड्रॉमध्ये खेळणारी सर्वात वयस्कर महिला खेळाडू ठरणार आहे. ती जपानच्या किमिको डेटचा विक्रम मोडेल. किमिको २०१५ मध्ये मेलबर्न पार्कमध्ये पहिल्या फेरीत हरली, तेव्हा ४४ वर्षांची होती, असे ऑस्ट्रेलियन ओपनने सांगितले. डिसेंबरच्या अखेरीस, विल्यम्सने फ्लोरिडा येथील पाम बीच येथे डॅनिश-जन्मलेल्या मॉडेल आणि अभिनेता आंद्रे प्रीटीशी लग्न केले. (वृत्तसंस्था)

# अण्णा वॉरियर्स क्रिकेट टीमच्या टी-शर्टचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

सोलापूर बार असोसिएशनमध्ये अण्णा वॉरियर्स क्रिकेट टीमचे टी शर्टचे अनावरण सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष रिया शेख, सचिव बसवराज हिंगमिरे, खजिनदार अरविंद देडे, सहसचिव मीरा प्रसाद, जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र गोवाचे विद्यमान सदस्य अॅड. मिलिंद थोबडे, अॅड. मल्लिनाथ पाटील साहेब, अॅड. अभय बिराजदार साहेब तसेच मुंबई हायकोर्टचे वकील विक्रांत फताटे, अॅड. असिम बांगी, अॅड. शिवशंकर घोडके, अॅड. चंद्रमोहन, अॅड. काका शिंदे, अॅड. अशोक जालादी, अॅड. संजय गायकवाड, अॅड. रविंद्र पाटील, अॅड. रेशमे आदी वकील उपस्थित होते. अॅड. परवेज ढालायत, रोहिदास पवार, अॅड. मोमीन मकसूद, अॅड. प्रकाश वाघमारे, अॅड. सुनिल कोळेकर, अॅड. दादासाहेब जाधव, अॅड. संतोष म्हमाणे, अॅड. युवराज आवताडे, अॅड. राजेंद्र चव्हाण, अॅड. कबीर औटी, अॅड. सतोष हौसमनी, अॅड. बाबुशा साळुंखे, अॅड. सतीश गायकवाड, अण्णा वॉरियर्सचे सर्वेसर्वा अॅड. राजेंद्र फताटे व खेळाडू उपस्थित होते.




# ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव चरित्राच्या जनआवृत्तीचे प्रकाशन

## सातारा साहित्य संमेलनात खाशाबांच्या पुस्तक प्रकाशनाला प्रथम मान

**सातारा, दि. २ जानेवारी-**

भारताचे पहिले ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांच्या संजय दुधाणे लिखित चरित्राच्या जनआवृत्तीचे प्रकाशन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त करण्यात आले. सातारा येथे सुरू असलेल्या संमेलनाच्या प्रकाशन मंचावर पहिले पुस्तक प्रकाशनाचा मान ऑलिम्पिकवीर खाशाबा या पुस्तकाला लाभला आहे. शाहू स्टेडियममधील साहित्य संमेलनाच्या प्रकाशन मंचावर संमेलन अध्यक्ष, ख्यातनाम साहितयिक विश्वास पाटील यांच्या हस्ते ऑलिम्पिकवीर खाशाबा पुस्तकाचे शानदार प्रकाशन झाले. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्हा क्रीडाधिकारी मा. नितीन तारळकर, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, लेखक प्रा. संजय दुधाणे आदी मान्यवर उपस्थित होते.



खाशाबांच्या चरित्र पुस्तकाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. रौप्यमहोत्सव व साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सवलतीच्या दरात पुस्तक प्रदर्शनात हे पुस्तक उपलब्ध होणार आहे. ८८ पानी चरित्र पुस्तक खाशाबांच्या दुर्मिळ छायाचित्रांनी सजले आहे. १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिक स्पर्धेत साताराचे सुपुत्र खाशाबा जाधव यांनी कुस्ती खेळात देशासाठी पहिले वैयक्तिक पदक जिंकले होते. त्याच्या ही ऐतिहासिक यशोगाथा २००० मध्ये क्रीडा लेखक संजय दुधाणे यांनी सर्वप्रथम लोकांसमोर आणली. ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या पुस्तकाला मोठा प्रतिसाद मिळाल्याने हे पुस्तक केंद्र शासनाच्या नॅशनल बुक ट्रस्टनेही प्रकाशित केले होते. मराठीसह हिंदीमध्येही हे पुस्तक उपलब्ध आहे. ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पुस्तक महाराष्ट्र शासनाच्या सर्वोत्कृष्ट पुस्तकाचा शाहू महाराज पुरस्काराने गौरवित झाले असून इयत्ता ९ वी नंतर आता ६ वीच्या पाठ्यपुस्तकातही याचा समावेश केला आहे.

# महाराष्ट्राची मुलींची घोडदौड, गुजरातवर मात





## ४४ वी राष्ट्रीय अजिंक्यपद कुमार गट खो-खो स्पर्धा

**बेंगलुरू, दि. २ जानेवारी-**

महाराष्ट्राच्या मुलींनी ४४व्या कुमार गट राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतील विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. कर्नाटका खो-खो असोसिएशनच्या वतीने बेंगलुरू शहरातील गुंजर मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींनी गुजरातवर ३८-१२ अशी एक डाव राखून २६ गुणांनी मात केली. अष्टपैलू कामगिरी करणारे मैथिली पवार (३.४० मिनिटे व २ गुण) व विद्या तामखेडे (५ मि. व २ गुण) आणि शानदार संरक्षण करणारी श्रावणी तामखेडे (२.४० व १.४० मि.) हे त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. गुजरातच्या यू. बराई (२.३० मि.) व कोचाडिया (१.०० व २ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले.

### विदर्भच्या दोन्ही संघाची आगेकूच

विदर्भच्या कुमार व मुली दोन्ही संघानी विजय मिळवित आगेकूच केली आहे. सूजल खांडेकर (१,१,४० मि. व २ गुण), मोहित नेवरे ( ३.३० मि. व २ गुण) व स्मीत कापसे (२.३० मि.) यांच्या बहारदार खेळीमुळे विदर्भच्या कुमारांनी मध्यप्रदेशला १३ गुण व १ डाव राखून सहज नमविले. मध्यप्रदेशच्या हर्षित विश्वकर्मा (१ मि.) व सागर कुटस्ते (४ गुण) यांचे प्रयत्न अपुरे पडले. विदर्भच्या मुलींनी चंदीगडवर २६ गुण व एका डावाने दणदणीत विजय मिळविला. यात श्रध्दा (४.२० मि. व ६ गुण), कोमल (४.४० मि. व २ गुण) यांनी अष्टपैलू खेळी केली. धनश्रीने ४ गुण मिळवित आक्रमणात साथ दिली. चंदीगडच्या महिमाने (१मि. व २ गुण) हिने एकाकी लढत दिली.

### कोल्हापूरचा जम्मू कश्मीरवर धुव्वा

राष्ट्रीय स्पर्धेत कोल्हापूर व विदर्भचेही संघ स्वतंत्र सहभागी होत असतात. कोल्हापूरच्या मुलींनी जम्मू काश्मीरचा एक डाव राखून ४७ गुणांनी धुव्वा उडविला. यात भक्तीने २.२० मिनिटे पळती करीत आक्रमणात ६ गुण मिळविले. चैत्रालीने संरक्षणात १ व ५ मिनिटे व तर श्रावणी पाटीलने ४ मिनिटे पळतीचा खेळ केला.



# छत्रपती शिवाजी प्रशालेत क्रीडा महोत्सव उत्साहात सुरु

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानातंर्गत छत्रपती शिवाजी प्रशालेत वार्षिक क्रीडा महोत्सवाचा शानदार उद्घाटन सोहळा संपन्न झाला. स्कूल कमिटी चेअरमन विनाकराव पाटील व सोलापूर हँडबॉल असोसिएशनचे सचिव सुदेश मालप यांच्या हस्ते प्रतिमा पूजन केले. कार्यक्रमाची रुपरेषा कार्यक्रमाची सुरुवात रुपा खुर्द यांनी गायलेल्या स्वागत गीताने झाली. मुख्याध्यापिका जुगदार सुजाता महादेव यांनी प्रास्ताविक सादर करुन क्रीडा महोत्सवाचे महत्व अधोरेखित केले. पाहुण्यांचा परिचय घोडके एम. एस. यांनी करुन दिले. तसेच याप्रसंगी सर्व खेळाडूंना खेळ भावने विषयी शपथ देण्यात आली. गोरे एन. एस. यांनी वार्षिक क्रीडा अहवालाचे वाचन केले. श्री. मालप यांनी विद्यार्थ्यांना खेळातील संधी आणि आरोग्याचे महत्व यावर तसेच प्रा. संतोष गवळी व सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्यं प्रा. सचिन गायकवाड यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मैदानाची पूजा करुन व मशाल प्रज्वलित करुन वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. सुत्रसंचलन व्ही. एस. मोटे यांनी केले. देवकर एस. एल. यांनी आभार मानले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### करमाळ्याच्या संस्थेतर्फे कोरेगाव-भीमा येथे मोफत अन्नदान

**करमाळा, दि.२ जानेवारी-**

करमाळा येथील डॉ आंबेडकरवादी चळवळ व सामाजिक संघटना या संस्थेच्या वतीने शौर्यदिनानिमित्त कोरेगाव भीमा येथे येणाऱ्या भीम अनुयायांना मोफत अन्नदान करण्यात आले. विजयी स्तंभाला अभिवादन करण्यासाठी आलेल्या अनुयायांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येक वर्षी हा उपक्रम राबवला जातो. कोरेगाव भीमा येथे १ जानेवारीला भारताच्या काना कोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने अभिवादन करण्यासाठी अनुयायी येतात. सुनिल खरात, राजू कांबळे, बाळू कसबे, दत्तात्रय कांबळे, सुशांत कांबळे, संजय कांबळे(आचारी), शहाजी लांडगे, रोहित कांबळे, मंगेश समिंदर, केतन कांबळे, महादेव थोरात, सुरज कांबळे, सुशील खरात, अजिंक्य कांबळे,शुभम पगारे, अजय कांबळे, प्रकाश कांबळे, पियुष कांबळे, सिद्धार्थ कांबळे, विशाल खरात, कविराज कांबळे, आनंद कटारे, विकी कांबळे, विशाल कांबळे, आशिष कांबळे, अनिकेत कांबळे, संघर्ष कांबळे, पिल्या कांबळे, आदित्य कुंभार, युवराज कांबळे, यश कांबळे, चिक्या कांबळे या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



### भीमा-कोरेगाव मशाल पदयात्रा यशस्वी

**वळसंग, दि.२ जानेवारी-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या व ऐतिहासिक वारसा असलेल्या भूमीवरून अर्थातच वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) गावातील दि.३० डिसेंबर रोजी युवा भीमसैनिकांनी एक जानेवारी निमित्त एक आगळावेगळा सर्वांनी मिळून निर्णय घेवून यशस्वी केले. भीमा कोरेगाव येथील विजय स्तंभाला मानवंदना देण्यासाठी ५०० वारसदार वळसंग गावामधून मशाल घेऊन मानवंदना देण्याचा संकल्प पूर्ण केला. सोलापुरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून ते भीमा कोरेगावकडे रवाना झाले होते. परत येताना सर्व भीमसैनिकांचा सोलापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यासमोर जय भीम जयघोषात सत्कार करण्यात आला.

### अंगणवाडी कर्मचारी संघातर्फे आज आनंद मेळावा

**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्यावतीने शनिवार दि.३ जानेवारी रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात दुपारी १२ वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्त आनंद मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यास सोलापूर जिल्हयातील सर्व अंगणवाडी सेविका मदतनिस उपस्थित राहणार असून या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून आशा चित्रपटाचे निर्माती दैवता पाटील, दिग्दर्शक दिपक पाटील, आंबेडकरी विचारांचे ज्येष्ठ साहित्यीक दत्ता गायकवाड, भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे ज्येष्ठ नेते कॉ. रा.गो. म्हेत्रस यांचे मार्गदर्शन होणार आहे. मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन राज्य सरचिटणीस सूर्यमणी गायकवाड यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### डॉ. मोनिका गाजुल



**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

अशोक चौक येथील दि आर्ट ऑफ लिव्हिंग शिक्षक डॉ. अंबादास गाजुल यांची मुलगी आणि डॉ. राजेंद्र गाजुल यांची पुतणी दंत रोगतज्ञ सर्जन डॉ. मोनिका अंबादास गाजुल (वय ३२) यांचे गुरूवारी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवारी सकाळी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ असा परिवार आहे.

### बी.टी. पाटील



**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

विजापूर रोड, नीरा पाम सोसायटी येथील रहिवासी बाळकृष्ण पाटील (बी. टी. पाटील) (वय-८२) यांचे आज दीर्घ आजाराने निधन झाले. एमएसइबीमध्ये सहाय्यक अभियंता म्हणून ते निवृत्त झाले होते. रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे माजी सचिव होते. मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्य पश्चात पत्नी, तीन विवाहित मुली, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

### रामबाई धारा



**सोलापूर, दि. २ जानेवारी-**

विजयनगर येथील रामबाई मल्लेशम धारा (वय-८०) दि.१ जानेवारी रोजी पहाटे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात बहीण, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सिध्दारुढ महास्वामीजी (हुबळी) यांच्या परमभक्त होत्या.

### अनिलकुमार इंगळेकर



**शहाबाद, दि. २ जानेवारी -**

अनिलकुमार लक्ष्मण इंगळेकर (वय ४०) यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात चार बहिणी असा परिवार आहे.

# परप्रांतीय टोळीतील तीन आरोपींना अटक

## २० लाखांचा मुद्देमाल जप्त

## अकलूज पोलिसांची कारवाई



**दभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२ जानेवारी-**

यशवंतनगर येथील बी. एस. कंस्ट्रक्शनच्या ऑफीसमधून ५ लाख ४५ हजार रुपयांची रोख रक्कम घेऊन पोबारा केलेल्या परप्रांतीय टोळीतील तिघांना अकलूज पोलिसांनी थेट गुजरातच्या सापुतारा येथून अटक केली. तिघांनाही पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

दि. २६ डिसेंबर रोजी अज्ञात चोरटयाने रक्कम चोरल्याची फिर्याद आनंद हणुमंतराव भोसले (रा. यशवंतनगर ता. माळशिरस) यांनी दिली होती. त्याप्रमाणे अकलूज पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम यांचे नेतृत्ताखाली सुरू होता. पोलीसांना घटनेच्या ठिकाणी काही संशयीताचे सीसीटिव्ही फुटेज प्राप्त झाले होते. सदरचे सीसीटिव्ही फुटेजमध्ये एक चार चाकी वाहनाचा नंबर प्राप्त झाला. तो नंबर व संशयीताचे फुटेज संपुर्ण देशातील पोलीसांचे वेगवेगळया व्हॉटसअॅप ग्रुपवर पाठविण्यात आले होते. सापुतारा पोलीस ठाणे (गुजरात) यांना देखील सदरचे फुटेज पाठविण्यात आले होते. सापुतारा पोलीस ठाणे हद्दीत नाकांबदी दरम्यान तीन संशयीत इसम मिळुन आल्याने व सीसीटिव्ही फुटेज मधील वाहन व इमस हे सदर इमसाशी मिळते जुळते असल्याने सापुतारा पोलीस ठाणे यांनी अकलुज पोलीस ठाणेशी संशयीताबाबत कळविले. त्याप्रमाणे पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये पोसई कदम व तपास पथक सापुतारा येथे रवाना केले. सदर ताब्यात घेतलेल्या अनिलभाई रेवाभाई भांभोरे (वय २७ वर्षे), मिथुनभाई रेवाभाई भांभोरे (वय ३४ वर्षे) (दोघे रा. नाडेलगांव धुळ महोडी फलिया, ता. गरबाडा, जि. दाहोद राज्य गुजरात), वकील तेजसिंग भांभोरे (वय ३२ वर्षे रा. अंबाली खजुरीया शिमोडा, फलिया, ता. गरबाडा, जि. दाहोद) (राज्य गुजरात) यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास पथकाने तपास केला. आरोपीनी गुन्हा केल्याची कबुली दिली असून सदर गुन्हयात चोरी केलेला एकुण ५ लाख ४५ हजार रक्कमे पैकी ५ लाख,१३ हजार १८० हस्तगत केली असून गुन्हा करताना वापरलेले वाहन हुंडाई केटा कार क्रमांक GJ-२०CB-२६४६ जप्त केलेले आहे. सदर आरोपीना ताब्यात घेऊन ५ दिवस पोलीस कोठडी न्यायालयाकडुन मंजुर करुन घेत अधिकचा तपास केला असता त्यांनी अशाच प्रकारे सांगोला पोलीस ठाणे हददीत चोरी केल्याची कबुली दिली. त्या गुन्हयात चोरी केलेल्या चांदीचा मुददेमाल देखील आरोपीकडुन जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीनी गुन्हा करताना वापरलेली वाहन हुंडाई केटा कार क्रमांक GJ-२०CB-२६४६, तीन मोबाईल, एक लोखंडी कटावणी, एक काळया रंगाची बॅग, एक लोखंडी पक्कड असे एकुण २० वाख ३६ हजार ६८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके, पोलीस निरीक्षक निरज उबाळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा अकलुजचे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम व पो. हवा. विक्रम घाटगे, पो. हवा. विनोद साठे, पो. हवा. सुहास क्षिरसागर, पो. हवा. शिवकुमार मदभावी, पो.हवा. आभिजीत कुंभार, पो. कॉ. रणजित जगताप, पो.कॉ. दत्तात्रय खरात, पो.कॉ. सोमनाथ माने, पो.कॉ. पंडीत गवळे तसेच सायबरचे पो. हवा. तांबोळी यांनी कामगिरी केली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम हे करीत आहेत.

अकलूज पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे परप्रांतिय टोळीच्या मुसक्या आवळण्यात यश आल्याचे बोलले जात आहे. जिल्ह्यात अशा टोळ्यांचा सुळसुळाट सर्वत्र दिसून येत असल्याने भयाचे वातावरण आहे. याबाबत नागरिकांनी सतर्क राहून पोलिस प्रशासनास सहकार्य करणे गरजेचे आहे.

# अंतिम ऊसदर जाहीर करा अन्यथा शेतकरी उसाने मारतील

## शंकर गायकवाड यांनी दिला इशारा

## येडेश्वरी कारखान्यासमोर आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/बार्शी, दि. २ जानेवारी-**

बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या बार्शी तालुक्यातील येडेश्वरी साखर कारखान्याने पहिली उचल तीन हजार ऐवजी २८०० रुपये अशी कमी दिल्यामुळे सर्व शेतकरी संघटनांच्या वतीने आज या साखर कारखान्यावर आंदोलन करण्यात आले. त्यावेळी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड म्हणाले की, अनेक आंदोलने केल्यानंतर या साखर कारखान्याने पहिली उचल आज तीन हजार रुपये जाहीर केली असली तरी कारखाना विकत घेतला त्यावेळी मात्र शेतकऱ्यांची बिले एफ.आर.पी. अधिक व्याज अशी न दिल्यामुळे आम्ही वारंवार शांततेच्या मार्गाने निवेदने दिली.

अनेक आंदोलने केली. परंतु तीन वर्षे होत आले तरी, अनेक तालुक्यातील कोट्यावधी रुपये या कारखान्याने अद्याप पर्यंत दिलेले नाही. ते तात्काळ द्यावे व अंतिम ऊस दरही जाहीर करावा, अन्यथा शेतकरी उसाने मारतील असा खणखणीत इशाराही यावेळी गायकवाड यांनी दिला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे आनंद काशीद, शेतकरी संघटनेचे हनुमंत भोसले, स्वाभिमानीचे तालुकाध्यक्ष शरद भालेकर, शेकापचे रविकिरण कानगुडे, रयत क्रांतीचे कृष्णा काशीद, जनहित संघटनेचे राज्य प्रवक्ते रामराव काटे, रवींद्र मुठा, समाधान भालेकर, मुसा मुलानी, पप्पू आगलावे, पोपट आगलावे, विक्रम घायतीडक, विकास बारबोले, सदानंद आगलावे आदींसह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. या आंदोलनावेळी चोख पोलीस बंदोबस्त पांगरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री.यावलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठेवला होता.



# बंकलगीच्या जि.प. शाळेत निघालेल्या सापाला केले मुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**बंकलगी, दि.२ जानेवारी-**

बंकलगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत खिडकीत बिळात साप असल्याचे मुलांच्या लक्षात आले. भयभीत विद्यार्थी तसेच शिक्षकांनी वेळ न दडवता प्राणीमित्र श्रीकांत बनसोडे यांना संपर्क साधला. श्रीकांत बनसोडे यांनी तात्काळ त्या ठिकाणी भेट देऊन साप पकडला. साप पकडल्या नंतर संबंधित सापाची संपूर्ण माहिती बनसोडे यांनी सांगितली. साप हा शत्रू नसून आपला मित्र कसा आहे याचे प्रबोधन केले होते.

सापाला व्यवस्थितरित्या पकडून निसर्गाच्या सानिध्यात मुक्त केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका, सरपंच, तसेच बंकलगी गावातील नागरिकांतर्फे बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.



# नुतन नगरसेवक इंगळे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २ जानेवारी-**

मेजर संदिप सलगरे मित्र परिवार यांच्यावतीने नुतन नगरसेवक माजी नगराध्यक्ष वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थान चे अध्यक्ष महेश इंगळे यांचा शाल फेटा बांधुन मनोज जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . प्रभागातील नागरी समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन नवनिर्वाचित नगरसेवक महेश इंगळे यांनी यावेळी दिले.

याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मेजर संदिप सलगरे, मनोज जाधव, हिराचंद जामदार, नंदकुमार जगदाळे, ऋतुराज जामदार, सुतार, जाधव, संपादक प्रमोद मोरे, रमेश शिंदे, दर्शन घाटगे,,समर्थ स्वामी आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

# शहरात दररोज सुरळीत पाणीपुरवठा करा : मिलन कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ जानेवारी-**

मिलन कल्याणशेट्टी यांनी नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर शहरातील नागरी प्रश्न सोडवण्यासाठी एकच झपाटा सुरु केला आहे. अक्कलकोट येथील जलशुद्धीकरण केंद्र तसेच कुरनुर धरण येथील पंप हाऊस येथे भेट देऊन मार्चअखेर पर्यंत शहरातील सर्व घरांना नळ कनेक्शन जोडणी करून शहरात रोज सुरळीत पाणी पुरवठा करण्याचे संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना आदेश त्यांनी दिले आहेत. त्यामुळे मे पासून शहराला रोज सुरळीत पाणी पुरवठा होईल



अशी आशा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'जल-सुरक्षित' आणि 'आत्मनिर्भर' भारत बनवण्यासाठी केंद्र सरकारच्या अमृत २ योजनांची कामे अक्कलकोट शहरात सुरु आहेत. सदर काम ठेकेदार ज्योती कंटरक्शन प्रोपा. विजय मुंडे यांना मिळाले असून या योजनेसाठी जीएसटी वगळून ६० कोटीं रुपये मंजूर आहेत. ४ ऑक्टोबर २०२४ ला कार्यारंभ आदेश दिले असून एप्रिल २०२६ पर्यंत मुदत आहे. मुदतवाढ देणार नसल्याची ठाम भूमिका नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांनी घेतली. त्यामुळे मार्च अखेरपर्यंत काम पूर्ण होईल व मे पासून शहराला रोज पाणी पुरवठा शक्य आहे. कुरनूर धरण ते अक्कलकोटपर्यंत १६ की.मी. अंतर आहे. यापैकी उर्वरित ८ की.मी. कामे दोन महिन्यात पूर्ण करणे, जलशुद्धीकरण केंद्राचे उर्वरित ३० टक्के काम, सर्व घरांना नळ कनेक्शन जोडणीचे काम, पाण्याच्या टाकीचे काम दीड महिन्यात पूर्ण करणेच्या सूचना नगराध्यक्ष कल्याणशेट्टी यांनी पाहणी वेळी दिल्या. यावेळी मंडलअध्यक्ष प्रदीप पाटील, नगरसेवक ऋतुराज राठोड, सुनिल सिध्दे, सुनील राठोडसह पाणी पुरवठा उपअभियंता मनोजकुमार ईश्वरकट्टी तसेच पाणीपुरवठा कर्मचारी उपस्थित होते.

# शाकंभरीदेवी नवरात्रोत्सवाची आज सांगता; भाज्यांचे भाव वधारले

## अनेकांकडे कुळधर्म, कुळाचारासाठी असते ६० प्रकारच्या भाज्यांचा नैवेद्य



**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२ जानेवारी -**

शाकंभरी पौर्णिमेनिमित्त कुळधर्म, कुळाचारासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या साठ भाज्यांची किंमत येथील बाजारात शुक्रवारी (ता.२) तब्बल १ हजार २५१ रुपये होती. येथील भाजी मार्केटमध्ये शहरातील देवमारे कुटुंबियांकडून गेल्या चार पिढ्यांपासून या भाज्यांची विक्री केली जाते. पंढरपूरात काही कुटुंबियांचे शाकंभरी देवी हे कुलदैवत असल्यामुळे या कुटुंबियांकडून दरवर्षी शाकंभरी पौर्णिमेला शाकंभरीच्या नवरात्रोत्सवाची सांगता होते. त्यामुळे यादिवशी घरात कुळधर्म, कुळाचार करण्याची पध्दत आहे. त्यासाठी या भाज्यांची आवर्जून त्यांच्याकडून खरेदी केली जाते.

भारताची दक्षिण काशी तथा तिर्थक्षेत्र पंढरपूर येथे बनशंकरी म्हणजेच शाकंभरी नवरात्र उत्सव पुर्व परंपरेप्रमाणे अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. शाकंभरी देवीला तब्बल ६० प्रकारच्या विविध भाज्यांचा नैवेद्य दाखवला जातो. वैशिष्ठ म्हणजे रामप्रहरी सकाळी ६ वाजता म्हणजे घरमाशी उठायच्या आत देवीला नैवेद्य दाखवून भोजन द्यावे लागते. त्यामुळे शाकंभरी नवरात्र साजरा होणाऱ्या घरातील स्त्रियांना मध्यरात्रीच उठून स्वयंपाकाची तयारी करावी लागते. पंढरपूर येथील परिचारक, कटेकर, पूजारी, आवताडे, ऐतवाडकर, सप्ताश्व ही घराणी शेकडो वर्षांच्या पूर्वजांच्या परंपरेनुसार शाकंभरी नवरात्र साजरा करतात. येथील लिंगायत वाणी समाजातील काही कुटुंबियांचे देखील शाकंभरी देवी हे कुलदैवत आहे. त्यांच्या घरातून देखील कुळधर्म, कुलाचार केला जातो. या निमित्ताने कधीही न पाहिलेल्या दुर्मिळ अशा आयुर्वेदिक गुणांनी युक्त आरोग्यदायी फळभाज्या, पालेभाज्या खाण्यात येतात. पंढरपूर येथील देवमारे कुटुंबीय खास देवीची सेवा म्हणून या दुर्मिळ भाज्या विक्रीसाठी उपलब्ध करुन देतात. विशेष म्हणजे लातूर, पुणे आणि सोलापूर या तीन जिल्ह्यासह आजूबाजूच्या खेडेगावात रानोमाळ भटकत या भाज्या देवमारे कुटुंबियांकडून गोळा केल्या जातात. यासाठी त्यांना पाच ते सात दिवस लागतात.येथील देवमारे कुटुंबियातील गणपत देवमारे, राजाराम देवमारे, बसवेश्वर देवमारे, प्रवीण देवमारे हे चौघांनी फिरून दुर्मिळ भाज्या गोळा केल्या आहेत. देवमारे यांची ही चौथी पिढी आहे. दरम्यान कुळधर्म, कुळाचारासाठी येथील काही कुटुंबियांकडून नव्वद, शंभर तर काही कुटुंबियांकडून साठ भाज्यांची खरेदी करण्याची परंपरा आहे. पूर्वीप्रमाणे शंभर किंवा त्याहून अधिक भाज्या एकाचवेळी सध्या मिळत नाहीत. मात्र देवमारे कुटुंबिय अथक परिश्रम करुन विविध प्रकारच्या ६० ते ८० भाज्या उपलब्ध करुन देतात. यावर्षी देवमारे यांनी ८८ विविध प्रकारच्या भाज्या उपलब्ध करुन दिल्या आहेत. यामध्ये तब्बल ४५ फळभाज्या तर ४२ पालेभाज्यांचा समावेश आहे.

### आठ दिवस फिरुन गोळा कराव्या लागतात भाज्या

देवीस शंभर किंवा साठ प्रकारच्या विविध भाज्यांचा नैवेद्य दाखवावा लागतो पण पंढरीतील देवमारे कुटुंबीय खास सेवा म्हणून आठ आठ दिवस फिरून या दुर्मिळ रानभाज्या गोळा करतात येथील इंदिरा गांधी भाजी मार्केट मध्ये एक सेट १ हजार २५१, रुपयांना मिळतो,या भाज्या खरेदी करण्यासाठी पहाटे पासुन गर्दी असते, उशीर झाला तर भाज्या संपून जातात.

### या भाज्यांचा असतो समावेश

शांकभरी निमित्त लागणाऱ्या भाज्यात कोहाळे, आवळा, केव डागर, काशी भोपळा, काळी कोयरी, काळ माशी गड्डा, शिंगोळी, चिंच, उंबर दिंडी, काळा माका, मुकणी, राजगिरा, तांदुळसा, मुखणी, राजहंस, वासनी तेल, पाथर, कातमोडा, चिल, कडीपत्ता, मेहरी, माठ, काटेमार, कुजीर, कासुदा, अंबाडा, जवस, चुका, चाकवत, चुची, कपाळफुटी, जवस, सुपारी वेल, काड कुसुळा, तुरी, दुधनी, पडवळ, तोंडली, पटाडी शेंग, गोकर्ण शेंग, कवठ, बोर, केळी, कडे बळा, केळी फुल, रताळी वेल, कामुळ्या, आळू, आळु गड्डा, पपई, हरभरा, गाजर, गाजरपाला, मेथी, काशी भोपळा, पुदिना, देशी टोमॅटो, हादगा फुल, हादगा शेंग, हादगा पाला, रान पावटा, शेवगापाला, शेवगा शेंगा, मुळापाला, मुळा, मुळा शेंगा, वांगी, दोडका, गवारी, भेंडी, घेवडा, पावटा, दुधी भोपळा, वाळुक, कारले, कोबी, फ्लॉवर कोबी, गाजर, वाटाणा, शेपू, चिघळ, पालक, मिरची, करडा, घोळ, कोथींबीर, घोसावळे, चवळी, तुरी आदीं ८७ ते ८८ प्रकाराचा भाज्या गोळा केल्या जातात.

# टेंभुर्णीत वाळू माफियांचा पोलिसावर हल्ला

## वकिलावरही झाला होता हल्ला; कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२ जानेवारी-**

वाळू माफियांनी थेट कर्तव्यावरील पोलिस कर्मचाऱ्यावर जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना आलेगाव बुद्रुक (ता.माढा) येथे घडली. एक महिन्यापूर्वीच एका वकिलावर हल्ला झाला होता. त्यामुळे टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

डायल ११२ वरून मदतीचा कॉल आल्यानंतर घटनास्थळी गेलेल्या टेंभुर्णी पोलीस ठाण्यातील पोलिस कॉन्स्टेबल महेंद्र अशोक शेटे यांच्यावर जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी सरकारी कामात अडथळा, मारहाण व खुनाचा प्रयत्न या गंभीर कलमान्वये तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींच्या शोधासाठी दोन स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली आहेत. टेंभुर्णी पोलिस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १ जानेवारी रोजी दुपारी सुमारे ३ वाजता पोलिस कॉन्स्टेबल शेटे हे डायल ११२ ड्युटीवर कार्यरत असताना महादेव तुपसौंदर (रा. अकुंबे, ता. माढा) यांनी दोन इसमांनी मारहाण केल्याची माहिती देत स्वतःच्या जिवाला धोका असल्याचे सांगून पोलिस मदतीची मागणी केली होती. त्यानुसार शेटे तातडीने घटनास्थळी रवाना झाले.





आलेगाव बुद्रुक येथील भिमानगर रोडलगत महादेव तुपसौंदर यांना भेटून पोलीस शेटे हे सरकारी गणवेशात त्यांच्याशी बोलत होते. त्याचवेळी ग्रे रंगाची विटारा ब्रिझा भरधाव वेगाने तेथे आली. गाडीतून उतरलेल्या तीन इसमांनी पोलिस गणवेश पाहताच, तू इथे का आलास? असे म्हणत वाद घालण्यास सुरुवात केली. शेटे यांनी शासकीय कर्तव्य बजावण्यासाठी आलो असल्याचे सांगताच आरोपी अधिकच आक्रमक झाले. तिघांनी एकत्रितपणे शेटे यांची गच्ची पकडून धक्काबुक्की करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तुपसौंदर यांनाही ढकलून दिले. आरोपींनी शेटे यांना खाली पाडून काठीने त्यांच्या उजव्या हातावर मारहाण केली. यावेळी एकाने दगडाने डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. वार चुकवतानाच दगड त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस लागल्याने शेटे यांना चक्कर येऊन ते खाली बसले. इतक्यावरच न थांबता आरोपींपैकी एकाने, या पोलिसाला जिवंत सोडायचे नाही, असे म्हणत पुन्हा दगडाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. सरकारी गणवेशातील पोलिसावर होत असलेली मारहाण पाहून रस्त्यावरील नागरिकांनी गाड्या थांबवत तत्काळ हस्तक्षेप केला. नागरिकांच्या मदतीने पोलिस कॉन्स्टेबल शेटे यांची सुटका झाली. गर्दी वाढताच आरोपी आपली गाडी घेऊन घटनास्थळावरून फरार झाले. जखमी पोलिस कॉन्स्टेबल शेटे यांच्यावर मार्स हॉस्पिटल, टेंभुर्णी येथे उपचार करण्यात आले. उपचारानंतर त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रविंद्र रामचंद्र चंदनकर, रामचंद्र तुकाराम चंदनकर (दोघे रा. आलेगाव बुद्रुक, ता. माढा, जि. सोलापूर) तसेच रामचंद्र तुकाराम चंदनकर यांचा जावई यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने करीत असून आरोपींच्या अटकेसाठी दोन पथके सक्रिय आहेत.



कर्तव्य बजावत असताना पोलिसांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी आरोपींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. त्यांना लवकरात लवकर अटक करून कारवाई केली जाईल.
**- नारायण पवार,** पोलीस निरीक्षक टेंभूर्णी

**२०२२ मधील वाळू माफियांचा हल्ला :** २०२२ मध्ये गारआकोले गावात टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस देशमुख-माने व त्यांच्या सहकाऱ्यांवर वाळू माफियांनी वाहन घालण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेत पोलिसांच्या मोटरसायकलचे नुकसान झाले होते.

**पोलिस पथकांवर दगडफेक :** मारहाण प्रकरणाच्या चौकशीसाठी गेलेल्या पोलिस पथकावर जमावाने हल्ला केला होता. पोलीस उपनिरीक्षक अजित मोरे, पोलीस नाईक विनोद साठे यांच्यासह कर्मचाऱ्यांवर दगडफेक व धक्काबुक्की करण्यात आली होती. या प्रकरणी ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**आलेगाव बुद्रुकची ताजी घटना :** कर्तव्य बजावत असताना पोलिस कॉन्स्टेबल महेंद्र शेटे यांच्यावर हल्ला होणे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब असून यामुळे पोलीस दलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**राजकीय सवाल :** अवघ्या एका महिन्यात दोन गंभीर घटना घडत असताना आता तरी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार का? असा सवाल उपस्थित होत आहे.

## महत्वाचे...

### भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानची उद्या राज्य वक्तृत्व स्पर्धा

**सोलापूर, दि.२ जानेवारी-**



श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान व श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित वालचंद शिक्षण समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित श्री भाऊसाहेब गांधी राज्य वक्तृत्व स्पर्धा रविवार, ४ जानेवारी रोजी स. ९ वाजता वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स ॲन्ड सायन्सच्या वालचंद सभागृहात आयोजित केली आहे. इतिहास, साहित्य व रंगभूमीचे अभ्यासक ॲड.आनंद रामचंद्र देशपांडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव डॉ.रणजित गांधी हे असणार आहेत, असे प्राचार्य डॉ.अश्विन बोन्दार्डे, प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, डॉ.संतोष कोटी यांनी कळविले आहे.



### वानकरांच्या घरात घरफोडी करणाऱ्याला अटक; २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

सोलापुरातील बडे राजकीय प्रस्थ मानल्या जाणाऱ्या प्रकाश वानकर यांच्या घरात झालेल्या घरफोडीचा पोलिसांनी छडा लावला. यातील गुन्हेगाराला अटक आणि २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शहर गुन्हे शाखेने एका मोठ्या आंतरराज्य घरफोडीचा छडा लावत तेलंगणातील एका सराईत गुन्हेगाराला बेड्या ठोकल्या आहेत. दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी सलगरवस्ती पोलिस ठाण्याच्या हद्दीतील 'राजमुद्रा रेसिडेन्सी' दामोदर निवास येथे राहणारे प्रकाश दामोदर वानकर यांच्या घरात धाडसी घरफोडी झाली होती. चोरट्यांनी १३ लाख ५० हजार रुपयांची रोकड लंपास केली होती. याप्रकरणी सलगरवस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, १ जानेवारी २०२६ रोजी गुन्हे शाखेने मोईन मौलानासाब दुधेकुला (वय-२९, रा.नरसापूर, जि.विकाराबाद, तेलंगणा) याला ताब्यात घेतले. आरोपी मोईन याने सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर समजून चुकून इंटरनेट राऊटर चोरुन नेला होता. हाताचे ठसे उमटू नयेत म्हणून त्याने हाताला रुमाल बांधून चोरी केली होती. चोरीच्या पैशातून तो गोव्याला जाऊन मौजमजा करण्याच्या तयारीत होता, मात्र त्याआधीच सोलापूर पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. आरोपीकडून १३ लाख ५० हजार रुपये, ७ लाख रुपये किंमतीची स्विफ्ट कार, २ हजार रुपये किमतीचा इंटरनेट राऊटर असा २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



## ग्रंथालये डिजिटल होणे काळाची गरज : कुलगुरु डॉ. महानवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी-**

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यापीठे व महाविद्यालयांतील ग्रंथालयांनीही आमूलाग्र परिवर्तन स्वीकारणे आवश्यक आहे. पारंपरिक छापील ग्रंथांसोबतच डिजिटल स्वरूपातील ज्ञानसाधने उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

विद्यापीठातील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने पीएम उषा विभागाच्या सहकार्याने ग्रंथालय क्षमता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. महानवर हे बोलत होते. यावेळी डॉ. सुभाष चव्हाण तसेच उल्हासनगर येथील ग्रंथालय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. दत्तात्रय काळबंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक डॉ. अनिल घनवट यांनी केले. डॉ. सुभाष चव्हाण आणि तज्ज्ञ दत्तात्रय काळबंडे यांनी डिजिटल ग्रंथालय संकल्पना, ई-संसाधनांचे व्यवस्थापन, आधुनिक ग्रंथालय सेवा आणि भविष्यातील आव्हाने यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी डॉ.एस.व्ही. लोणीकर, डॉ.एस.एस. सूर्यवंशी, पी.टी. रणदिवे, पंकज जावळे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले. ग्रंथालय सहायक डॉ. पल्लवी सावंत यांनी आभार मानले.

# दूध उत्पादक शेतकरी आर्थिक चक्रव्यूहात

## पशुखाद्याचा खर्च जास्त, चाऱ्याची टंचाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जानेवारी**

राज्यातील दूध उत्पादक सध्या दुहेरी संकटात सापडला आहे. पशुखाद्याच्या किमतीत वाढ आणि चाराटंचाईने कंबरडे मोडले असताना, दुसरीकडे गेल्या सहा महिन्यांपासून दुधाच्या खरेदी दरात कोणतीही वाढ झालेली नाही. त्यामुळे उत्पादन खर्च वाढूनही उत्पन्न घटल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक चक्रव्यूहात अडकला आहे.

राज्याचे दूध संकलन प्रतिदिन सुमारे दोन ते सव्वादोन कोटी लिटरपर्यंत होते. त्यात सर्वाधिक जवळपास ७० टक्के गाईंच्या दुधाचा समावेश आहे. सध्या गाईच्या दुधाला प्रतिलिटर ३६ ते ३७ रुपये दर मिळत आहे. तर म्हशीच्या दुधाला प्रतिलिटर ५० ते ५२ रुपये मिळत आहेत. साधारण सहा महिन्यांपूर्वी १ जूनला गाईच्या दुधाचा दर १ रुपयांनी आणि म्हशीच्या दरात २ रुपयांनी कपात केली आहे.

तेव्हापासून आजपर्यंत दूध दरात एक पैशांचीही वाढ झालेली नाही. राज्यातील एकूण दूध उत्पादनांपैकी दूध पावडर, बटर यासाठी ३५ ते ४० टक्के दूध वापरले जाते. तर उर्वरित ६०-६५ टक्क्यांपर्यंतचे दूध पिशव्यांमधून विकले जाते. सध्या प्रक्रियायुक्त पदार्थांचे दर मात्र चांगलेच तेजीत आहेत. उलट दुधाची कमतरता, या नावाखाली त्यांचे दर भरमसाट वाढलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.



### पशुखाद्याचे भाव तेजीत

प्रति ५० किलोच्या शेंगापेंडीचे पोते आधी १७०० ते १८०० रुपयांपर्यंत मिळत होते, ते आता २२०० ते २५०० रुपयांवर पोचले आहे. ५० किलोचे गहू भुशाचे पोते पूर्वी १००० रुपयापर्यंत होते, ते आता १४०० रुपयांवर आहे. सुग्रासचे ५० किलोचे पोते १२०० रुपयांपर्यंत मिळत होते, तेही आता १८०० रुपयांवर आला आहे. २०० ते ४०० रुपयांच्या फरकाने पशुखाद्यांच्या दरात वाढ झाली आहे.

### जनावरांच्या किंमतीत घसरण

दूध व्यवसाय तोट्यात जात असल्याने बाजारात गाई-म्हशींच्या किमती निम्म्याने घटल्या आहेत. लाख रुपयांची जर्सी गाय आता ५० ते ६० हजारांत मिळत आहे, तर लाखाच्या घरातील म्हशी ६० ते ७० हजारांवर आल्या आहेत. नवीन जनावरे खरेदी करण्याकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. उलट जनावरे विक्रीकडे त्यांचा सर्वाधिक कल वाढतो आहे.

### दूध उत्पादनात १० ते २० टक्क्यांची घट

दूध हंगामाचा सध्या पुष्ट काळ असला, तरी वाढती थंडी, चाऱ्याची टंचाई या कारणामुळे राज्याच्या एकूण दूध उत्पादनात जवळपास १० ते २० टक्क्यांनी घट झाली आहे. १० लिटर दूध देणारी गाय आता ७-८ लिटरवर आली आहे. त्यामुळे एकीकडे दुधाचे अपेक्षित उत्पादन नाही, तर दुसरीकडे दुधाला दर नाही, या दोन्हीत मात्र शेतकऱ्यांची पुरती कोंडी झाली आहे.

आज रात्रौ ८ वा. स्मृती मंदिरात... ति.वि. थिएटरवर सुरु
"सर्वोत्कृष्ट विनोदी नाटक सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता"
प्रशांत दामले आणि हृषिकेश शेलार
प्रशांत दामले फॅन फाऊंडेशन प्रकाशित गौरी थिएटर्स निर्मित
लेखक दिग्दर्शक अद्वैत दादरकर नेपथ्य प्रदीप मुळ्ये
संगीत अशोक पत्की प्रकाश किशोर इंगळे
मूळ कथा- द.मा. मिरासदार
शिकायला गेलो एक
सूत्रधार- अजय कासुर्डे ९८६७२३६०८१

ऋषिकेश शेलार, सुशील इनामदार, अनघा भगरे, समृध्दी मोहरीर, चिन्मय माहूरकर आणि प्रशांत दामले
ऑनलाईन बुकिंग तिकिटालंय आणि बुक माय शो वर सुरु आहे.
फोन बुकींग : शिवाजी उपरे 9623004299




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

## भुममध्ये स्टेनलेस स्टील तार चोरी; चार जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**

सोनगिरी येथील धरणाच्या कॅम्प परिसरातून स्टेनलेस स्टील तार चोरी केल्याप्रकरणी भुम पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी दत्ता भागवत कुटे, अविनाश दिलीप कुटे, विश्वनाथ आण्णा दराडे व महादेव सुधाकर हांगे (सर्व रा. सोनगिरी, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साडेदहा वाजता १८ बंडल स्टेनलेस स्टील तार (किंमत सुमारे ९९ हजार रुपये) चोरून नेल्याचा आरोप आहे.




याप्रकरणी अमोल विजय पांडे (वय ३८, रा. यात्रा चौक, आकोट, जि. आकोला; ह.मु. सोनगिरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भुम पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३ (२), ३ (५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### तुळजापुर शहर स्वच्छतेबाबत काँग्रेस नगरसेवकांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**तुळजापूर, दि.२ जानेवारी -**

तुळजापुर शहरातील सर्व नाल्या, गटारी, परिसर व सार्वजनिक स्वच्छतागृहे तातडीने स्वच्छ करावीत, तसेच कचरा घंटा गाडीची दररोज वेळेवर व्यवस्था करावी, अशी मागणी नवनिर्वाचित काँग्रेसच्या नगरसेवकांनी मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील विविध भागांत मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरले असून अनेक ठिकाणी गटारी व नाल्या तुंबल्या आहेत. काही ठिकाणी गटारींच्या चेंबरवरील झाकणे दुरवस्थेत असून त्यांची तात्काळ दुरुस्ती करावी. शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहे व परिसर स्वच्छ नसल्याने दुर्गंधी पसरत असल्याचेही निदर्शनास आणले आहे. मंजूर ठिकाणी कचरा कुंड्यांची स्वच्छता करणे व कचरा घंटा गाडी दररोज सर्व शहरात फिरवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना नगरसेवक अमोल कुतवळ, रणजित इंगळे, आनंद जगताप, प्रगती लोंढे व चिन्मय मगर उपस्थित होते.




### ४६ वर्षांनंतर मंगरूळमध्ये माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन संपन्न

**मंगरूळ, दि.२ जानेवारी -**

तालुक्यातील मंगरूळ येथील जिल्हा परिषद शाळेत १९७८-७९ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचे तब्बल ४६ वर्षांनंतर स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. दीर्घ काळानंतर एकत्र आलेल्या बालसवंगड्यांच्या भेटीमुळे कार्यक्रमात भावनिक आणि आनंदी वातावरण निर्माण झाले होते. या स्नेहसंमेलनाची सुरुवात मंगरूळ येथील श्री कंचेश्वर मंदिरात करण्यात आली. यावेळी गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर ईश्वराचे दर्शन घेऊन सर्व मित्रांची नव्याने ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनाजी कुरुंद यांनी केले. कार्यक्रमात उपस्थित सर्व मित्रांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. शाळेतील खोडकर किस्से, शिक्षकांची शिस्त, वर्गातील गंमती-जमती यावर मनमोकळ्या गप्पा रंगल्या.



### भाजपा परंडा तालुक्याची २०२६ दिनदर्शिका प्रकाशित

**परंडा, दि.२ जानेवारी -**

भारतीय जनता पार्टी, परंडा तालुक्याच्या वतीने तयार करण्यात आलेल्या नूतन २०२६ भाजप दिनदर्शिकेचे प्रकाशन भाजपा नेते तथा आमदार मा. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते परंडा येथील संपर्क कार्यालयात करण्यात आले. ही दिनदर्शिका बाबासाहेब जाधव यांनी प्रकाशित केली असून त्यामध्ये भाजपाची विचारधारा, राष्ट्रीय महापुरुषांचे स्मृतिदिन तसेच महत्त्वाच्या तारखांचा समावेश करण्यात आला आहे. यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अ‍ॅड. संतोष सूर्यवंशी, जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. गणेश खरसडे, अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड. जहीर चौधरी, नगरसेवक समरजीतसिंह ठाकूर, सुखदेव टोंपे, शिवाजी पाटील, नागेश शिंदे, व्यंकटेश दीक्षित तसेच इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### भाऊसाहेब बिराजदार बँकेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन


**उमरगा, दि.२ जानेवारी -**

भाऊसाहेब बिराजदार अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या मुख्य कार्यालयात उमरगा येथे सन २०२६ या वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन आ. प्रवीण स्वामी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती जितेंद्र शिंदे, चेअरमन सुरेश दाजी बिराजदार, संचालक डॉ. शरणाप्पा मलंग, प्रा. सतीश इंगळे, नितीन होळे यांच्यासह प्रमुख उपस्थितीत दि.३१ रोजी संपन्न झाले.

### प्राचार्य डॉ.पी.एन. जाधव यांचे निधन

**धाराशिव, दि.२ जानेवारी -**

धाराशिव येथील तेरणा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.पी.एन. जाधव यांचे अल्पशा आजाराने दि.२ जानेवारी रोजी रात्री पुणे येथे निधन झाले. डॉ. जाधव यांनी तेरणा महाविद्यालयात सन २००३ ते २०११ या कालावधीत प्राचार्य म्हणून प्रभावीपणे कार्य केले. आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी मोलाचे योगदान दिले. डॉ. जाधव यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे, आप्तेष्ट, असंख्य विद्यार्थी व सहकारी असा मोठा परिवार आहे.



# धाराशिव तालुक्यात ११७ जमीन मोजणी प्रकरणांचा दोन दिवसांत होणार निपटारा

### आजपासून दोन दिवशीय विशेष मोहिम...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**

पावसाळ्यात काम होऊ न शकल्याने प्रलंबित राहिलेल्या जमीन मोजणी प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी धाराशिव तालुक्यात दि. ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या दोन दिवसांच्या मोहिमेत ११७ मोजणी प्रकरणांचा निपटारा केला जाणार असून इतर तालुक्यांतील ५५ सर्वेअर या कामासाठी सहभागी होणार आहेत.

जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सतत पाऊस व शेतजमिनीत चिखल असल्यामुळे मोजणीची कामे होऊ शकली नाहीत. त्यामुळे उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, धाराशिव येथे एकूण ७१० मोजणी प्रकरणे प्रलंबित राहिली असून त्यापैकी ५१० प्रकरणे मुदतबाह्य आहेत.

जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे सुहास दिवसे यांच्या निर्देशानुसार व उपसंचालक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर विभागाचे किशोर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे.

संबंधित जमीनधारकांना नोटिसा टपालाद्वारे पाठविण्यात आल्या असून ई-चावडीवरही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. अर्जदार व हितसंबंधितांनी उपस्थित राहून मोजणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख संग्राम जोगदंड यांनी केले आहे.



## वाशी पोलिसांकडून गोवंश वाहतुकीवर कारवाई; दोन आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**

भुम ते पार्डी रोडवरील पार्डी घाट परिसरात गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करताना वाशी पोलिसांनी कारवाई करून दोन जणांना ताब्यात घेतले.

आरोपी अभिजीत रघुनाथ कुटे (वय २७) व रामदास शिवाजी दराडे (वय ४०, दोघे रा. रामेश्वर, ता. भुम, जि. धाराशिव) हे पिकअप वाहन क्रमांक एमएच ४६ एएफ ०२१६ मधून सहा बैल व एक जर्सी गाय (किंमत सुमारे १ लाख ५५ हजार रुपये) कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक करत होते. जनावरांना चारा-पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने वाहतूक केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले.



या कारवाईत वाहनासह एकूण ९ लाख ५५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात प्राण्यांस क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम तसेच प्राणी परिवहन अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## कोंबडी चोरीच्या वादातून खून : आरोपीस जन्मठेप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**

कोंबडी चोरीच्या कारणावरून झालेल्या खून प्रकरणी भुम येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी.जी. धर्माधिकारी यांनी आरोपी श्याम जालिंदर भोसले (रा. ईट, ता. भूम, जि. धाराशिव) यास जन्मठेप कारावास व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.



मयत गारवा जाहिरात्या भोसले यांनी आरोपीस व त्याच्या साथीदारास कोंबडी चोरीबाबत जाब विचारून पुन्हा चोरी केल्यास पकडून देण्याचा इशारा दिल्याचा राग मनात धरून आरोपीने कुऱ्हाडीने डोक्यात घाव घालून खून केला होता. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गु.र. नं. २०५/२०२२ अन्वये कलम ३०२, ३४ भा.दं.वी अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. तपास पो. नि. एस. एस. दळवे यांनी केला असून दोषारोपपत्र पो.नि. सुरेश बुधवंत यांनी दाखल केले.

सत्र खटला क्र. ४९/२०२२ मध्ये सरकार पक्षातर्फे १३ साक्षीदार तपासण्यात आले. प्रत्यक्षदर्शी नसतानाही परिस्थितीजन्य व अन्य पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवले. सरकार पक्षातर्फे अतिरीक्त सरकारी अभियोक्ता किरण डी. कोळपे यांनी बाजू मांडली, तर पैरवी अधिकारी म्हणून सपोफौ. बाजीराव बळे यांनी काम पाहिले.

## श्रीक्षेत्र मैलारपुर येथे ३ जानेवारीला ऐतिहासिक खंडोबा यात्रा; लाखो भाविकांची उपस्थिती अपेक्षित

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२ जानेवारी -**

नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुर येथे भरत असलेल्या श्री खंडोबा यात्रेला शेकडो वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे. ही ऐतिहासिक यात्रा दि. ३ जानेवारी २०२६ रोजी भरत असून, यात्रेच्या सर्व तयारी पूर्ण झाल्या आहेत. नळदुर्ग नगरपालिका, नळदुर्ग पोलिस ठाणे आणि श्री खंडोबा देवस्थान मंदिर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने यात्रेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. यात्रेच्या दिवशी किमान ५ ते ६ लाख भाविक तसेच सुमारे १ हजार नंदीध्वज मैलारपुर येथे दाखल होण्याची अपेक्षा आहे.

श्रीक्षेत्र मैलारपुर यात्रेला अनन्यसाधारण धार्मिक महत्त्व आहे. याच पवित्र भूमीत श्री खंडोबा आणि माता बाणाई यांचा विवाह झाला असल्याची श्रद्धा आहे. त्या विवाह सोहळ्यासाठी स्वर्गातील सर्व देव या भूमीवर अवतरले होते, अशी आख्यायिका आहे. तेव्हापासून ही भूमी पवित्र मानली जाते. दरवर्षी येथे तीन दिवसांची यात्रा भरते आणि या कालावधीत कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते.



या यात्रेसाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यांतील लाखो भाविक श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी येतात. अनेक भाविकांचे श्री खंडोबा हे कुलदैवत आहे. विशेषतः नळदुर्ग व अणदुर परिसरासाठी खंडोबा देवाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. आजही पावणेदोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी श्री खंडोबा देवाचे आगमन नळदुर्ग येथील मैलारपुर मंदिरात झाले की, देव परत अणदुरला जाईपर्यंत नळदुर्ग शहरातील हिंदू बांधव आपल्या घरात काळे तिखट करत नाहीत, ही प्राचीन प्रथा आजही श्रद्धेने पाळली जाते.

यात्रेकरू व भाविकांच्या सोयीसुविधांसाठी नळदुर्ग नगरपालिका व श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टकडून पाणी, स्वच्छता, प्रकाश व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासन सज्ज असून, या समन्वयामुळे लाखो भाविक येऊनही यात्रेत कुठेही गोंधळाची परिस्थिती निर्माण होत नाही.

दरम्यान, यात्रेकरूंच्या वाहतुकीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या धाराशिव विभागाने ४० जादा बस सोडल्या आहेत. यामध्ये तुळजापूर आगारातून १५, उमरगा १०, धाराशिव ५, भूम ३, कळंब ५ आणि परंडा २ अशा बसचा समावेश आहे. या बसद्वारे निरंतर फेऱ्या करण्यात येणार असून, नळदुर्ग बसस्थानक ते श्रीक्षेत्र मैलारपुर दरम्यान कायमस्वरूपी बससेवा सुरू राहणार आहे.

ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या या यात्रेसाठी भाविक मोठ्या संख्येने मैलारपुरकडे येत असून, संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघणार आहे.

## मार्डी जि.प. शाळेस अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२ जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील मार्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार व विस्तार अधिकारी विश्वजीत चंदनशिवे यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शाळेतील सर्व वर्गांची शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापन पद्धती व विद्यार्थ्यांचा सहभाग प्रत्यक्ष पाहणीद्वारे तपासला.

शाळेतील शिस्तबद्ध कामकाज, नियोजनबद्ध अध्यापन व विद्यार्थीकेंद्रित उपक्रम यामागे मुख्याध्यापक श्री. सुरेश वाघमोडे यांच्या सक्षम नेतृत्वाची ठळक छाप दिसून येत असल्याचे नमूद करत गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यांनी वाघमोडे यांचे विशेष कौतुक केले. शिक्षकवृंदाला एकत्र ठेवून गुणवत्तावृद्धीसाठी त्यांनी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न प्रशंसनीय असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी शाळेतील उपक्रमशील व आदर्श शिक्षिका वर्षा चौधरी यांची राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी झालेली निवड हा अभिमानाचा क्षण ठरला. गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार व विस्तार अधिकारी विश्वजीत चंदनशिवे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना बिराजदार म्हणाले, वर्षा चौधरी यांनी राज्यस्तरावर निवड होऊन लोहारा तालुका व धाराशिव जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे. अशा गुणवंत शिक्षकांमुळेच जिल्हा परिषद शाळांची ओळख राज्यपातळीवर निर्माण होत आहे.

या प्रसंगी शाळेतील शिक्षक महानंदा चव्हाण, युवराज बनकर, रमाकांत खटके, वर्षा चौधरी उपस्थित होते. तसेच शालेय शिक्षण समितीचे सदस्य व शाळेच्या विकासासाठी सातत्याने योगदान देणारे शिक्षणप्रेमी योगेश देवकर यांनीही उपस्थिती लावली होती.

## परंड्यात अवैध वाळू उपसा : ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**

कपिलापुरी शिवारातील सिना नदी पात्रातून अवैधरीत्या वाळू उपसा केल्याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी इंद्रजित अरुण महाडीक (रा. मुगंशी, ता. माढा, जि. सोलापूर) व दोन अनोळखी इसमांनी दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी जेसीबी व ट्रॅक्टरच्या सहाय्याने सुमारे २५० ब्रास वाळू (किंमत अंदाजे १२ लाख ५० हजार रुपये) चोरून नेल्याचा आरोप आहे.



घटनास्थळी परंडा पोलिसांनी जेसीबी, चार ट्रॅक्टर, मालवाहू वाहन तसेच ट्रॅक्टरमधील ५ ब्रास वाळूसह एकूण ६३ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल विशाल सगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३ (२) तसेच गौण खनिज कायदा व सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## आळणी येथे स्वआधार मतिमंद मुलींच्या बालगृहात त्रिसूत्री कार्यक्रम संपन्न





### नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी ‘आमचा वाढदिवस’ उपक्रमातून माणुसकीचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील आळणी येथे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी समाजात माणुसकी, आपुलकी व संवेदनशीलतेचा संदेश देणारा हृदयस्पर्शी उपक्रम पार पडला. स्वाधार मतिमंद मुलींचा निवासी प्रकल्प, आळणी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेला आमचा वाढदिवस हा उपक्रम उपस्थितांच्या मनाला भावून गेला.

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या, विशेष काळजीची गरज असलेल्या मतिमंद मुलींचा वाढदिवस एकाच दिवशी साजरा करण्याची ही संकल्पना केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, त्या मुलींच्या आयुष्यात आनंद, आपलेपणा आणि विश्वास निर्माण करणारी ठरली. केक कापण्यापेक्षा मुलींच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले.

या कार्यक्रमास खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर हे त्यांच्या सुविद्य पत्नी संयोजनी राजेनिंबाळकर यांच्यासह उपस्थित होते. त्यांनी तेथील कर्मचारी, शिक्षकवृंद व विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांच्या आनंदात सहभागी झाल्याचा अनुभव शब्दांत मांडणे कठीण असल्याचे सांगितले. या मुलींच्या डोळ्यांत दिसणारा विश्वास आणि निरागस आनंद आयुष्यभर लक्षात राहणारा आहे, असे त्यांनी आपल्या मनोगतात नमूद केले.

या सामाजिक कार्यामागील प्रेरणास्थान असलेल्या शहाजी चव्हाण यांच्या कार्याचा विशेष उल्लेख यावेळी करण्यात आला. मतिमंद मुलींसाठी स्वाधारसारखे निवासी बालगृह उभारणे म्हणजे केवळ संस्था सुरू करणे नव्हे, तर समाजाने दुर्लक्षित केलेल्या आयुष्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्याची धाडसी जबाबदारी असल्याची भावना व्यक्त झाली. त्यांच्या संवेदनशील नेतृत्वातून उभे राहिलेले हे बालगृह अनेक मुलींसाठी खऱ्या अर्थाने ‘घर’ ठरले आहे.

कार्यक्रमास भाग्यश्री पाटील (दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर, धाराशिव), तहसीलदार मृणाल जाधव, नायब तहसीलदार विशाखा बलकवडे, दौलत निपाणीकर, पल्लवी निपाणीकर, तसेच शहाजी चव्हाण (सचिव, तुळजाई प्रतिष्ठान), गुरुनाथ थोडसरे (मुख्याध्यापक) यांच्यासह स्वाधार प्रकल्पातील विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे बालगृहातील १२ मुलींना जन्मदाखल्यांचे वाटप. जन्मदाखल्यांअभावी आधार कार्ड व विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी दूर झाल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रूपाली कांबळे (मानसोपचार तज्ज्ञ) यांनी प्रभावीपणे केले तर आभार प्रदर्शन श्रीमती माने मॅडम यांनी केले.

# विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची एनबीए मानांकनात हॅटट्रिक

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. २ जानेवारी :** ग्रामीण भागात अभियांत्रिकी शिक्षणाच्या क्षेत्रात दर्जा, गुणवत्ता आणि शैक्षणिक शिस्त यांचे आदर्श उदाहरण ठरलेल्या औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाला नॅशनल बोर्ड ऑफ अक्रेडिटेशन (एनबीए), नवी दिल्ली यांच्याकडून सलग तिर्सय़ांदा मानांकन प्राप्त झाले असून हटट्रिक पुर्ण झाली आहे.

या मानांकनासाठी महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर इंजिनीयरिंग, सिव्हिल इंजिनीयरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीयरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंग आणि मेकॅनिकल इंजिनीयरिंग या पाच प्रमुख शाखांकरीता एनबीए मानांकनाची मागणी करण्यात आली होती. या पाचही शाखांना मानांकन प्राप्त झाले आहे. या सर्व शाखांना सलग तिर्सय़ांदा एनबीए मानांकन मिळाल्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक दर्जावर व पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर भक्कम शिक्कामोर्तब झाल्याचे मत संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी व्यक्त केले.

### महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची भक्कम पावती

एनबीए मानांकन प्रक्रिया अत्यंत कठोर व बहुआयामी निकषांवर आधारित असते. अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन पद्धती, शिक्षकांची शैक्षणिक व संशोधन पात्रता, प्रयोगशाळा, अत्याधुनिक ग्रंथालय व पायाभूत सुविधा, उद्योगांशी



असलेली सांगड, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, निकालांची गुणवत्ता, प्लेसमेंट तसेच संस्थेचे दीर्घकालीन शैक्षणिक धोरण या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून मानांकन दिले जाते. या सर्व निकषांवर महाविद्यालयाने सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे हे मानांकन मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

संस्थेचे अध्यक्ष शिव-चरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, संचालक जयशंकर हुरदळे, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी आलमला चे चेअरमन विश्वनाथ बिराजद-ार, योगेश धाराशिवे, अमरसिंग हजारी व सर्व संचालक मंडळ यानी समाधान व्यक्त केले.महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित असून, विशेषतः गुणवत्तापूर्ण अध्यापन, कौशल्याधारित शिक्षण, संशोधनास प्रोत्साहन, तसेच विद्यार्थिंना उद्योगाभिमुख बनवण्यावर महाविद्यालयाचा भर असल्याचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे यांनी सांगितले.

**लातूर जिल्ह्याचा अभिमान उंचावला**

ग्रामिण भागातील विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने केलेली कामगिरी केवळ संस्थेसाठीच मर्यादित नसून लातूर जिल्ह्याचा आभिमान उंचावणारी आहे. असे मत प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालय भविष्यातही नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, संशोधन व स्टार्टअप संस्कृतीला चालना देत विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम करण्याचा संकल्प करत असल्याचे संस्थेच्या वतीने सचिव बसवराज धाराशिवे यांनी स्पष्ट केले. या उल्लेखनीय यशाबद्दल शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या स्वाती कापसे, विश्वेश्वरय्या इन्स्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य किशोर जेवे यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# राष्ट्रीय स्पर्धेत यशवंतचा साईप्रसाद ठरला गोल्डन बॉय

## जान्हवी जारोधव व रोहिणी पाटील ठरल्या सुवर्णकन्या

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २ जानेवारी :** २६ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान छत्रपती संभाजी नगर येथे



६९ व्या १७ वर्षा खालील गटाच्या राष्ट्रीय शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत यशवंत विद्यालयाच्या गुणवंत खेळाडूंनी उत्तम यश संपादन करुन गोल्ड मेडल प्राप्त केले.

सदरील स्पर्धेत यशवंत विद्यालयाचे साईप्रसाद संग्राम जंगवाड,जान्हवी गणपतराव जारोधव, रोहिणी देवराव पाटील यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना साईप्रसादने इपी वैयक्तिक व सांघिक प्रकारात भारता-तून प्रथम क्रमांक पटकावत दोन सुवर्णपदके मिळविली .तर जान्हवी व रोहिनी यांनी इपी सांघिक प्रकारात भारतातून प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदकाची कमाई केली आहे. याचबरोबर जान्हवीची वरिष्ठ गटाच्या आशियाई स्पर्धेसाठी पटियाला येथील प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे.

नूतन वर्षात हा सुवर्णयोग यशवंत विद्यालयाला प्राप्त झाला आहे. जान्हवी व रोहिणी यांनी नुकत्याच दिल्ली येथे पार पडलेल्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेतही रौप्य पदकही पटकावलेले आहे. वरील यशस्वी खेळाडूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त दत्ता गलाले, क्रीडा शिक्षक संतोष कदम यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.अशोक सांगवीकर, संस्थेचे सचिव डी. बी.लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके,सहसचिव डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी, क्रीडा शिक्षक, दिपक हिंगणे, प्रभावती मिरजकर, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन करुन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लाच घेताना गुंजरगा तलाठी मुंडे रंगेहाथ सापडला

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २ जानेवारी :** निलंगा तालुक्यातील गुंजरगा सज्जाचा तलाठी कमलाकर विठ्ठलराव मुंडे यांनी उत्पन्नाच्या दाखल्यासाठी २५०० रुपयांची लाच स्वीकारताना लातूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडला.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, निलंगा तालुक्यातील सोनखेड येथील विमलबाई मोहन सोळंके यांना श्रावण बाळ इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेण्यासाठी सादर करावयाच्या अर्जा सोबत उत्पन्नाच्या दाखल्याची गरज होती. उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्यासाठी गुंजरगा येथील ग्राम महसूल अधिकारी अर्थात तलाठी कमलाकर विठ्ठलराव मुंडे यांना ५००० रुपयांची मागणी केली होती.

यासंदर्भात तक्रारदारांनी लातूरच्या लातूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. लाजलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबतची पडताळणी करून गुरुवार दिनांक १ जानेव-ारी २०२६ रोजी दुपारी शहरातील दत्तनगर भागातील खाजगी तलाठी कार्यालयात तडजोडी अंती २५०० रुपये स्वीकारताना तलाठी कमलाकर मुंडे यांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी पोलीस उपाधीक्षक संतोष धनसिंग बर्गे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून निलंगा पोलीस ठाण्यात कमलाकर मुंडे यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे

# सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी सतर्कता हाच उपाय : भातलवंडे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २ जानेवारी :** आजच्या डिजिटल युगात सायबर फसवणुकीचे प्रकार वाढत असून विद्यार्थ्यांनी विशेष सतर्कता बाळ-गावी, असे आवाहन डीवायएसपी गजानन भातलवंडे यांनी केले, ला-तूर जिल्हा पोलीस प्रशासन तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात आयोजित सायबर सुरक्षा जागरूकता सत्रात ते बोलत होते.

या वेळी डीवायएसपी भातलवंडे यांनी मोबाईल प्स, ओटीपी, आंतरराष्ट्रीय कॉल्स तसेच डिजिटल अरेस्टसारख्या फसवणुकीच्या प्रकारांबाबत सविस्तर माहिती दिली. अनोळखी लिंक किंवा प्सवर विश्वास ठेवू नये, केवळ अधिकृत स्रोतांमधूनच प्स डाउनलोड करावेत व अनावश्यक परवानग्या देऊ नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले. ओटीपी हा वैयक्तिक पासवर्ड असल्याने तो कोणालाही देऊ नये, बँक अधिकारी किंवा पोलिस असल्याचे सांगून मागितला तरीही ओटीपी शेअर करू नये, असा इशाराही



त्यांनी दिला. तसेच आंतरराष्ट्रीय किंवा संशयास्पद कॉल्स टाळावेत, कॉल फॉरवर्डिंग सुविधा बंद ठेवावी आणि कोणत्याही प्रकारची सायबर फसवणूक झाल्यास त्वरित हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा प्रत्यक्षात अवलंब करून स्वतःसह कुटुंबाचेही सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण करावे, असे आवाहन यावेळी पी आय राजकुमार पुजारी यांनी केले.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्रा-चार्य डॉ. एस. एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पीआय राजकुमार पुजारी आणि पीएसआय सुधाकर केंद्रे, महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# राजस्व अभियानांतर्गत डोंगरकोनाळी येथे प्रमाणपत्र वितरण

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. २ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत तहसील कार्यालय जळकोट व संबंधित विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने डोंगरकोनाळी ता. जळकोट येथे दाखले वितरण व सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या राजस्व शिबिरामध्ये विविध विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारून नागरिकांना अनेक शासकीय सेवांचा लाभ देण्यात आला. यावेळी ई-राशन कार्ड वाटप, शेतकऱ्यांना ७/१२ व ८-अ



उतारे, जॉबकार्ड वाटप करण्यात आले. तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय जळकोट व अंगणवाडीच्या वतीने बेबी केअर किट, आरोग्य तपासणी, कृषी विभागामार्फत फवारणीसाठी औषधांचे वाटप करण्यात आले. ई-केवायसी कॅम्प, दिव्यांग अन-ुदान ई-केवायसी कॅम्प, तसेच उत्पन्न, रहिवासी, ईडब्ल्यूएस व शेतमजूर प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले. हे शिबिर लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

यावेळी तहसीलदार राजेश लांडगे, नायब तहसीलदार सुहास मुजोळकर, नायब तहसीलदार रंगनाथ कराड, पुरवठा निरीक्षक अधिकारी अर्पण राऊत, शिक्षण विस्तार अधिकारी के. पी. बिराजदार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते लाभार्थ्यांना दाखले वितरित करण्यात आले.

तहसीलदार राजेश लांडगे यांनी बोलताना म्हणाले जककोट तालुक्यातील नागरिकांना शासकीय कार्यालयांचे खेटे मारावे लागू नयेत, यासाठी शासन यंत्रणाच थेट जनतेपर्यंत पोहोचत असून हे एक जनताभिमुख अभियान आहे, यांचा पुरेपुर आपण लाभ घ्यावेत असे बोल-ताना सांगितले. त्यांनी अधिकाधिक गरजू लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले.

शिबिरासाठी शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शिबिरास या परिसरातील गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शासन आपल्या दारी येऊन विविध सेवा गावातच उपलब्ध करून दिल्याबदल गावकऱ्याच्या चेहऱ्यावर काहीशे समाधान दिसून येत होते.



# वेटलिफ्टिंग स्पर्धेत अभिषेक निडवंचे जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. २ जानेवारी :** तालुक्याचा सुपुत्र अभिषेक किशोर निडवंचे याने धनपूर जिल्हा मेडीसीटी मेडीकल कॉलेज तेलंगणा राज्यातील धनपूर जि मेडचल या कॉलेज मधुन डब्लू पी सी असोसिएशनच्या वतीने आयोजित वेटलिफ्टिंग पावर चंपीयन्सीपमध्ये ६७.५ वजन गटातून १ क्विंटल ५० किलो वजन उचलून तेलंगणातील मेडचल जिल्ह्तून प्रथम क्रमांक पटकावून देवणीचे नाव देशपा-तळीवर उंचावले असून देवणीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला आहे.

या यशाबद्दल सुधाकरराव पाटील निटुरकर, संदीप पाटील आदि सह नातेवाईक व मीत्र परिवारातून अभिनंदन होत आहे.

# म.गांधी महाविद्यालयाचा संघ बॉल बॅडमिंटनमध्ये प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २ जानेवारी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व महात्मा फुले महाविद्यालय किनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेमध्ये महात्मा गांधी महाविद्यालयाचा मुलांचा संघ प्रथम आला आहे. सदरील स्पर्धा किनगाव येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संपन्न झाल्या असून, या स्पर्धेत महाविद्यालयातील सय्यद फैजान, सय्यद सईद, सदाशिव शिरोळे, सूर्यवंशी ऋषिकेश, सय्यद अरहान, तांबोळी खलीफ या खेळाडूंनी अत्यंत चुरशीची व चांगली खेळी खेळून महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या उज्वल व यशस्वी परंपरेत मोलाची भर घातली आहे. या खेळाडू विद्यार्थ्यांना माजी खेळाडू पी.एस. आय. असद शेख व क्रीडा संचालक डॉ विनोद माने यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयात सत्कार करून संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे, सचिव अँड पी. डी कदम, कोषाध्यक्ष रामचंद्रराव शेळके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, क्रीडा संचालक तथा सिनेट सदस्य, विनोद माने, स्टाफ सेक्रेटरी डॉ. ए. पी. कांबळे, श्री सिद्धेश्र्वर चोथवे, शंकर शेळके व महाविद्यालय परिवाराने हार्दिक अभिनंदन केले आहे.

# निलंगा येथे भीमा कोरेगाव शौर्यदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २ जानेवारी :** निलंगा शहरातील अशोक नगर येथे २०८ वा भीमा कोरेगाव शौर्य



दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने अशोक नगर येथील बुद्ध विहारात २०८ वा भीमा कोरेगाव शौर्यदिनाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वतःच्या न्याय हक्कासाठी व माणूस म्हणून सन्माननीय जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी १जानेवारी १८१८ रोजी ५०० महार सैनिकांनी रणसंग्राम पुकारला होता. यात शहीद झालेल्यांना मानवंदना देऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी तानाजी सुरवसे, अमित गायकवाड, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष धम्मानंद काळे, केतन सुरवसे,नगर सेवक सचिन गायकवाड, ड बी. आर. धैर्य, धम्मानंद सुर्यवंशी, कुलभूषण कांबळे, साहिल, मानव, प्रेम, चेतन गायकवाड, चेतक, ऋतिक, बुद्धभूषण, पवन कांबळे, अर्जुन, सिद्धार्थ सुरवसे, पांडुरंग पात्रे,साकेत विशाल गायकवाड, समता सैनिक, विदिशा विशाल गायकवाड, महिला प्रतिनिधी मदाळेताई, सर्व समता सैनिक दल उपस्थित होते. यावेळी इंद्रजित कांबळे सर समता सैनिक वाढली पाहिजे यावर मार्गदर्शन केले, तसेच समता सैनिक प्रमुख विशाल गायकवाड यांनी शौर्य दिनाचे महत्व सांगितले सामाजिक समता स्थापित करण्यासाठी शील संपन व्यक्ती घडविण्यासाठी समता सैनिक दलाची गरज आहे.

# बिटरगाव शाळेच्या विज्ञान प्रयोगची राज्यस्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २ जानेवारी :** तालुक्यातील बिटरगाव शाळ-ेला अहमदपूर येथे झालेल्या ५३ व्या जिल्हास्तरीय विज्ञान२०२५-२०२६ प्रदर्शनात बिटरगाव जि प शाळेला मोठे यश मिळाले असून या शाळेच्या प्रयोगास राज्यस्तरावर निवड झाल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक राजेश्र्वर व्यवहारेंनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

या शाळेचा प्राथमिक गट इयत्ता पहिली ते आठवी या गटात द्वितीय क्रमांक मिळाला यापूर्वी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात याच प्रयोगाला तालुकास्तरीय दुहेरी दोन प्रथम बक्षीस मिळाली. या प्रयोगाचे नाव अटर सॉफ्टवेअर द्वारे रोबोटला स्वयंचलित करणे असे असून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून विद्यार्थ्यांने रोबोटला स्वयंचलित करून प्रयोग सादर केला. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया गटविकास अधिकारी सुमित जाधव, शिक्षण विस्तार अधिकारी देशपांडे, लहाने, खंदाडे, जाधव, मुख्याध्यापक बळीराम चव्हाण शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोपाळ आलापुरे, सरपंच महेंद्र पाटील, सायांन्ना तोटावाड, शोभा कांबळे, शकुंतला कदम ,वर्षा ठोंबरे, कल्पना कटके, माणिक पवार, प्रमोद कटके यांनी विद्यार्थी शिक्षक त्यांचे अभिनंदन केले.

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडनीय विभाग)**

जा.क्र. २०२५एमएजी कावि ०८ दि.१/१/२६

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

**जाहीर प्रगटन**

**जन्म मृत्यू नोंदणी बाबत**

श्री. ईस्माईल खाजा शेख विरुद्ध ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बाकली ज्याअर्थी नामे कासीम इस्माईल शेख रा. बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा/यांच्या मुलाचा/ मुलीचा/ नाताचा/ना-तीचा जन्म दि.१२/४/२००३ रोजी मौजे बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार इस्माईल खाजा शेख रा. बाकली यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/ मुलीच्या/ नाताच्या/ नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशित करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्याने शपथ पत्र ग्रामपंचायत कार्यालय बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे त्यांच्या जन्मबाबतची नोंद नसल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. त्याअर्थी सदरहु नामे कासीम इस्माईल शेख रा. अंकुलगा राणी ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर ह्याचा/ हिचा जन्म दि.१२/४/२००३ रोजी झाला नाही, असे कोणाला सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहु नामे कासीम इस्माईल शेख रा.बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांच्या जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेऊन अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**तहसीलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी कार्यालय**
**शिरूर अनंतपाळ**

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडनीय विभाग)**

जा.क्र. २०२५ एमएजी कावि दि.१/१/२६

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

**जाहीर प्रगटन**

**जन्म मृत्यू नोंदणी बाबत**

श्री. ईस्माईल खाजा शेख विरुद्ध ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बाकली ज्याअर्थी नामे इरफान इस्माईल शेख रा. बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा/यांच्या मुलाचा/ मुलीचा/ नाताचा/ना-तीचा जन्म दि.८/५/२००८ रोजी मौजे बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार इस्माईल खाजा शेख रा. बाकली यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/ मुलीच्या/ नाताच्या/ नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशित करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्याने शपथ पत्र ग्रामपंचायत कार्यालय बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे त्यांच्या जन्मबाबतची नोंद नसल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. त्याअर्थी सदरहु नामे इरफान इस्माईल शेख रा. अंकुलगा राणी ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर ह्याचा/ हिचा जन्म दि.८/५/२००८ रोजी झाला नाही, असे कोणाला सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहु नामे इरफान इस्माईल शेख रा.बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांच्या जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेऊन अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय**
**शिरूर अनंतपाळ**

धाराशिव
# जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कळंब बसस्थानकात गर्दीचा फायदा घेऊन सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**
कळंब पोलीस ठाणे हद्दीत बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने तरुणीच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत फिर्यादी अनुराधा प्रविण माळी (वय १९ वर्षे, रा. चिंचोली ता. केज जि. बीड, सध्या रा. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.४२ वाजण्याच्या सुमारास कळंब बसस्थानक येथे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात व्यक्तीने त्यांच्या



गळ्यातील १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, अंदाजे ६० हजार रुपये किंमतीचे, चोरून नेले.

या प्रकरणी दि. ३१ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### उमरगा येथे भीमा कोरेगाव शौर्यदिन उत्साहात साजरा

**उमरगा, दि.२ जानेवारी -**
उमरगा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून १ जानेवारी रोजी भीमा कोरेगाव शौर्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने समता सैनिक दलाने मानवंदना दिली. या कार्यक्रमास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष कैलास शिंदे, माजी समाजकल्याण सभापती हरिष डावरे, दिलीप भालेराव, रिपाइंचे दगडू भोसले, शाहूराज गायकवाड, बाबुराव गायकवाड, बौद्ध महासभेचे अध्यक्ष उमेश सुरवसे, श्रीधर सरपे, डी.टी. कांबळे, विजय झाकडे, अविनाश भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते. दिवसभर दाळिंब येथील राहुल कला पथकाच्या वतीने भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी दि लॉर्ड बुद्धा रिलिजियस अँड चॅरिटेबल ट्रस्टचे उपाध्यक्ष एम.एस. सरपे, अविनाश भालेराव, सुभाष काळे, बौद्धाचार्य उमेश सुरवसे, संगीता सोनकांबळे, तातेराव मादळे, किरण कांबळे, सुरेखा कांबळे, आनंद कांबळे, लिंबारी गायकवाड, सिद्राम भोसले, माजी तालुकाध्यक्ष संतोष सुरवसे, जी.एल. कांबळे आदींनी अभिवादन केले.

### दारफळ शिवारात गोठा फोडून तीन म्हशींची चोरी

**धाराशिव, दि.२ जानेवारी -**
बेंबळी पोलीस ठाणे हद्दीत दारफळ शिवारात अज्ञात चोरट्यांनी शेतातील गोठ्याचा दरवाजा उचकटून तीन म्हशी चोरून नेल्याची घटना घडली आहे.



याबाबत फिर्यादी अमोल दिनकर देशपांडे (वय ४८ वर्षे, रा. दारफळ ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या तीन म्हशी (एकूण किंमत सुमारे ७५ हजार रुपये) या दि.७ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून ते दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने गोठ्याचा दरवाजा उचकटून चोरून नेल्या. या प्रकरणी फिर्यादी यांनी दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास बेंबळी पोलीस करीत आहेत.

### कॅडेट अर्जुन पाचंगे याची 'युथ एक्सचेंज प्रोग्राम'साठी आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड

**उमरगा, दि.२ जानेवारी -**
उमरगा येथील भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथील एनसीसी



कॅडेट अर्जुन पाचंगे याची 'संबळ' या कला प्रकारात भारताच्या संघात सांस्कृतिक वादन व गीत या प्रकारासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील 'वाईपी' (Youth Exchange Program) साठी निवड झाली आहे. ही उमरगा तालुक्यासाठी व महाविद्यालयासाठी अभिमानास्पद बाब आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे, सर्व संचालक मंडळ, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, एनसीसी अधिकारी कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, प्रा. गुंडाबापू मोरे, प्रा. शैलेश महामुनी, राजकुमार सोनवणे, नितीन कोराळे यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व कॅडेट्स यांनी अर्जुन पाचंगेचे अभिनंदन केले आहे.

### गोलेगाव शिवारात महिलेकडील मंगळसूत्राची जबरी चोरी

**उमरगा, दि.२ जानेवारी**
वाशी तालुक्यातील गोलेगाव शिवारात एका महिलेकडील सोन्याचे मंगळसूत्र जबरीने हिसकावून नेल्याची घटना घडली आहे.



याबाबत फिर्यादी कल्पना कालीदास कागदे (वय ३८, रा. गोलेगाव, ता. वाशी, जि. धाराशिव) यांनी वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, दि.३० डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास त्या गोलेगाव शिवारातून घराकडे जात असताना अनोळखी दोन इसम मोटरसायकलवर आले. त्यापैकी एका इसमाने त्यांच्या गळ्यातील तीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र (किंमत अंदाजे १५ हजार रुपये) जबरीने हिसकावून नेले. या घटनेप्रकरणी फिर्यादीने दि.३१ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वाशी पोलीस करीत आहेत.

## उमरगा येथील जि.प. हायस्कूलमध्ये 'माझी शाळा माझी परसबाग' उपक्रमातून सेंद्रिय भाजीपाला उत्पादन

**सेंद्रिय भाजीपाल्याची निर्मिती पालकांचाही लागतोय हातभार....**



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ जानेवारी -**
उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत 'माझी शाळा माझी परसबाग' हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. शाळेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक बशीर शेख व प्रवीण शिंदे यांच्या सहकार्याने शाळेतील विद्यार्थ्यांनी परसबागेची निर्मिती केली आहे.

गतवर्षीही या शाळेला परसबाग निर्मितीसाठी तालुक्यातून द्वितीय क्रमांक मिळून पाच हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले होते. विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक वाढावी, त्यांना पोषक व दर्जेदार आहार मिळावा, तसेच कुपोषण दूर व्हावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शाळेचे माजी विद्यार्थी व उमरगा शहरातील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. अनंत मुगळे यांच्या आर्थिक सहकार्यातून शालेय परिसरात वीस गुंठ्यांमध्ये परसबाग विकसित करण्यात आली आहे. तसेच लोकसहभागातून डॉ. ज्योती सातपुते यांनी वांगे, टोमॅटो, नारळ व शेवग्याची रोपे देऊन सहकार्य केले आहे. विद्यार्थ्यांच्या परिश्रमातून विकसित झालेल्या या परसबागेतून गेल्या दोन महिन्यांपासून शालेय पोषण आहारासाठी सेंद्रिय भाजीपाल्याचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत आहे. टोमॅटो, वांगी, मिरची, दोडके, कांदे, पालक, मेथी, कोथिंबीर, अंबाडी, भोपळा आदी फळभाज्या व पालेभाज्या मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. शालेय पोषण आहारासाठी भाजीपाला वापरूनही विक्रीसाठी भाजीपाला उपलब्ध होत असून, आतापर्यंत २,५०० रुपयांचे उत्पन्न परसबागेतून मिळाल्याची माहिती मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी दिली. परसबागेसाठी शाळेत गांडूळ खत निर्मिती करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी मदतनीस कविता केदारे, सुमन साठे, सखु चव्हाण, वनमाला वाले व सुनिता राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले.

ही परसबाग उमरगा शहरात कुतूहलाचा विषय ठरली असून विविध समाजातील शिक्षणप्रेमी नागरिकांनी शाळेला भेट देऊन परसबाग पाहिली आहे. तसेच उमरगा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, बीटचे विस्तार व केंद्रप्रमुख शीला मुदगडे यांनीही परसबागेस भेट देऊन शाळेचे मुख्याध्यापक व उपक्रमात सहभागी सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

## 'तेरणा'च्या विद्यार्थ्यांचे व्यवसाय कल्पना स्पर्धेत यश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**
धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय हे विद्यार्थ्यांना रोजगार व उद्योगक्षेत्रात यशस्वी करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ म्हणून ओळखले जाते. केवळ नोकरीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी स्वतःचे उद्योग सुरू करून रोजगारनिर्मिती करावी, यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे.

याच अनुषंगाने ऑगस्ट २०२५ मध्ये उद्योजकता प्रोत्साहनासाठी प्रसिद्ध असलेल्या भारतीय युवा शक्ती ट्रस्ट (इधढढ), पुणे यांनी इंडसइंड बँकेच्या सहकार्याने व्यवसाय कल्पना स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील १९ संस्थांकडून एकूण १६४ व्यवसाय कल्पना सादर झाल्या.

या स्पर्धेचा निकाल ३१ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर झाला असून एकूण ९ विजेत्यांपैकी ७ विद्यार्थी तेरणा महाविद्यालयाचे असल्याने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. स्पर्धेत प्रथम पारितोषिक शेख समीर, द्वितीय निखिल मैदाड, तर तृतीय पारितोषिक शेख नयूम व गायत्री मोरे यांनी पटकावले. तसेच हर्षराज पाटील, अमोल काळदाते व अंकिता शिंदे यांच्या नाविन्यपूर्ण व्यवसाय कल्पनांचाही सर्व स्तरातून गौरव करण्यात आला.

या विद्यार्थ्यांच्या कल्पनांचे प्रोटोटाइप व पुढे त्यांचे व्यवसाय मॉडेलमध्ये रूपांतर करण्यासाठी भारतीय युवा शक्ती ट्रस्ट व तेरणा पब्लिक ट्रस्ट संचलित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या माध्यमातून आवश्यक मेंटॉरशिप व मार्गदर्शन देऊन त्यांना उद्योजक घडविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास उद्योजक हनुमंत मडके, भारतीय युवा शक्ती ट्रस्ट सल्लागार समितीचे अध्यक्ष रवींद्र साळुंके, प्राचार्य डॉ. संदीप देशमुख, उद्योजक संजय देशमाने, तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रम सिंह माने, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी अशोक जगताप, डॉ. सुशील होळबे तसेच इंडसइंड बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले, तेरणा महाविद्यालय स्टार्टअप संस्कृतीसाठी सातत्याने कार्यरत असून, भविष्यात आमचे अनेक विद्यार्थी यशस्वी उद्योजक म्हणून नावारूपास येतील.

या यशाबद्दल तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील, मल्हार पाटील तसेच व्यवस्थापकीय समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे यांनीही सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## धाराशिव : मार्केट यार्डमध्ये तब्बल ८.८१ कोटींचा शेतकरी फसवणूक प्रकार उघड | गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**
धाराशिव शहर पोलीस ठाणे हद्दीतील मार्केट यार्ड परिसरात शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

याबाबत फिर्यादी पवन चंद्रसेन मकोडे (वय ५४ वर्षे, व्यवसाय सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सुनिल विठ्ठल काकडे (मयत), विठ्ठल श्रीरंग काकडे व मिनील विठ्ठल काकडे यांनी दि.३० सप्टेंबर २०२१ ते ५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आडत दुकान लाईन, दुकान नं. २८, विठ्ठल श्रीरंग काकडे मार्केट यार्ड, धाराशिव येथे बेकायदेशीर कृत्य केले.

आरोपींनी बाजार समिती धाराशिव तसेच बाजारात माल विक्रीसाठी आणणाऱ्या ३७६ शेतकऱ्यांकडून विश्वासाने घेतलेल्या शेतमालाची विक्री करून त्याची एकूण रक्कम तब्बल ८ कोटी ८१ लाख ८९ हजार ८५७ रुपये शेतकऱ्यांना अदा न करता अपहार केला, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी फिर्यादी यांनी दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास धाराशिव शहर पोलीस करीत आहेत.

### वाहतूक नियम भंगावर कडक कारवाई

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी दि.३१ डिसेंबर रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा नियमभंग प्रकरणी एकूण २८३ कारवाया केल्या. या कारवाईतून २ लाख २७ हजार ६५० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

## खोटा धनादेश देऊन फसवणूक; आरोपीस सहा महिन्यांचा कारावास

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२ जानेवारी -**
लग्नासाठी उसने घेतलेली रक्कम परत न करता खोटा धनादेश देऊन फसवणूक केल्याप्रकरणी धाराशिव येथील सत्र न्यायालयाने आरोपीस सहा महिन्यांचा सक्त कारावास तसेच तक्रारदारास रक्कम परत करण्याचे आदेश दिले आहेत.

न्यायालयीन माहितीनुसार, चिखली (ता.जि. धाराशिव) येथील काशिनाथ हनुमंत भोजने यांनी त्यांचे मित्र भगीरथ अमृषी कावळे (रा. केकस्थळवाडी, ता. जि. धाराशिव) यांना सन २०१५ मध्ये मुलीच्या लग्नासाठी दोन लाख रुपये हातउसने दिले होते. सदर रक्कम एक वर्षात परत करण्याचे आश्वासन आरोपीने दिले होते. मात्र वारंवार मागणी करूनही आरोपी टाळाटाळ करत होता. यानंतर आरोपी भगीरथ कावळे याने साक्षीदारांसमोर बँक ऑफ इंडिया, धाराशिव शाखेचा दोन लाख रुपयांचा धनादेश फिर्यादीस दिला. हा धनादेश फिर्यादी भोजने यांनी बँकेत जमा केला असता तो खोटा ठरला व खात्यात पुरेशी रक्कम नसल्याचे निष्पन्न झाले.

या फसवणुकीप्रकरणी फिर्यादी काशिनाथ भोजने यांनी वकील ॲड. महेश निंगुळे यांच्या मार्फत ऑगस्ट २०१६ मध्ये धाराशिव येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. या प्रकरणावर ३० डिसेंबर २०२५ रोजी निकाल देण्यात आला. सर्व साक्षी-पुरावे व फिर्यादीच्या वकीलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी भगीरथ अमृषी कावळे याला दोन लाख पन्नास हजार रुपयांचा दंड ठोठावला असून सहा महिन्यांचा सक्त कारावास सुनावला आहे.

## कळंब मॅरेथॉनमधून शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश : हेमंत ढोकले



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२ जानेवारी -**
स्व. गणपतराव कथले युवक आघाडीच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून १ जानेवारी नववर्षानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून हा उपक्रम स्तुत्य आहे. या स्पर्धेमुळे कळंबकरांना शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व अधोरेखित करणारा सकारात्मक संदेश मिळतो, असे प्रतिपादन हेमंत ढोकले (तहसीलदार, कळंब) यांनी कळंब मॅरेथॉनच्या बक्षीस वितरण समारंभात केले

यावेळी हभप. महादेव महाराज आडसुळ, प्रा. विठ्ठल माने, प्रा. सतीश मातणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच सतपाल बनसोडे, प्रताप मोरे, गणेश करंजकर, मनोज चोंदे, स्वराज करंजकर, बापू भंडारे, अशोक चोंदे, शहाजी चव्हाण, अशोक शिंपले, मुकुंद नागरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना तहसीलदार ढोकले म्हणाले की, व्यायाम ही काळाची गरज असून सध्या मुलांचे व तरुणांचे क्रीडांगणाशी नाते तुटत चालले आहे. नवीन वर्षात व्यायाम करण्याचे संकल्प अनेक जण करतात; मात्र त्याला प्रत्यक्षात उतरवण्याचे काम स्व. गणपतराव कथले युवक आघाडी सातत्याने करत आहे. याबद्दल त्यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.

### कळंब मॅरेथॉनचे विजेते...

**६ ते १५ वयोगट : मुली** जान्हवी राऊत, प्रगती गायकवाड, शिवक्रांती गायकवाड. **६ ते १५ वयोगट : मुले** सोहम काळे, विवेक शिंदे, प्रथमेश सुरवसे. **खुला गट : महिला** योगिनी साळुंके, परिमला बाबर, संध्या डोंगरे. **खुला गट : पुरुष** विराज जाधवर, प्रसाद सुरवसे, समीर शेख. **ज्येष्ठ नागरिक गट :** सुरेश काकडे, राजाभाऊ शिंदे, प्रिया पवार.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब कथले यांनी केले. सूत्रसंचालन राजेंद्र बिक्कड यांनी तर आभार प्रदर्शन यश सुराणा यांनी केले. ही मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बाळासाहेब कथले, राजेंद्र बिक्कड, शाम जाधवर, बाळासाहेब जाधवर, भाऊसाहेब शिंदे, पंकज कोटेचा, यश सुराणा, ओंकार कुलकर्णी, प्रवीण तांबडे, अशोक फल्ले, वैभव कोळपे, नवनाथ पुरी, धर्मराज पुरी, बंटी फल्ले यांनी परिश्रम घेतले.

## धाराशिवात रस्ता सुरक्षा अभियान २०२६ ची हेल्मेट रॅलीद्वारे जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जानेवारी -**
उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव व जिल्हा पोलीस प्रशासन, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान २०२६ हे दि.१ जानेवारी २०२६ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हाभर राबविण्यात येत आहे.

या अभियानाची अधिकृत सुरुवात १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव येथे करण्यात आली.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांच्या हस्ते वाहनास रस्ता सुरक्षा अभियान २०२६चे बॅनर लावून हिरवा झेंडा दाखवत अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत साळी, नवनाथ साठे, राजन शिंदे, शुभम खोसे, तसेच कार्यालयातील सर्व मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटार वाहन निरीक्षक, वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक अरविंद हिंगोले व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

यासह कार्यालयीन अधीक्षक धनंजय लोंढे, नरसिंह कुलकर्णी, इतर सर्व कार्यालयीन कर्मचारी, शिपाई, कार्यालयात आलेले नागरिक, वाहन चालक व मालक, मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक तसेच वाहन वितरकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रस्ता सुरक्षा अभियानाची सुरुवात हेल्मेट परिधान करून काढण्यात आलेल्या बाईक रॅलीने करण्यात आली. ही रॅली उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातून सुरू होऊन तेरणानगर, ज्ञानेश्वर मंदिर, भानूनगर, सेंट्रल बिल्डिंग, एस.पी. ऑफिस, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, तुळजाभवानी स्टेडियम, न्यायालय परिसर आदी प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत पुन्हा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे येऊन संपन्न झाली.

यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी उपस्थित वाहन चालक, मालक व नागरिकांना मार्गदर्शन करताना दुचाकी चालकांनी हेल्मेट परिधान करणे, चारचाकी वाहन चालकांनी सीट बेल्टचा वापर करणे, अपघात झाल्यास जखमी व्यक्तींना तात्काळ रुग्णवाहिका बोलावून रुग्णालयात पोहोचविण्यास मदत करणे, तसेच मद्यपान करून वाहन चालवू नये, असे आवाहन केले.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आस्थापनांनी मासिक विवरणपत्र ३१ जानेवारीपूर्वी ऑनलाईन सादर करावीत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांना कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाईन सादर करणे सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणारा अधिनियम १९५९ व त्याअंतर्गत नियमावली १९६० नुसार बंधनकारक असल्याने विवरणपत्र तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. केंद्र व राज्य शासन, अंगिकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालय वेबपोर्टलवर नियोक्त्यांच्या लॉगिन मध्ये ईआर-१ सादर करताना पोर्टलवर एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब) वर क्लीक करुन एम्प्लॉयर लॉगिन मध्ये युजर आयडी व पासवर्ड वापरुन लॉगिन करुन डॅशबोर्डवरील ईआर-१ ऑप्शनवर क्लीक करावे, त्यानंतर एंटर ईआर-१ वर क्लीक करुन तिमाही विवरणपत्र ईआर-१ ऑनलाईन सादर करता येईल.

याचा वापर करुन ३१ जानेवारी, २०२६ अगोदर ईआर-१ विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे.



# भाजपचे वेगाने होणारे 'काँग्रेसीकरण' घातकच !

## जनसंघापासून पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्यांनाही उमेदवारीपासून वंचित ठेवल्याचा जाहीर आरोप

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, २ जानेवारी :** राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपमधील अंतर्गत बंडाळी मोठ्या प्रमाणात बाहेर पडताना दिसतेय. भाजपमध्ये उमेदवारी वा अन्य लाभाच्या पदांसाठी प्रवेश करणाऱ्यांना तिकिटे देऊन निष्ठावंतांवर हेतुतः अन्याय केल्याच्या भावना संतप्त कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहेत. माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांना भाजपने उमेदवारी नाकारताच त्यांनी तात्काळ भाजपचा त्याग करून राष्ट्रवादी काँग्रेसशी हातमिळवणी करून उमेदवारी मिळविली. हे ज्वलंत उदाहरण महत्वाचे असून भाजपचे वेगाने होणारे 'काँग्रेसीकरण' भविष्यात भाजपासाठी अत्यंत घातक ठरणार असल्याच्या प्रतिक्रिया जनमानसातून व्यक्त होताना दिसत आहेत. हे तर काहीच नाही, जनसंघापासून भाजपशी एकनिष्ठ असणाऱ्यांनाही उमेदवारीपासून वंचित ठेवण्यात आल्याचा जाहीर आरोपही केला जात आहे.

निवडणूक म्हटले की, शह-काटशह ओघाने आलाच. युद्धात आणि प्रेमात सर्व काही क्षम्य असते, असेही म्हटले जाते. आताच्या परिस्थितीत निवडणुकीच्या काळात काहीही केले तरी ते क्षम्यच समजले जावे, अशीच जणू भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची मानसिकता बनत गेल्याचे निदर्शनास येत आहे. विरोधी पक्ष चहुबाजूने संपविण्याचा भाजप नेत्यांचा हा प्रयत्न लोकशाहीसाठी धोकादायक असल्याच्या भावनाही व्यक्त होताना दिसत आहेत. लोकशाही खऱ्या अर्थाने जिवंत ठेवण्यासाठी प्रबळ विरोधी पक्ष अस्तित्वात असणे महत्वाचे आहे. दुर्दैवाने भाजपच्या काही नेतेमंडळींकडून विरोधकांनाच या ना त्या कारणावरून जाळ्यात ओढण्याचे काम शिस्तबद्धरीत्या सुरु आहे.

भाजपच्या नेत्यांनी अवलंबलेला हा पायंडा राज्याच्या राजकारणात अन्य कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांनी अवलंबला नसल्याचेही बोलले जात आहे. यात बऱ्यापैकी तथ्य असल्याचेही पाहावयास मिळते. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनी या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून या पक्षात अशा कोलांटउड्या मारल्या. कोणत्याही निवडणुकीच्या काळात असे प्रकार मागच्या काही वर्षात सर्रास होताना दिसत आहेत. निवडणुकीच्या कालावधीत केले जाणारे अशा प्रकारचे पक्षांतर कोणत्याही राजकीय पक्षासाठी लाभाचे ठरेल्च असे नाही.

लातूरचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उदगीरमध्ये भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला होता. मात्र, याचा लक्ष्मण कांबळेंना लातूर मनपा निवडणुकीत भाजपकडून उमेदवारी नाही मिळताच त्यांनी लगेच भाजपचा त्याग करून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश मिळवून उमेदवारी दाखल केली. हा प्रकार कोणीही आपल्या स्वार्थाच्या राजकारणास सध्यस्थितीत प्राधान्य देत असल्याचेच दर्शवणाराआहे. अशा कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देताना सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी दहादा विचार केला पाहिजे. आपल्या पक्षात येणाऱ्यांची संख्या वाढत आहे, हे दाखवण्यासाठी भाजप अथवा अन्य कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाने कोणाला प्रवेश द्यायचा आणि कोणाला नाही? यावरहीविचार मंथन करणे आजघडीला गरजेचे वाटते.

लातूर मनपाच्या निवडणुकीत सगळ्यात जास्त बंडाळी भाजपमध्ये झाली. भाजपमध्ये निवडणूक प्रमुख पदावरून कोणतेही कारण न देता डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांना बाजूला केले गेले. लातूरला अजिबात वेळ न देणाऱ्या पालकमंत्री भोसले यांना निवडणूक प्रभारी केले गेले. तर संभाजी पाटील निलंगेकर यांना निवडणूक प्रमुख पद दिले गेले. पक्षाच्या या कृतीने सुशिक्षित समाजात अतिशय चुकीचा संदेश गेल्याचे पदोपदी जाणवत आहे. पक्षाची ही कृती भाजपच्या अनेक प्रभागातील उमेदवारांना पराभवाच्या गर्तेत टाकू शकते, असाही मतप्रवाह व्यक्त होताना दिसला.

त्यातच जे कार्यकर्ते वर्षानुवर्षे भाजपशी एकनिष्ठ आहेत, अशांना हेतुतः टाळून अगदी काल परवापर्यंत जी मंडळी अन्य राजकीय पक्षात राहून भाजपाला शिव्या घालायची, अशा मंडळींना उमेदवारी बहाल करण्यात आल्याची उदाहरणे आहेत. अर्थात हा प्रकार भाजपच्या आगामी वाटचालीसाठी लाभदायक नाही. मात्र ज्या नेत्यांच्या हाती पक्षाची सूत्रे आहेत, त्यांच्या लक्षात हा प्रकार येत नाही, हे खरे दुर्दैव आहे. अगदी जनसंघापासून भाजपशी निगडित असणाऱ्यांनाही यावेळच्या निवडणुकीत उमेदवारी दिली गेली नसल्याचे पाहावयास मिळाले आहे. अशा मंडळींनी भाजप बंडखोर म्हणून नव्हे तर भाजप निष्ठावंत म्हणून अपक्ष या नात्याने निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. निवडून आल्यानंतर पुन्हा भाजपसोबत राहण्याचा मनोदयही काहींनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या निवडणुकीत लातुरात प्रत्यक्षात काय घडणार? याबद्दल आजच ठामपणे सांगणे अवघड झाले आहे. मागच्या काही वर्षात भाजपने आपली कार्यप्रणाली पूर्णतः बदलली आहे. व्यावसायिक राजकारण करण्यास प्राधान्य देणाऱ्या भाजपचे वेगाने होणारे 'काँग्रेसीकरण' पक्षासाठी घातक असल्याने भाजप नेत्यांनी वेळीच सावध व्हावे, अन्यथा फार उशीर झालेला असेल अशा भावना निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांतून व्यक्त होताना दिसत आहेत.



## पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा तपासणी दौरा

**लातूर, २ जानेवारी :** नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे वार्षिक परीक्षण, तपासणी व प्रशासकीय आढाव्याच्या अनुषंगाने आठ दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर लातूर जिल्ह्यात उपस्थित आहेत. या दौऱ्याचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथील प्रशस्त मैदानावर लातूर जिल्हा पोलीस दलाची भव्य परेड तसेच विविध विशेष पथकांची प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. या परेडचे परीक्षण उमाप यांनी केले. परेडचे संचालन पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी अत्यंत शिस्तबद्ध, काटेकोर व नियोजनबद्ध पद्धतीने केले. परेडमध्ये सहभागी पोलीस अधिकारी व अंमलदारांनी आपली शिस्त, एकात्मता, शारीरिक क्षमता, प्रशिक्षणाची गुणवत्ता व कर्तव्यनिष्ठा यांचे प्रभावी दर्शन घडविले.

परेडनंतर लातूर जिल्हा पोलीस दलाकडून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या विविध विशेष पथकांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यामध्ये मॉब डिसपर्सल पथक, किट परेड, लाठी ड्रिल, स्कॉड ड्रिल, वाद्य पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच श्वान पथक यांचा समावेश होता. आपत्कालीन परिस्थिती, जमाव नियंत्रण, दंगल नियंत्रण, दहशतवादी कारवाया तसेच संशयास्पद साहित्याच्या शोध व नाशासाठी पोलीस दल किती सज्ज, सक्षम व प्रशिक्षित आहे, याचे सविस्तर व प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे सादरीकरण करण्यात आले.

या वार्षिक परीक्षण दौऱ्याच्या निमित्ताने लातूर जिल्ह्यात सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या स्नेहसंमेलनात पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांशी मुक्त संवाद साधत त्यांच्या वैयक्तिक, कौटुंबिक तसेच सेवासंबंधी अडचणी जाणून घेतल्या. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा अनुभव प्रशासनासाठी मौल्यवान असून, त्याचा योग्य लाभ घ्यावा, असे मत व्यक्त करत उपस्थित प्रश्न व समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# एमआयडीसीतील बांधकाम अट शिथील करण्याची व्यापारी संघाची मागणी

## उद्योग राज्यमंत्र्याचा सकारात्मक प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** राज्यभर सर्व एमआयडीसीमध्ये एक एकर किंवा त्यापेक्षा कमी जागा असलेल्या भूखंड धारकांना ४० टक्के बांधकामाची अट टाकण्यात आली असून ही अट जाचक असल्याचे मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार अॅड. संतोष गिल्डा यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून याचा राज्यातील सर्वच छोट्या व्यावसाईकांना लाभ होणार आहे. सरकारने लोकल फॉर व्होकल ही योजना अस्तित्वात आणल्यानंतर व स्वदेशी व्यावसायीकांना प्राधान्य दिल्यानंतर एमआयडीसीतील छोट्या व्यापार्यांना ज्यांच्याकडे एक एकरपेक्षा कमी भूखंड आहे अशांना ४० टक्के बांधकाम बंधनकारक केले आहे. छोटे व्यापारी असल्यामुळे कमी भांडवलात व्यवसाय सुरू करताना एवढ्या मोठ्या प्रमाणावर बांधकाम करणे व्यापार्यांना अडचणीचे होत असल्याचे मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार संतोष गिल्डा यांनी लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने राज्यातील छोट्या व्यावसायीकांना त्याचा लाभ होणार आहे.

राज्याचे उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे लातूर येथे एका खाजगी कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी त्यांना लातूरसह राज्यातील व्यवसायीकांच्या अडी-अडचणीबाबतची चर्चा मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार अॅड. संतोष गिल्डा यांच्यासह अन्य व्यावसायीकांसोबत झाली. यावेळी छोट्या व्यवसायीकांना येत असलेल्या अडचणींबाबत व व्यवसाय वाढी संदर्भात सकारात्मक चर्चा झाल्यानंतर तसेच केंद्र व राज्याचे धोरण स्वदेशी व्यावसायीकांना प्रोत्साहन देणारे असल्याने छोटे-मोठे व्यावसायीक आपआपल्या एमआयडीसीमध्ये नवनवीन प्रयोग तयार करत आहेत. त्यातून रोजगार उपलब्ध होत असल्याने बेरोजगारी दूर होण्यास मदत होते आहे. व्यवसायाला लागणारे भांडवल व मशनरीचा खर्च हे कर्ज रुपाने घेतल्यानंतर व्यावसायीक हा आर्थिक अडचणीतून आपला व्यवसाय करत असताना त्याला एमआयडीसीने ४० टक्के बांधकाम करण्याची अट टाकल्याने व्यवसायातील भांडवल कमी होते शिवाय अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही गोष्ट मराठवाडा व्यापारी संघाचे सल्लागार अॅड. संतोष गिल्डा यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनीही या संदर्भात आपण योग्य तो पर्याय उपलब्ध करून असे आश्वासन दिल्याने लातूरसह महाराष्ट्रातील एमआयडीसीतील छोट्या व्यावसायीकांना याचा फायदा होणार आहे.



## प्रशिक्षणास अनुपस्थित कर्मचाऱ्यांना बजावल्या नोटीस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान प्रक्रियेतील अधिकारी - कर्मचाऱ्यांसाठी नुकतेच प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या २६५ अधिकारी - कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

मनपा निवडणुकीसाठीचे हे प्रशिक्षण सराव सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक नियमानुसार नोटीस बजावण्यात आली आहे. नोटीस देण्यात आल्यानंतर संबंधित अधिकारी - कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची व फौजदारी स्वरूपाची कारवाई केली जाणार असल्याचे मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी दिली.

# आज अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा

**लातूर, २ जानेवारी :** महाराष्ट्र गट- ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ रविवार, ४ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत एक सत्रामध्ये परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. लातूर जिल्ह्यातील २७ उपकेंद्रावर ही परीक्षा आयोजित केलेली असून परीक्षा कालावधीमध्ये परीक्षा केंद्राच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर परीक्षार्थी येणार आहेत. त्यामुळे परीक्षा कालावधीत परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये या परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परीक्षार्थी व्यतिरिक्त पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसारमाध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल.

# पोषक आहार हीच क्षयरोग मुक्तीची त्रिसुत्री : डॉ. गायकवाड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** सध्या भारतात प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत केंद्र सरकारने क्षयरोगमुक्त भारत करण्यासाठी क्षयरोगाचे उच्चाटनाचे नियोजन केलेले आहे. या अनुषंगाने १ जानेवारी, २०२६ रोजी नवीन वर्षाच्या सुरुवातीस लातूर परिमंडळाच्या उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी निक्षयमित्र बनून ५५ क्षयरुग्णांना दत्तक घेवून त्यांच्या पोषणाची जबाबदारी घेतली.



तसेच आहार किट देण्यासाठी परिमंडळातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व विभाग प्रमुख यांनी स्वतः निक्षय मित्र बनून प्रत्येकी २० ते ५० पोषण आहार किटचे वितरण करावे. जेणेकरून एकही रुग्ण पोषक आहारासाठी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच पोषण आहार किटमधील घटकांचे आरोग्यासाठी उपयोग, हे सागून आदर्श जीवनशैलीचे कशी असावी, प्रथिनयुक्त पोषण आहार, पुर्ण औषणी कोर्स व व्यसनांपासून मुक्त राहणे या माध्यमातून क्षयरोगमुक्ती मिळवता येते, असे आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी सांगितले.

या कार्यक्रमास पुणे येथील सेवानिवृत्त आरोग्य उपसंचालक डॉ. गायकवाड, लातूर येथील सहाय्यक संचालक डॉ. संजय ढगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, एडीएचएस कुष्ठरोग विभागाचे डॉ. ताबांळे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. सावंत, जिल्हा क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, औसाचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर, रेणापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रेड्डी, तसेच उपसंचालक आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# लातूर येथे राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ ला प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** प्रत्येक व्यक्तीचा जीव मौल्यवान असतो, मात्र वाहतूक नियमांचे पालन न केल्याने आपण आपला आणि इतरांचाही जीव धोक्यात टाकतो. देशात जवळपास एक ते दीड लाख व्यक्तींचा दरवर्षी अपघातात मृत्यू होतो, यामध्ये सुमारे दहा ते अकरा टक्के मृत्यू आपल्या राज्यात होतात. हे मृत्यू टाळण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज आहे. विशेषतः युवा वर्गाने यासाठी पुढाकार घ्यायला हवा, युवक-युवतींनी वाहतूक नियमांचे पालन करून इतरांनाही त्याबाबत जागरूक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

लातूर जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले.




जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, राज्य रस्ते परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रस्ते सुरक्षा विषयक माहितीपुस्तिका, भिंतीपत्रिका, जनजागृती फलकाचे प्रकाशन करण्यात आले.

रस्ता सुरक्षा का आवश्यक आहे, याची जाणीव प्रत्येकाला असणे गरजेचे आहे. अपघातामध्ये मृत्यू होणे दुर्दैवी बाब असून, मृत्यूमुळे होणारी हानी भरून न निघणारी आहे. अपघात रोखण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करावे. दुचाकी चालवताना हेल्मेट आणि चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर करणे आवश्यक आहे. अपघातात होणारे बहुतांशी मृत्यू हे हेल्मेट, सीट बेल्ट न वापरल्यामुळे होतात, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले.

### अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक

प्रास्ताविक मोटार वाहन निरीक्षक अभिजीत रेळे यांनी केले. यावेळी त्यांनी रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी अपघातग्रस्तांना मदत करणारे दयाराम जगताप सुडे, गणेश गिराम, आबासाहेब शिंदे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना ई-चलनद्वारे दंड आकारण्याची कार्यवाही वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागामार्फत केली जात होती. मात्र, आता परिवहन विभागाच्या ताफ्यात आता २ नवीन 'रडार' वाहने दाखल झाली आहेत. यामुळे महामार्गांवर, रहदारीच्या ठिकाणी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर कॅमेरा, सेन्सरद्वारे लक्ष ठेवता येणार आहे. या वाहनांना आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

## 'राजमाता जिजामाता'तर्फे मतदान जनजागृती



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या मतदान जनजागृती उपक्रमाला राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. 'माझ्या उज्वल भविष्यासाठी व लोकशाही मजबूत करण्यासाठी मी आई-बाबाला मतदान करण्यास प्रवृत्त करणार', असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. यावेळी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मतदानाची शपथ घेतली.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, राजीव मुंडे, संजय गुरमे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड आर. पी मुंडे आदी उपस्थित होते.